सोलापूर तरुण भारत

आसमंत



लाडक्या गणपतीबाप्पाच्या आगमनाने सर्वत्र चैतन्याचे वातावरण आहे. अख्ख्या महाराष्ट्रालाच एक उत्सवी स्वरूप आले आहे. लोकमान्यांनी श्रीगजाननाची जी सामाजिक उपासना सुरू केली, त्याला आता शतकाच्या वर काही वर्षे लोटली आहेत. ज्या उद्देशाने लोकमान्यांनी त्याकाळी या उत्सवाचा प्रारंभ केला, तो उद्देश आज कितीसा शिल्लक आहे, हा प्रश्न वेगळा आहे. मुद्दा हा की, याही उत्सवात कालानुरूप बदल घडत गेले. सनईच्या मंगल सुरात येणारे बाप्पा आता डीजेच्या कर्णकर्कश आवाजात आणले जातात. परिवर्तन हवेच, परंतु हे असे नको. तुझिये कृपेचेनि बळे, वितुळती भ्रांतीची पडळे! श्री गणरायाच्या कृपेने जीवन समृध्द होते. ही देवता तितकीच प्रेरणा देण्यास समर्थ आहे.

# तुझिये कृपेचेनि बळे...

प्रासंगिक

**प्रकाश एदलाबादकर**

समाजातील अनेक स्तर या निमित्ताने एकत्र येऊन सहजीवनाचा, साहचर्याचा अनुभव घेतात. समाजातील सर्व प्रकारच्या व्यक्तींना एकाच सूत्रात गुंफण्याचे आणि समाज समरस करण्याचे आज घडीला आवश्यक असलेले कार्य या देवतेच्या सार्वजनिक उपासनेतून सिद्ध होते. समाजाच्या सर्वच घटकांमध्ये ही देवता तेवढीच लोकप्रिय आहे. अशा होकारात्मक दृष्टीने आपण या उत्सवाकडे पाहिले पाहिजे.

या विघ्नहर्त्याच्या रूपगुणांनी लोभावून, मराठी सारस्वतातील अनेक मानकऱ्यांनी गणेशाला अत्यंत नम्र भावाने अभिवादन केले आहे. शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी या देवतेला दिलेला अग्रपूजेचा मान आणि त्यासाठी गणेशाच्या अंगावर चढविलेली शब्दालंकाराची आरास विलोभनीयच नव्हे, तर भक्तिभावाने ओतप्रोत भरलेल्या मनाला एका विशिष्ट अवस्थेत पोचविणायचे अतूट सामर्थ्य असलेली शब्दकळा आहे. साहित्याच्या या आदिदेवतेला वंदन करण्यासाठी अभंग, आरत्या, स्तोत्रे, भूपाळ्या यांसारख्या अनेक रचना अक्षरशः शेकडो रूपात उपलब्ध आहेत.

श्रीज्ञानेश्वरीच्या आरंभालाच ज्ञानदेवांनी स्वसंवेद्य अशा आत्मरूपाला वंदन केले आहे.

**ओं नमो जी आद्या। वेद प्रतिपाद्या।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरुपा।।**

ही ग्रंथारंभीची ओवी, श्रीगणेशाची नाम रूपातील परब्रह्म प्रतिमा वर्णन करणारी आहे, असे ज्ञानेश्वरीच्या एका ज्येष्ठ अभ्यासकाने मला सांगितले होते. ज्ञानदेवांसारख्या योगीराज सारस्वत शिरोमणीलाही गणेशाचे वाङ्मय रूपच सर्वार्थाने फुलवावेसे वाटले यामागेसुद्धा काही गूढ असेल काय?

**अकार चरण युगुल। उकार उदर विशाल।**
**मकार महामंडल। मस्तकाकारे।।**
**हे तिन्ही एकवटले। तेच शब्दब्रह्म कवळले।**
**ते मियां गुरुकृपा नमिलें। आदिबीज।।**

श्रीगणेशाच्या ठायी सकलकलांचाच नव्हे, तर सर्व चराचर सृष्टीचाच उगम मानला गेला आहे. त्यामुळेच या देवतेवर ज्ञानदेवांनी ओंकाराचे उत्प्रेक्षण केलेले दिसते. ओंकाराचे साकार आणि उत्क्रांत रूप म्हणजेच श्री गणेश! श्रीगणेश सर्व विद्यांचा अधिष्ठाता आहे. बुद्धीची देवता म्हणून आपण गणेशाची आराधना करतो. त्यामुळेच ज्ञानदेवांनी तिला वाङ्मय रूपकाने वानावे यात नवल नाही.

**हे शब्दब्रह्म अशेष । तेचिं मूर्ती सुवेष ।**
**जेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ।।**

असा श्रीगणेश ज्ञानदेवांच्या प्रतिमासृष्टीत स्थित आहे. श्रीगणेशाच्या अवयवांची आणि आयुधांची, ज्या रूपकात्मक पद्धतीने, माउलीने सौंदर्यमीमांसा केली आहे; ती अन्यत्र सापडणे कठीण आहे. स्मृती हे गणेशाचे अवयव आहेत. अठरा पुराणे ही त्याची रत्नखचित भूषणे असून त्यांचा गर्भितार्थ ही त्या भूषणांची कोंदणे आहेत. महर्षी व्यासांची बुद्धी ही गणेशाची मेखला आहे. सहा शास्त्रे म्हणजे गणेशाचे सहा हात आहेत. त्याचा परशु हा तर्कशास्त्र आणि अंकुश हा न्यायशास्त्र आहे आणि मोदक हा वेदांत आहे. माउली म्हणते...

**तरी तर्क तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।**
**वेदांतू तो महारसु । मोदकु मिरवे ।।**

**असा हा 'विवेकवंतु सुपरिमळु'** असलेला, ब्रह्मसुखाचा परमानंद असलेल्या शब्दब्रह्माला ज्ञानेश्वरांनी आपल्या विदग्ध आणि लालित्यपूर्ण वाणीने वंदन केले आहे. समर्थ रामदासांनी केले गणेशाचे वंदन अत्यंत उत्कट, भव्य आणि समर्थांच्या एकूण वाङ्मयीन प्रतिमेला साजेसे दणदणीत आहे.

ग्रंथराज दासबोधातील पहिल्या दशकातील दुसरा समास हा समर्थांनी गणेशाच्या स्तवनासाठीच खर्ची घातला आहे. समर्थांचा गणेश भव्य आणि चपळ आहे, गतिशील आहे. तो एका जागी स्थिर नाही.

**भव्यरूप वितंड। भीममूर्ती महाप्रचंड।**
**विस्तीर्ण मस्तकी उदंड। सिंधूर चर्चिला।।**
**स्थिरता नाही येकक्षण। चपळ विशई अग्रगण।**
**साजिरी मूर्ती सुलक्षण। लावण्य खाणी।।**

समर्थांनी आपल्या आयुष्यभर कोदंडधारी श्रीरामाचे कृतिशील रूप आणि बलभीम हनुमंताचे चपळरूप यांचे अनुसरण केले त्यामुळे त्यांचा गणेशही गतिशील आहे. यात नवल ते काय? समर्थांची वाणी रोखठोक आणि स्पष्ट आहे. त्यांच्या वर्णनात खडबडीतपणा आहे, पण निवेदनाची भव्यता, प्रतिभेचा उत्तुंग विलास ठायी ठायी प्रत्ययाला येतो. समर्थांना अभिप्रेत असलेला गणेश संपूर्ण पृथ्वीला आंदोलित करणारा आहे. ते म्हणतात...

**तुझिये कृपेचेनि बळे ।**
**वितुळती भ्रांतीची पडळे ।**
**आणि विश्वभक्षक काळे । दास्यत्व कीजे ।।**
**येतां कृपेची निजउडी । विघ्ने कापती बापुडी ।**
**होऊनि जाती देशधडी । नाममात्रे ।।**

समर्थांनी श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतल्यावर त्यांना तेथे श्रीरामाचा साक्षात्कार झाला अशी कथा सांगतात. म्हणूनच त्यांना त्यांच्या आवडत्या भीममूर्तीचे दर्शन गणेशाच्या ठायी असावे.

**लवथवीत मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद ।**
**क्षुष्ठ घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ।।**
**चतुर्भुज लंबोदर । कांसे कसिला पीतांबर ।**
**फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ।।**

असे वर्णन करणाऱ्या समर्थांनीच, मोरगावच्या मयूरेश्वराच्या दर्शनाने मनात आलेल्या उत्कट भक्तिभावाला शब्दरूपाने वाट करून दिली. तीच गणपतीची आरती 'सुखकर्ता दुखहर्ता' आजघडीला प्रत्येक मराठी घरात म्हटली जाते.

**झुंड प्रचंड मिरवी गजकर्ण थापा ।**
**तेजाळ अंकुश म्हणे दुरितासी कापा ।।**
**फर्सा पुसूनि सरसावतसे अघाला ।**
**भक्तासि विघ्न रचिता रिचिविती घाला ।।**
**साठी सहस्त्र गण त्या सरिसा निघाला ।।**
**तनु वितंड चंडसी । प्रचंड शुंड दंडसी ।**
**सुरंग रंग रेखिला । घवघवीत देखिला ।।**

अशा प्रकारचा बलवान, आक्रमणशील आणि अन्यायाच्या (पान ४ वर)



# महालक्ष्म्यै नमः ।

निमित्त

**ज्योती पुजारी**

माहेरवाशीण म्हणून येणाऱ्या ज्येष्ठा-कनिष्ठा म्हणजेच महालक्ष्म्या. आता लवकरच माहेरी येणार आहेत. ज्यांच्याकडे महालक्ष्म्यांचा कुळाचार असतो, त्यांच्याकडे महालक्ष्म्यांच्या आगमनाची तयारी सुरू झाली आहे. महालक्ष्म्यांचे मुखवटे शाडूचे असतील तर ते चितार ओळीतून नव्याने रंगवून आणले जातील. पितळेचे मुखवटे ब्रासोनी चमकवले जातील.

महालक्ष्म्यांच्या आगमनाची प्रतीक्षा आहे. सासुरवाशिणीला माहेरची ओढ असते तशीच प्रत्यक्ष विष्णुपत्नी असलेल्या नारायणीलाही ही ओढ आहे. पण नारायणी महालक्ष्मी तिचं माहेर असलेल्या सागराकडे जात नाही तर तिच्यावर असणाऱ्या माणसांच्या घरात ती माहेरपणाला जाते. माणसांची घरं तिचं माहेर होतं. देवीच्या दैवी शक्तीला नात्याचं रूप देणे, महालक्ष्मीला माहेरवाशिणीच्या स्वरूपात पाहणं, तिच्याशी माहेरवाशिणीचं नातं जोडणं सगळंच किती विलोभनीय आहे. आपण भारतीय देवी-देवताना आपल्या जवळच्या नात्यांनी जोडून घेतो. मग पंढरीचा विठोबा आपला मायबाप होतो. कोल्हापूरची आपली अंबाबाई होते. अंब म्हणजे माता. ऐश्वर्याची, संपन्नतेची देवी म्हणजे महालक्ष्मी. या महालक्ष्मीशी आपण माहेरवाशिणीचं नातं जोडलं. त्यांना नाव दिलं ज्येष्ठा-कनिष्ठा. आपल्या या माहेरवाशिणी आपल्या लेकरांसह त्यांच्या माहेरी येतात. त्यांच्या स्वागतासाठी घराच्या प्रवेशद्वारापासून थेट त्या आसनस्थ होणार त्या स्थानापर्यंत रांगोळीची सुबक पाऊले काढली जातात. त्यावर हळद-कुंकू वाहिलं जातं. ती साधी पाऊले नाहीत; ती महालक्ष्मीची पाऊले असतात.

घरातल्या सुना एका ताटात ज्येष्ठा-कनिष्ठांचे आणि त्यांच्या बाळांचे मुखवटे ठेवून ते ताट रांगोळींनी रेखलेल्या पावलांवर ठेवत महालक्ष्म्यांची जिथे प्रतिष्ठापना होणार असते तिथे आणतात आणि महालक्ष्म्यांचा घरात प्रवेश होतो. आता तीन दिवस या माहेरवाशिणी घराघरात आनंदाने राहणार असतात. त्यांच्या येण्यानं घरे उजळून निघणार आहेत. महालक्ष्मीचा फुलोरा, पात्याकरंज्यांची तयारी सुरू झाली आहे. बाहेरच्या खोलीत पुरुष मंडळी महालक्ष्मी पूजनाच्या निमित्ताने होणाऱ्या आप्तस्वकीयांच्या जेवणावळीसाठी लागणाऱ्या अनेक प्रकारच्या भाज्या, पुजेसाठी हार-फुले, केवडा-कमळ, विड्याची पाने, केळीचे खांब आणि बरंच काही आणायचं आहे त्यांची यादी करतील. घरातल्या पोरीसोरी, आजी भाज्या निवडण्याच्या कामाला लागतील. महालक्ष्म्यांच्या नैवेद्याकरिता सोळा भाज्यांची पूर्वापार चालत आलेली प्रथा यावर्षीही पार पाडली जाईल. शिवाय नैवेद्यात आंबील असायलाच पाहिजे. आंबील महालक्ष्मीला आवडणारा मुख्य पदार्थ. आपल्या या माहेरवाशिणी कनवाळू आहेत. अगदी साधा पदार्थ आंबील त्यांना आवडतो. कारण आंबील सगळ्यांना परवडणारा पदार्थ आहे.

गरिबाच्या घरीही लक्ष्मीमाय मायेने जाते. तिला ताटभर पंचपक्वान्नांची लालसा नसते. तिला नैवेद्य म्हणून आंबील प्रिय आहे. तिच्या या सर्वसमावेशक वृत्तीचं प्रतीक म्हणून नैवेद्यात आंबिलीला महत्त्वाचं स्थान आहे. ज्यांच्याकडे महालक्ष्म्या बसतात त्यांच्याकडे महालक्ष्म्याच्या प्रतिष्ठापनेची तयारी सुरू झालेली असणार. महालक्ष्म्या बसवण्यासाठी काही जणांनी लाकडी चौकटी तयार केल्या असतील. चौकटीभोवती महिरपी खांब असतील. काही जण तख्तपोसावर तर कोणी मोठ्या लाकडी आसनावर; ज्याला जसं योग्य वाटेल-जमेल तशी महालक्ष्मीची बैठक तयार करतील. महालक्ष्म्या बसणार ते स्थान निरनिराळ्या प्रकारच्या झाडांच्या कुंड्या ठेवून बाजूला केळीचे खांब लावून, भरजरी साड्यांनी, विजेच्या रंगीत माळांची रोषणाई करून आपापल्यापरीने सुशोभित करतील. प्रशस्त मोठ्या बंगल्यांमध्येही महालक्ष्म्यांचं आनंदाने स्वागत केले जाते आणि छोट्या छोट्या घरांमध्येही महालक्ष्म्यांच स्वागत आनंदाने केले जाते. महालक्ष्म्यांसाठी आणलेल्या भरजरी साड्या कपाटातून बाहेर निघतील.

महालक्ष्म्यांना भरजरी काठाच्या लफ्फेदार पदराच्या साड्या नेसविल्या जातील. जिवापाड जपलेल्या सासू-सुना, माय-लेकीच्या दागिन्यांना महालक्ष्म्यांच्या अंगाखांद्यावर विराजमान होण्याचं भाग्य लाभेल. आजेसासुबाईंच्या काळातली पूर्वपरंपरेनं पुढच्या पिढीकडे आलेली जोंधळी पोत, पुतळ्याची माळ, शिंदेशाही तोडे, जाळीच्या पाटल्यांनी महालक्ष्म्यांचं रूप खुलेल. (पान ४ वर)

# ट्रम्प यांच्या 'टॅरिफ'चा अमेरिकेलाच फटका

**'अमेरिका फर्स्ट' असे म्हणत, ट्रम्प यांनी राणा भीमदेवी थाटात जगभरातील देशांवर आयातशुल्क लादले असले, तरी त्याचा थेट फटका अमेरिकी जनतेलाच बसणार आहे. एका अहवालानुसार, सरासरी प्रत्येक अमेरिकी व्यक्तीला वार्षिक २ हजार, ४०० डॉलर्सचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.**

लक्ष्यवेध

**संजीव ओक**

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हे नाव ऐकले की, अमेरिकन राजकारणात घेतल्या गेलेल्या धाडसी मात्र, विवादास्पद निर्णयांचे स्मरण होते. राष्ट्राध्यक्षपदाच्या त्यांच्या मागील कार्यकाळात, जागतिक व्यापाराला हादरा देणारे निर्णय घेण्यात त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. आताही २०२५ साली ते सत्तेत परतले असून, पुन्हा एकदा व्यापारयुद्धाबाबत वारंवार ते जगाला धमकावत आहेत.

'अमेरिका फर्स्ट' ही त्यांची धोरणात्मक घोषणा तसे पाहता अमेरिकेच्या हितसंबंधांना चालना देणारी वाटत असली, तरी आजच्या तारखेला तरी अमेरिकी नागरिकांसाठी ती महागाईची ठरली आहे. एका ताज्या अहवालानुसार, ट्रम्प यांच्या 'टॅरिफ' धोरणामुळे सरासरी प्रत्येक अमेरिकन नागरिकाला, आयातमालावर वर्षाला तब्बल सुमारे २ हजार, ४०० डॉलर्स अधिक खर्च करावे लागणार आहेत. ही आकडेवारी अमेरिकी गृहिणींपासून ते उद्योगपतींपर्यंत सर्वांनाच भेडसावणारी नवी समस्या ठरणार आहे.

'टॅरिफ' म्हणजे परदेशातून आयात होणार्या मालावर लावला जाणारा कर. ट्रम्प यांचा दावा आहे की, या करामुळे चीनसारख्या देशांवर दबाव येतो आणि अमेरिकी उत्पादनाला चालना मिळते. प्रत्यक्षात मात्र या कराचा भार अमेरिकी ग्राहकांच्या खिशावरच पडत आहे. उदाहरणार्थ, चीनकडून आयात होणारे मोबाईल, कपडे, इलेट्रॉनिक उपकरणे किंवा वाहनांचे सुटे भाग यांवर जास्त कर आकारला, तर त्यांची किंमत अमेरिकेत स्वाभाविकपणे वाढते. हा वाढता कराचा बोजा तेथील नागरिकांच्याच डोयावर पडतो. साधारण अमेरिकी कुटुंब महिन्याला आयात वस्तूंवर लक्षणीय खर्च करते. कपडे, स्वयंपाकघरातील वस्तू, फर्निचर, गॅजेट्स यांचा मोठा भाग चीन, व्हिएतनाम, भारत किंवा मेसिकोसारख्या देशांतून अमेरिकेत येतो. आयातशुल्क वाढल्यावर या वस्तूंच्या किमती महागल्याने घरगुती खर्चात वाढ होणे, क्रेडिट कार्डवरील कर्जाचा भार वाढणे, मध्यमवर्गीयांच्या खरेदी क्षमतेत घट होणे असे थेट परिणाम तेथील जनतेला भोगावे लागणार आहेत. २ हजार, ४०० डॉलर्सचा वार्षिक अतिरिक्त भार म्हणजे, जवळपास दोन महिन्यांचे घरभाडे असे ढोबळमानाने म्हणता येईल. ही रक्कम निश्चितच जास्त आहे.

ट्रम्प यांच्या 'टॅरिफ' धोरणाचा परिणाम फक्त ग्राहकांवरच नव्हे, तर अमेरिकी उद्योगांवरही होणार आहे. वाहन उद्योग, तंत्रज्ञान क्षेत्र आणि रिटेल चेन यांना याचा फटका बसतो आहे. उदाहरणार्थ, वाहन उद्योगाचा विचार केला तर विदेशातून येणार्या सुट्या भागांवरचे कर वाढल्याने, गाड्यांची किंमत थेट वाढते. रिटेल चेनमध्ये वॉलमार्टसारख्या कंपन्यांना स्वस्त माल आयात करणे कठीण होते, ज्याचा थेट परिणाम विक्रीवर होतो. तंत्रज्ञान क्षेत्रात मोबाईल, संगणक, चिप्स यांचे उत्पादन महागल्याने, अमेरिकी कंपन्या स्पर्धेत मागे पडणार आहेत. ट्रम्प यांचे आयातशुल्क धोरण मुख्यतः चीनविरोधी आहे. चीन अमेरिकेला लुटतो, ही त्यांनी सातत्याने मांडलेली भूमिका आहे. तथापि, चीनकडून आयात होणाऱ्या स्वस्त वस्तूंवर मर्यादा आणल्याने, अमेरिकी ग्राहकांना स्वस्त पर्याय मिळत नाहीत. परिणामी अमेरिकेत महागाई अधिक वाढणार आहे. याउलट चीन पर्यायी बाजारपेठा शोधत असून, आफ्रिका, आग्नेय आशिया, लॅटिन अमेरिका येथे तो आपल्या उद्योगांचा विस्तार करतो आहे. त्यामुळे जागतिक व्यापाराचे संतुलन बिघडते.



ट्रम्प यांचा आयातशुल्क निर्णय आर्थिक नाही, तर पूर्णपणे राजकीय आहे. नोकर्या अमेरिकेत परत आणू, असे त्यांनी त्यांच्या जाहीरनाम्यात नमूद केले होते. निःसंशय काही उद्योगांना याचा फायदा होईल. उदाहरणार्थ, स्टील आणि अॅल्युमिनियम उद्योगाला यामुळे दिलासा मिळाला आहे. तथापि, हा फायदा अल्पकाळ टिकणारा असून, उत्पादन खर्च वाढल्याने इतर क्षेत्रांना त्याचा थेट फटका बसणार आहे.

आयातशुल्क वाढल्याने महागाई वाढते. महागाई वाढली की, अमेरिकी फेडरल रिझर्व्ह व्याजदर वाढवते. व्याजदर वाढले की घरकर्ज, वाहनकर्ज, विद्यार्थ्यांचे कर्ज हे सर्वच महागते. त्यामुळे आयातशुल्काचा परिणाम केवळ आयात वस्तूंवरच होणार नसून, संपूर्ण अमेरिकी वित्तीय व्यवस्थेवर होणार आहे. जगातील इतर देश ट्रम्प यांच्या या धोरणाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून पाहत नाहीत, ते याला 'अमेरिकन संरक्षणवाद' असे मानतात. जागतिकीकरणाच्या काळात अशा तुघलकी उपाययोजना, अमेरिकेला व्यापार भागीदारांपासून दूर नेणार्या ठरत आहेत.

'युरोपियन महासंघा'ने यापूर्वीच अमेरिकेला प्रतिआयातशुल्काचा इशारा दिला आहे. मेसिको व कॅनडानेही याबाबत आपली नाराजी व्यक्त केली आहे. भारतासह अन्य आशियाई देशांना, अमेरिकेच्या धोरणामुळे आपले स्थान मजबूत करण्याची चांगली संधी मिळाली आहे. अमेरिकन मतदारांसाठी ही परिस्थिती फारच गोंधळाची आहे. एकाबाजूला ट्रम्प नोकऱ्या परत आणण्याचे आश्वासन देतात, तर दुसर्या बाजूला रोजच्या वस्तू महाग होणार आहेत.

कामगार संघटना काही प्रमाणात ट्रम्प यांच्या पाठीशी आहेत; पण गृहिणी, शेतकरी आणि मध्यमवर्ग या धोरणामुळे नाराज झाले आहेत. ट्रम्प यांचे आयातशुल्क धोरण 'अमेरिका फर्स्ट' या घोषणेवर आधारलेले असले, तरी त्याचा परिणाम अमेरिकी जनतेवरच होत आहे. २ हजार, ४०० डॉलर्सचा वार्षिक अतिरिक्त भार, महागाईच्या दुष्टचक्राचे संकेत देणारा आहे. ट्रम्प यांची लोकप्रियता त्यांच्या आक्रमक धोरणांवर आधारली असली, तरी अमेरिकी बाजारपेठेत यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जागतिक व्यापाराचे तंत्र दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होत असून, आज अमेरिकेने उभी केलेली आयातशुल्काची भिंत तिच्या स्वतःच्याच बाजारपेठेला संकटात लोटणारी ठरणार आहे. संरक्षणवादाच्या नावाखाली चाललेले हे अतिरेकी प्रयोग अमेरिकी नागरिकांच्या जीवनमानाला धक्का देत आहेत.


अर्थात, ट्रम्प यांच्या 'टॅरिफ' धोरणामुळे अमेरिकी बाजारपेठेत जो आर्थिक भूकंप आला आहे, तो जागतिक अर्थव्यवस्थेसाठी इशाराही ठरला आहे. व्यापाराच्या विश्वात करांच्या भिंती उभारल्या की, त्याचा पहिला फटका स्वतःच्या जनतेलाच बसतो हेच अमेरिकेच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# शहरांचे पर्यावरणीय आरोग्य ढासळतेय...

**बदलत्या हवामानाचा परिणाम शहरांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे शहरातील कथित सामान्य सुरक्षित जीवन सातत्याने बाधित होत आहे. आजघडीला कधी शहरे पाण्याने तुंबतात, तर कधी पाण्याच्या टंचाईचा सामना करतात. शहरांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर असतो. शहरांच्या पायाभूत सुविधांवर भर देताना त्यांचे पर्यावरणही जपले पाहिजे, तरच शहरातील नागरिकांचे जीवन सुसह्य होईल.**



पावसाळा काही प्रमाणात अशांतता आणतो; परंतु ही अस्थिरता ही एक नवी सामान्य बाब बनत आहे, जी बदलत्या हवामानाचे लक्षण आहे. आपली शहरे वाढता वीज वापर, पाण्याची मागणी आणि बिघडत्या सार्वजनिक पायाभूत सुविधांशी झुंजत आहेत. ऊर्जा आणि पाणी प्रणालींवर दबाव आणत आहेत. कमी होत जाणारी हिरवळ, गायब होणारे तलाव, तुंबलेले नैसर्गिक नाले आणि खराब कचरा व्यवस्थापन या सर्वांमुळे मुसळधार पावसात शहरात पूर येतो आणि उष्णतेच्या लाटेत पाण्याची टंचाई निर्माण होते. या पृष्ठभूमीवर काही शहरांमध्ये झालेले काम इतरांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे.

निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांमध्ये नैसर्गिक किंवा मानवनिर्मित हिरवीगार जागा आणि पाणवठ्यांचा समावेश आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. 'तलावांचे शहर' उदयपूर हे हिरव्या आणि पाण्याच्या एकात्मिक पायाभूत सुविधा काय करू शकते, याचे एक उत्तम उदाहरण आहे. पावसाळ्यात, रामसर वेटलँड सिटी म्हणून ओळखले जाणारे उदयपूरचे तलाव वनस्पती आणि जलजन्य प्राण्यांनी भरलेले असतात. ते पावसाचे पाणी साठवतात. पृष्ठभागावरील प्रवाह कमी करतात. भूजल पुनर्भरण करतात.पर्यावरण थंड करतात आणि जवळच्या मोठ्या तलावांमधून येणारे पाणी शोषून घेतात. अशा पायाभूत सुविधा टिकवून ठेवण्यासाठी आणि हवामान आणि पाण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी लवचीकता निर्माण करण्यासाठी भारतीय शहरांनी तीन प्रमुख उपायांवर कृती केली पाहिजे. पहिले म्हणजे शहराच्या मास्टर प्लॅनमध्ये हिरव्या आणि निळ्या जागांचा समावेश केला पाहिजे. त्याचा विकास सामान्यतः २० वर्षांसाठी केला जातो. बेकायदेशीर भू-वापर बदलाविरुद्ध स्पष्ट कायदेशीर तरतुदी असायला हव्यात. शहरी अधिकाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, दीर्घकालीनदृष्ट्या ही नैसर्गिक संपत्ती जलसुरक्षा आणि पूर तसेच उच्च तापमान कमी करण्यासाठी महत्त्वाची आहे.

पाणथळ जागा (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ असूनही त्यात सर्व भारतीय राज्यांमध्ये पाणथळ जागा प्राधिकरणांची निर्मिती आणि संवर्धनासाठी निवडलेल्या पाणथळ जागा अधिसूचित करण्याची तरतूद आहे, तरीही केवळ गोवा, उत्तर प्रदेश आणि राजस्थानने या दिशेने प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे २०२७ पर्यंत एक हजार शहरी जंगले विकसित करण्याचे उद्दिष्ट असलेल्या नगर वन योजनेची अंमलबजावणी वेगात केली पाहिजे. दुसरे म्हणजे शहरांनी घरगुती सांडपाण्याचा पुनर्वापर व्यवस्थापित करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी विशेष योजना तयार केल्या पाहिजेत. अशा योजना स्थानिक जलाशय, तलाव तसेच जमिनीसारख्या शहरी जलस्रोतांचे सांडपाणी प्रदूषणापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे परिसंस्था त्यांच्या आवश्यक सेवा प्रभावीपणे प्रदान करू शकतात.

ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने (सीईईडब्ल्यू) केलेल्या एका अभ्यासात असे सुचविण्यात आले आहे की, एका मजबूत योजनेत पाण्याचे संतुलन आणि गुणवत्ता मूल्यांकन, पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याच्या उद्देशांसाठी (जसे की लॅण्डस्केप विकास, बांधकाम, रस्त्यावरील स्वच्छता, अग्निशमन केंद्रे, सार्वजनिक स्वच्छता सुविधा) पुनर्वापराचे पर्याय ओळखणे, पुनर्वापरासाठी व्यावहारिक लक्ष्ये निश्चित करणे, प्रक्रिया केलेल्या वापरलेल्या पाण्यासाठी वाटप यंत्रणा परिभाषित करणे आणि अंमलबजावणीसाठी संस्थात्मक रचना तयार करणे यांचा समावेश असावा. शहरांनी निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी स्थिर वित्तपुरवठा आणि नागरिकांचा सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. इंदूर आणि अहमदाबादमध्ये महानगरपालिका रोखे आणि राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधण्यासाठी वापरले जाणारे हायब्रिड वार्षिकी मॉडेल काय शक्य आहे ते दर्शवतात. सामान्यतः वनीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रीय भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण (सीएएमपीए) निधीचा वापर विद्यमान शहरी जंगले आणि हरित कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी केला पाहिजे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित पायाभूत सुविधांचे संचालन आणि देखभाल यासारख्या क्रियाकलापांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. पाणीपुरवठा, कचरा संकलन आणि विल्हेवाट आणि उद्याने आणि इतर हिरव्या जागांची देखभाल यासारख्या सेवांचा खर्च भागवण्यासाठी वापरकर्ता शुल्क आकारले पाहिजे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी अनुदाने सुरूच ठेवली पाहिजेत; परंतु शहरांनी नागरी जबाबदारीची मागणी करण्यास मागेपुढे पाहू नये. विकसित देशांमधील कोणतेही शहर सार्वजनिक सहभाग न घेता लवचीक पायाभूत सुविधा उभारू शकलेले नाही. भारतीय शहरे विकास, रोजगार आणि समृद्धीचे चालक आहेत; परंतु त्यांना हवामान धोक्यांचाही सामना करावा लागत आहे.

आपण शहरांचे पर्यावरणीय पाया (तलावे, जंगले आणि ड्रेनेज सिस्टिम) मध्ये गुंतवणूक करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचे भविष्य धोक्यात आणू. गेल्या काही दशकांमध्ये भारताने जलद शहरीकरण पाहिले आहे. भारतातील शहरांची वाढ मोठ्या प्रमाणात अनियोजित आहे. त्यामुळे अनेक आव्हाने आणि शहरी अराजकता निर्माण झाली आहे. अनियोजित शहरी वाढीचा सर्वात विनाशकारी परिणाम म्हणजे विद्यमान पायाभूत सुविधांवर दबाव. पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधांना वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी, पायाभूत सुविधांवर जास्त ताण येतो. तो त्याच्या रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरतो. यामुळे गर्दी, अपुरी सेवा आणि जीवनमान कमी होते. अनियोजित शहरी विकासामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. मर्यादित रस्ते जाळे आणि वाहनांच्या संख्येत अनियंत्रित वाढ यामुळे अनेक शहरांमध्ये प्रवास हा रोजचा संघर्ष बनला आहे. वाहतूक कोंडीमुळे केवळ मौल्यवान वेळ वाया जात नाही, तर इंधनाचा वापर, पर्यावरण प्रदूषण आणि आरोग्याचे धोकेदेखील वाढतात.

व्यापक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे ही समस्या आणखी वाढते. ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, विविध शहरी भागात झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राहणीमान आणि सामाजिक असमानता कमी होत आहे. याखेरीज, योग्य नियोजनाचा अभाव अनेकदा मौल्यवान जमिनीवर अतिक्रमणाला कारण बनतो. त्यामुळे गृहनिर्माण संकट आणि शहरी गरिबी वाढते. भारतातील अनियोजित शहरी विकासामुळे पर्यावरणाचे नुकसान झाले आहे. लोक अनेकदा वनजमिनीवर अतिक्रमण करतात. त्यामुळे जैवविविधतेचे नुकसान होते आणि परिसंस्थेमध्ये व्यत्यय येतो. अनियंत्रित बांधकाम, अयोग्य कचरा व्यवस्थापन आणि अनियंत्रित औद्योगिकीकरण प्रदूषण मातीची धूप आणि पाण्याची कमतरता निर्माण करते. शहरांची अनियोजित वाढ सामाजिक असमानता वाढवते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी शाश्वत शहरी नियोजन, पायाभूत सुविधा विकास आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांना एकत्रित करणारा बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. व्यापक शहरी नियोजनात गुंतवणूक करून, परवडणाऱ्या घरांना प्राधान्य देऊन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब करून आपण शहरांना चैतन्यशील, राहण्यायोग्य ठिकाणी रूपांतरित करू शकतो.

महानगरांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. कधी कधी मुसळधार पाऊस प्राणघातक ठरू शकतो. पावसाळ्यात मुंबई, चेन्नई आणि बंगळुरूसारख्या शहरांमधील रस्ते पाण्याखाली जातात आणि सामान्य लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. भारतीय शहरांमध्ये दर पावसाळ्यात पूर येणे सामान्य आहे. जलद शहरीकरणामुळे, शहरातील तलाव गायब होत असून नाले कचऱ्याने भरले आहेत.

अलिकडच्या वर्षांमध्ये अशा पुरांपूर्वी दिल्ली आणि बंगळुरूमध्ये पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. तिथे पाणी साठवण्याच्या जागा कमी झाल्या आहेत. या वर्षी पावसाळ्यापूर्वी बंगळुरूमध्ये असे पाणी संकट निर्माण झाले की, लोकांना आवश्यक कामांसाठी खाजगी टँकरमधून जास्त किमतीत पाणी खरेदी करावे लागले. जून महिन्यात देशाची राजधानी दिल्लीमध्येही अशीच परिस्थिती दिसून आली. जूनमध्ये कडक उन्हामुळे पाण्याचे संकट इतके बिकट झाले की, लोकांना पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागले. बंगळुरूप्रमाणेच दिल्लीतील लोकांनाही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागले. या परिस्थितीचा विचार करून शहरांच्या पर्यावरणीय संतुलनाचे नियोजन केले तर काहीसा दिलासा मिळू शकतो. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक)

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

# ॲन्टिथेसिस



ॲन्टिथेसिस हा एक इंग्रजी व्याकरणातील अफलातून प्रकार आहे. एका विशिष्ट प्रकारच्या वाक्यरचनेला 'ॲन्टिथेसिस' असे म्हणतात. इंग्रजी व्याकरणातील 'फिगर्स ऑफ स्पीच'मधील हा एक शब्द आहे. जेव्हा एका वाक्यात दोन अत्यंत परस्पर विरोधी शब्द किंवा कल्पना मांडलेली असेल तर त्यास 'ॲन्टिथेसिस' असे म्हणतात. भाषा ही वापरत असताना वेगवेगळ्या प्रकारे वापरली जात असते.

रोजच्या व्यवहारात वापरली जाणारी भाषा साधी, सरळ असून तिचा उपयोग हा संवादाच्या माध्यमातून भावना पोहोचविण्याकरिता केला जातो. परंतु जेव्हा हीच भाषा साहित्याचे रूप धारण करते तेव्हा तिचा वापर हा अलंकृत करून केला जातो. त्याकरिता वेगवेगळी मांडणी व ठेवण वापरली जाते; ज्यास प्रत्येकच भाषेमध्ये एक असाधारण महत्त्व आहे. इंग्रजी भाषादेखील यांस अपवाद नाही. त्यामधील 'फिगर्स ऑफ स्पीच' भाषेचा दर्जा वाढवून अलंकृत वाङ्मयीन अभिव्यक्ती करण्यासाठी मदत करतात. इंग्रजी भाषेचा वापर करताना सौंदर्य निर्मितीसाठी या ॲन्टिथेसिसचा उपयोग केला जातो. प्रत्यक्ष जीवन जगताना ते अत्यंत सुंदर व ताणविरहित बनविण्यासाठी या ॲन्टिथेसिसच्या तत्त्वांचा वापर करणारा एक मित्र मला भेटला.

मला त्याने साधलेल्या ॲन्टिथेसिस तत्त्वाचे फारच कौतुक वाटले. एका कंपनीमध्ये इंजिनीअर असलेला माझा मित्र या ॲन्टिथेसिस तत्त्वाचा वापर करून आपले जीवन सुंदर बनवतो तेव्हा मला त्याच्या कल्पकतेचा व त्याने जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या मानसिक बदलाचा गौरव करावासा वाटला.

समाजात वावरत असताना लोकांचे आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव येत असतात. कामाच्या ठिकाणी, सामाजिक क्षेत्रात कार्य करताना किंवा अगदी आपल्या घरामध्येदेखील बरेच वेळा आपल्या सभोवताली असलेल्या लोकांचे वागणे किंवा बोलणे आपल्याला खटकत असते. याला अनेक गोष्टी कारणीभूत असतात. कधी कधी लोक आपल्याला हवे तसे वागत नाहीत. कारण ते त्यावेळी त्यांना हवे तसे वागत असतात. कधी कधी आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे, हे नीट समोरच्या व्यक्तीपर्यंत न पोहोचल्यामुळे गैरसमज निर्माण होतात. त्यामुळे आपल्याला वाईट वाटलेले असते. कधी आपले काहीतरी दुखणे असते.

नेमके त्यावेळी सभोवतालच्या लोकांकडून त्याला सहानुभूती न देता चुकीचे वागले जाते किंवा कधी कधी खरोखरीच आपल्यावर अन्याय झालेला असतो. या सर्व वेळी आपल्याला सभोवतालच्या लोकांच्या वागण्याचा राग आलेला असतो. आपल्याला आलेला राग संबंधित व्यक्तीला बोलून दाखवून फायदा नसतो. अशा अडचणीच्या वेळी आपल्याला एखादा जवळचा मित्र किंवा मैत्रीण लागते, ज्याच्या जवळ आपण आपले मन मोकळे करतो. आपला जवळचा मित्र चांगला व समजूतदार असेल तर तो आपले सारे काही शांतपणे ऐकून घेतो. त्यासंदर्भात तो आपले कसे बरोबर आहे हेच सुचवितो. त्याने तसे म्हटले की, आपल्याला बरे वाटते. या प्रकारात एक भाग मात्र राहून जातो तो म्हणजे ज्या व्यक्तीचा आपल्याला राग आलाय त्या व्यक्तीबाबत मनात तयार झालेली अढी मात्र निघत नाही. त्या व्यक्तीचा आपल्या मनात निर्माण झालेला राग हा तसाच राहतो. हळूहळू आपण त्यांच्या संदर्भात जजमेंटल होऊ लागतो. त्याचा पुढे पुढे ताण येऊ लागतो. ताणामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या व्याधी जडतात. राग येणे जरी स्वाभाविक असले, तरी त्यावर उपाय म्हणजे माझा मित्र वापरत असलेला ॲन्टिथेसिस हा फॉर्म्युला. सहा वर्षांपूर्वी माझी या कलंदर मित्राशी ओळख झाली.

सुरुवातीला आम्ही एकमेकांशी सामान्य विषयांवरच बोलायचो. कालांतराने आवडी-निवडी सारख्या असल्याने छान मैत्री झाली. स्वाभाविकपणे आम्ही बरेच वेळा वेगवेगळ्या विषयांवर संवाद साधू लागलो. मैत्री जर मनापासून झाली तर ती घनिष्ठ व्हायला फार वेळ लागत नाही. त्यामध्ये विश्वास फार लवकर निर्माण होतो व तोच खरा मैत्रीचा आधार असतो. त्या विश्वासाच्या बळावर बरेचदा कधी कधी मनाला वाईट वाटलेले किंवा कुणाचे चुकीचे वागणे या संदर्भात विचारांचे आदानप्रदान सुरू झाले. तसा तो अतिशय जास्त संवेदनशील या पठडीत मोडणारा गडी होता.

आपल्या सभोवतालच्या लोकांसाठी खूप खूप करायचे, सर्वांची मनापासून काळजी घ्यायची, सर्वांसाठी झटायचे, अगदी मनापासून. परंतु त्यापैकी कुणी वाईट वागले की मग, मात्र त्याला फार फार वाईट वाटायचे. आपण त्याच्याकरिता इतके करतोय, पण त्याचा प्रतिसाद हा असा मन दुखावणारा का, याचा तो सतत विचार करीत राहायचा. यामाझ्या संवेदनशील मित्राजवळ एक युक्ती फार विशेष होती; ज्यामुळे त्याला सभोवतालच्या कुणाच्याही वागण्याचे वाईट वाटले तरी त्याबद्दलचा राग मनात घर करून बसायचा नाही. ती युक्ती होती तो वापरत असलेला ॲन्टिथेसिस. त्याच्या या ॲन्टिथेसिसची काही उदाहरणे वाचल्यावर लक्षात येईल की, ही युक्ती जर आपणही वापरली तर आपल्यालाही लोकांच्या वाईट वाटण्याचा राग येईल; पण तो राग मनामध्ये साचून त्याचा ताण मात्र कधीच येणार नाही. एकदा त्याच्या कंपनीतल्या सहकाऱ्याच्या चुकीच्या वागण्याबद्दल तो अतिशय चिडला होता. त्याला तो राग सहन होईना. कंपनीतून बाहेर पडता पडताच त्याने मला फोन लावला व कारच्या ब्ल्युटुथवरून माझ्याशी बोलू लागला...

''मित्रा, आज पार डोके खराब झाले यार. तो माझा मित्र असे कसे काय वागला? मी त्याला त्याच्याच भल्याचे सांगायला गेलो होतो. त्याने जर मी सांगितले होते त्याप्रमाणे ती मशीन सेट केली असती तर त्याचा वेळ वाचला असता व माझ्या सर्व प्लॅनिंगनुसार काम झाले असते. परंतु अर्धवट काम टाकून घरी गेला यार. हे काय वागणे झाले काय?''

वगैरे वगैरे. साधारण तीन मिनिटे तणतण केल्यानंतर मी त्याला म्हणालो की, ''तुझे बरोबर आहे. त्याने असे वागायला नको होते.'' मी असे म्हटल्याबरोबर त्याने पवित्रा बदलविला व हळू आवाजात म्हणाला, 'पण यार कदाचित त्याला घरी काहीतरी अर्जंट काम असेल म्हणून गेला असेल. ठीक आहे.'' अतिशय परस्पर विरोधी विचार, पण सकारात्मक विचाराने शेवट. मधेच केव्हातरी वहिनींच्या वागण्याबाबत खूप चिडला होता... ''किती सांगायचे यार तिला? माझ्याकडे तिचे हल्ली लक्षच नाही. सारखी मुलांमध्ये गुंतलेली असते. अरे काल तर मी कंपनीतून आलो. खूप भूक लागली होती आणि ही चक्क झोपलेली. असा राग आला यार. घरीच तर असते तरी माझा विचारच नाही.'' मी म्हणालो, ''हो रे! खरे आहे वहिनींनी तसे करायला नको.'' परत मी असे म्हणताच तो म्हणाला, ''पण तिचेही बरोबर आहे यार.

(पान ६ वर)

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

# अन्नसंस्कार -२ पूषा आणि अग्नी

संस्काराचा पहिला विधी पुजलेली चूल



विश्वाच्या या पसाऱ्यात पृथ्वीवर नांदणारी जीवसृष्टी समजून घेताना तिची काही वैशिष्ट्य माणसाला आपोआपच उलगडत गेली. त्यापैकी एक महत्त्वाचं लक्षण म्हणजे सजीव जन्माला येतो आणि मृत्यू पावतो. जन्म घेण्याच्या प्रक्रियेला प्रजोत्पादन म्हणतात. मग ते बीजाचं अंकुरणं असो की प्राणी जगतात घडून येणारं अलैंगिक आणि लैंगिक जनन असो; ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. त्यानंतर मृत्यूपर्यंत प्रत्येक क्षणी शरीराचं चलनवलन व्यवस्थित सुरू राहण्यासाठी ही ऊर्जा अपरिहार्यपणे हवीच असते. यात शरीराच्या विविध अवयवांची झीज भरून काढण्यापासून प्रत्येक पेशीचं भरणपोषण करण्यापर्यंतची सगळी कामं कशी बिनबोभाट होणं अपेक्षित आहे.

वनस्पती ज्या जमिनीत रुजतात तिच्यातलं पाणी आणि विविध उर्वरक (खतं) शोषून घेत सूर्यप्रकाशाशी प्रतिक्रिया करून ऊर्जा मिळवतात. प्राणी जगतातले शाकाहारी प्राणी प्रत्यक्ष वनस्पती चरून त्याचं रूपांतर ऊर्जेत करतात तर मांसाहारी प्राणी शाकाहारी प्राण्यांचं मांस खाऊन त्यातून ऊर्जा मिळवतात. थोडक्यात सूर्याची शक्ती वनराजी पचवते आणि तिच्या माध्यमातून इतर प्राणी जगतात प्रसारित केली जाते. सूर्याचा हा उपयोग ऋग्वेद काळापासून आपल्या पूर्वजांना माहीत होता. म्हणूनच त्यांनी सूर्याला पूषन् (संबोधन - पूषा) अर्थात पोषण करणारा असं म्हटलेलं आहे. त्याच्या या कामाची स्तुती करणारं पूषन् सूक्त (ऋग्वेद षष्ठ मंडल सूक्त ५७) देखील रचलेलं आहे.

अदितीच्या बारा पुत्रांपैकी हा सहावा आदित्य आहे. याचा निवास अन्नात असतो आणि हा सर्व प्रकारच्या धान्यांत विराजमान असतो. याच्या मुळेच अन्नात पौष्टिकता आणि ऊर्जा हे गुण येतात. अन्नात स्वाद आणि रस पूषाच्या तेजामुळेच निर्माण होतात. हा अज (बकरे) जुंपलेल्या रथावर आरूढ असतो. याच्या हाती लोहदंड असून त्याला तुपात घोळलेलं सातूचं पीठ हविर्द्रव्य (ज्याची आहुती दिली जाते) म्हणून अर्पण केलं जातं.

थोडक्यात अन्नात उष्मांक (कॅलरीज) असतात आणि त्यांचा उद्भव या पूषातून होत असतो, ही जाणीव प्राचीन भारतीय विद्वानांना होती. यज्ञ संस्कृतीचा पुरस्कार करणारी ही मंडळी अग्निदेवतेच्या माध्यमातून विविध देवतांना आहुती पोहोचवून त्यांना प्रसन्न करून घेतात तसंच मृत पूर्वजांना श्राद्ध कर्मात तर्पण पिंडदान अन्न करून तृप्त करतात. म्हणजे स्वर्गलोकातले देव असोत की पितृलोकातले पितर दोघांच्याही संतुष्टीचा मार्ग त्यांना अन्न अर्पण करून सुकर होतो. या सगळ्याचा विचार करताना आणखी एक बिंदू प्रकर्षानं जाणवला. तो थोडक्यात सांगते.

तेज तत्त्वाचं प्रत्यक्ष प्रत्यंतर म्हणजे सूर्य. पृथ्वीवरचा सूर्याचा प्रतिनिधी म्हणजे आग. आकाश, वायू, तेज, जल आणि भूमी या पंचमहाभूतांपैकी फक्त आगच असं महाभूत आहे, जे माणसाला उत्पन्न करता येतं. भारतीयांनी त्या दिव्यत्वाला अग्निदेव म्हणून स+अंग, सपरिवार, स+आयुध स्वरूपात पूजलं. त्यात त्याचं वाहन म्हणून योजला तो मेंढा. पूषाचा अज आणि अग्नीचा मेष असे एकाच जातीचे पण वेगळ्या प्रकारचे दोन प्राणी या दोघांतलं साधर्म्य आणि भिन्नता दोन्हीही दाखवतात. तर, पूषाच्या कृपेनं शेतात पीक येतं. 'शब्दकल्पद्रुम' नावाच्या ग्रंथात दिलेल्या श्लोकात कापणीला आलेल्या कणसात दडलेलं पीक म्हणजे सस्य. कापणी केलेलं कणीस मळून तुसासह दाणा बाहेर काढला की, त्याला धान्य म्हणायचं. तूसं दूर सारली की सुटा झालेला दाणा म्हणजे आम आणि तो शिजवला की म्हणायचं अन्न.

**सस्यं क्षेत्रगतं प्राहुः सतुषं धान्यमुच्यते ।**
**आमं वितुषमित्युक्तं स्विन्नमन्नमुदाहृतमब ॥**

प्रत्येक पायरीवर एक प्रक्रिया म्हणजे संस्कार करण्यात येतो. आम म्हणजे मराठीत धान्य हाती येण्यासाठी शेतीत विविध प्रक्रिया कराव्या लागतात. नंतर त्या धान्याची साठवण, निवडण करून दाणे भरडणं, दळणं, भिजवणं, मळणं, लाटणं, उकडणं, उकळणं, वाफवणं, भाजणं, परतणं, तळणं, शिजवणं, मुरवणं अशा विविध प्रक्रिया करावयाच लागतात. त्यात बहुतांश प्रक्रिया अग्नीचा योग्य ताप देण्यामुळेच घडून येतात. जगाच्या पाठीवर शिजवलेलं अन्न खाणारा एकमेव प्राणी म्हणून माणूस विविध देशांत वसला.

तिथल्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरून प्रत्येकानं स्वतंत्र खाद्यसंस्कृती निर्माण केली. पण आहारशास्त्राचा प्रदीर्घ आणि विस्तृत असा शास्त्रोक्त अभ्यास करणारे मात्र आपणच. आयुर्वेदाचा बहुतांश भर हा योग्य आहारावर देऊन रोग आणि अनारोग्य दूर ठेवण्यावर असतो. त्यामुळे अन्नावर कोणते संस्कार करायचे आणि कोणते करायचे नाहीत, याचे नियम अतिशय काटेकोर आहेत. याशिवाय कोणत्या पदार्थासोबत कोणता पदार्थ खायचा किंवा खायचा नाही, याचादेखील सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. पण संपूर्ण भारतीय उपमहाखंडात खारट पदार्थांना फोडणी घालण्याची जी काही विलक्षण पद्धती गेल्या अनेक शतकांपासून इथे पाळली जाते त्याला तोड नाही. कधी सुरुवात फोडणीनं केली जाते किंवा कधी शेवट. चुलीवरच्या स्वयंपाकाची लज्जत शतपटीनं वाढते ते वरून घातलेल्या निखाऱ्याच्या फोडणीनं. आसेतुहिमाचल आसिंधुसिंधु सगळीकडे फोडणी घातली जाते. फोडणीत घालण्याचे पदार्थ जवळपास सारखेच असतात. पण प्रत्येक प्रांताच्या फोडणीचा सुगंध आणि चव वेगवेगळी असते. पूर्वी आगपेटीचा शोध लागण्याआधी घराघरातल्या स्वयंपाकघरात चुलीत निखारा जपण्यात यायचा. त्याला गृह्याग्नी किंवा आवसथ्य अग्नी म्हणतात. गृहिणी दररोज शुचिर्भूत होऊन चुलीवर रांगोळी काढून हळदी कुमकुम वाहायची. त्यातल्या अग्निदेवतेचं पूजन करून नंतरच स्वयंपाकालासुरुवात करायची.

(पान ६ वर)

# एक संवाद: बाप्पाशी...

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

गजानना, गणराया, मंगलमुर्ती असलेल्या बाप्पा, तुझे मनापासून स्वागत. अरे, किती दिवसांपासून वाट पाहत असतो आम्ही तुझी. तुझ्या स्वागतासाठी आबालवृद्ध सारेच उत्सुक असतात. तू आलास ना बाप्पा की काय जादूची कांडी फिरवतोस ते तुलाच माहिती बाबा. पण सगळे वातावरणच बदलून टाकतोस. कालपर्यंत शांत शांत असलेले सारे वातावरण मंगलमय होऊन जाते. तू येताना चैतन्य घेऊन येतोस. आणि खरेच मंगलमुर्ती असलेला तू आमची मनेही भक्तिमय करून टाकतोस. तू येतोस फक्त दहा दिवस. पण जणू काही आमच्या घरातील एक सदस्यच तू होऊन आलेला असतोस. म्हणून तर तू जेव्हा जातोस ना तेव्हा आमच्या डोळ्यांच्या कडा नकळत ओलावतात. एखाद्या आईबाबांचा मुलगा वर्षभर परदेशात जावा, त्याच्या वाटेकडे त्यांनी वर्षभर डोळे लाऊन बसावे, आणि मग त्याचा निरोप यावा. हो, मी येतोय. मला सुटी मिळालीय. दहा-बारा दिवसांचीच आहे. हे ऐकल्यावर त्या आईबाबांचा हर्ष गगनात मावत नाही. त्याला आल्यावर कुठे ठेवू आणि कुठे नको असे त्यांना होऊन जाते. तसेच, अगदी तसेच रे बाप्पा, तसेच आतुरलेले असतो आम्ही.

तुझी वाट पाहत असतो, तुझ्या स्वागताची तयारी करीत असतो. पण खरे तर तू येतही नाहीस आणि जातही नाहीस. तू आत्मरूपाने सदैव राहतोस. या सृष्टीच्या चराचरात तू आहेस. पण तुझे हे प्रतिकात्मक आगमन आम्हाला प्रेरणा देणारे असते.

तुझ्या अवताराची कथा मोठी रम्य आहे. माता-पार्वतीने एका विशिष्ट उटण्यापासून, एक प्रकारच्या विशिष्ट माती पासून तुझी मूर्ति तयार केली असे सांगितले जाते आणि त्या मूर्तीला त्या आदिशक्ती पार्वतीने स्पर्श केला आणि गणेशा तू अवतीर्ण झालास. भगवान शंकरांनी तुला वर दिला की यापुढे तू गजमुख, गणेश, विनायक अशा नावाने ओळखला जाशील आणि पूजा, यज्ञादी पवित्र कार्यात तुझी प्रथम पूजा केली जाईल. तुला प्रथम पूजेचा मान मिळेल. तेव्हापासून हे मंगलमूर्ती, कोणत्याही कार्याची सुरुवात तुझ्या पूजेशिवाय होत नाही. भक्त तुला आवाहन करतात आणि प्रार्थना करतात की हे गणराया तू प्रसन्न होऊन हे कार्य सिध्दीस न्यावे आणि या कार्यातील संकटे दूर करावीत आणि तू ती करतोस.

भाद्रपद महिन्यात येणाऱ्या गणेश चतुर्थीला आम्ही तुझी पार्थिव मूर्ती घरी आणतो आणि तिचे पूजन करतो. पार्थिव म्हणजे जड असे आम्ही समजतो. पण खरे म्हणजे त्या पार्थिवात चैतन्याचा अंश असतो. अनेक वर्षे एखाद्या शिलेप्रमाणे पडून राहिलेल्या अहल्येला श्रीरामांच्या चरणांचा



पावनस्पर्श झाला आणि त्या जड पाषाणामध्ये चैतन्य निर्माण झाले. जाणिवेचा, शक्तीचा स्पर्श झाल्यावर त्यातून अहल्या बाहेर आली. तुझी पार्थिव मूर्ती ही या सृष्टीमध्ये अस्तित्वात असलेल्या पंचमहाभूतांपासूनच निर्माण होते. ज्यांचा या चराचरामध्ये ईश्वरी शक्तीचा वास आहे असा विश्वास आहे, अशा व्यक्तींना तुझी ही पार्थिव मूर्ती त्या ईश्वरी शक्तीचेच प्रतीक आहे असा विश्वास असतो. तुझ्याशी ते एकरूप होतात. तुला ते आपल्यातीलच एक समजतात आणि आपली सुखदुःखे तुझ्याजवळ मोठ्या विश्वासाने तुझ्याकडे व्यक्त करतात. तू त्यांचे दुःख निवारण करशील, समृद्धी आणि ज्ञान प्रदान करशील आणि सर्व जीवन मंगलमय करशील अशी त्यांची भावना असते. तुझ्या प्रति दृढ श्रद्धा असते.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी तुझ्या पार्थिव मूर्तीचे जलामध्ये विसर्जन केले जाते. बा गजानना, आम्ही म्हणजे तुझ्या भक्तांनी हे लक्षात ठेवायला हवे की तुझी मूर्ति मातीची असेल तरच ती निसर्गशी एकरूप होऊ शकते. म्हणजेच तुझी मूर्ति जर अनैसर्गिक वस्तूंपासून तयार केलेली असेल, तर ती जलामध्ये विरघळू शकत नाही. जलाचा अपार साठा असलेल्या समुद्रातही ती विरघळू शकत नाही. ज्या चैतन्यातून तुझी मूर्ति निर्माण झाली आहे ते चैतन्य पुन्हा निसर्गात विसर्जित होऊ शकत नाही. खरंतर पावसाळ्याच्या या दिवसात ओल्या मातीपासूनच तुझी मूर्ति करणे अपेक्षित असते, नाही का? जे स्वतःला निसर्गप्रेमी म्हणवतात त्यांनी तरी ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे आणि अनैसर्गिक गोष्टींपासून तुझ्या मूर्ती तयार करणे थांबवले पाहिजे. तुझ्या मूर्तीचे जे पूजन आम्ही करतो, प्राणप्रतिष्ठा करतो तेव्हा तुझी मूर्ती चैतन्याने भारीत होते. जेव्हा ही मूर्ती पाण्यामध्ये विसर्जित होते, तेव्हा हे चैतन्य जलामध्ये मिसळते आणि पाण्याच्या माध्यमातून त्याची वाफ होऊन आकाशापर्यंत जाते आणि पावसाच्या रूपाने हे पाणी परत पृथ्वीकडे येते. या सृष्टीमध्ये असलेले तुझे अस्तित्व कधीच नष्ट होत नाही, होऊ शकत नाही. अशा प्रकारे हे गजानना तुझे आशीर्वाद आम्हाला पुन्हा पुन्हा प्राप्त होत असतात. हा केवढा मोठा चमत्कार आहे!

अठराशेब्याण्णव मध्ये तुझा पहिला सार्वजनिक उत्सव झाला. तेव्हापासून तू नित्यनियमाने दरवर्षी सार्वजनिक उत्सवांमध्ये हजेरी लावतोस. तुझा उत्सव आधी कोणी सुरु केला ? लोकमान्य टिळकांनी की भाऊसाहेब रंगारी यांनी हे मला फार महत्वाचे वाटत नाही. कारण त्यापेक्षाही तू महत्वाचा आहेस. पण तुझा सार्वजनिक उत्सव सुरु झाला आणि स्वातंत्र्य चळवळीला एक वेगळाच रंग भरला. एक वेगळेच चैतन्य आले. तुझ्या भेटीच्या निमित्ताने लोक एकत्र येऊ लागले आणि जनजागृती होऊ लागली. स्वातंत्र्य जवळ आले. तसा तू आधी घराघरात येतच असायचास. अगदी ऋग्वेदापासून अनेक ग्रंथात आणि पुराणांत तुझे उल्लेख आढळतात. तुझ्या जन्माविषयी तर निरनिराळ्या कथा प्रचलित आहेत. आणि केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही तुझी मंदिरे आहेत. तुझे आराधना करणारे भक्त आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात जशी जनजागृती तुझ्या सार्वजनिक उत्सवातून झाली, तशी आणि तेवढ्या प्रमाणात आज होताना दिसत नाही. पण तरी आज विविध चलचित्र देखावे उभे केले जातात. त्यातून काहीतरी सामाजिक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न होतो. आणि त्यातून कळत नकळत जनजागृती होते. कधी कधी ऐतिहासिक वास्तूचा देखावा उभा केला जातो. कधी कधी एखाद्या पौराणिक कथेवर आधारित देखावा असतो.

कलाकार खूप मेहनत घेऊन हे देखावे तयार करतात. आणि तुझे भक्त आपल्या कामातून वेळ काढून हे देखावे पाहण्यासाठी गर्दी करतात. ते दिवसभराचे थकलेले असतात. पण तुझ्या दर्शनाने त्यांचा शीण कुठल्या कुठे पळून जातो. पण काळानुसार या चांगल्या गोष्टींसोबत काही वाईट गोष्टीही तुझ्या उत्सवात शिरल्या आहेत. तुझ्या उत्सवाचा राजकीय फायदा उठवणारे नेते आहेत. बळजबरीने वर्गणी वसूल करणारे आहेत. तुझ्या उत्सवासाठी विजेची चोरी करणारे आहेत. भले मोठे स्पीकर किंवा कानठळ्या बसवणारे डीजे लाऊन सर्वसामान्यांना दहा बारा दिवस वेठीला धरणारी मंडळी आहेत. कदाचित नको ती गाणी कर्कश आवाजात तुझ्यापुढे वाजवली जातात. दांडिया खेळला जातो. जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण इ. ना आमच्या अशा वागण्यामुळे हातभार लागतो. हे खचितच तुला आवडत नसावे. पण बाप्पा, तूच बुद्धी दे. आणि हे मळभ दूर कर रे बाबा. खरे तर तुझ्याकडे काही मागावे अशी आमची पात्रता नाही. कारण तू न मागता देणारा आहेस. विघ्नहर्ता आहेस.

खरं, तर तुझ्याकडून काही गोष्टी आम्ही शिकल्या पाहिजेत. तुझे सुपासारखे मोठे कान आम्हांला सांगतात की भरपूर ऐका. श्रवणाद्वारे ज्ञान ग्रहण करा. उत्तम श्रोते व्हा. लहान मोठ्या गोष्टी कानात साठवा. तुझे बारीक असलेले डोळे सांगतात की कुठल्याही गोष्टीचे नीट बारकाईने निरीक्षण करा. त्याशिवाय निष्कर्षाला पोहचू नका. तुझे विशाल उदार सांगते की जीवनातील सुखदुःख आपल्या उदरात सामावून घ्या. मोठी सोंड म्हणजे एखाद्या व्यक्तीची वा गोष्टीची चांगले किंवा वाईट दुरूनच ओळखण्याची क्षमता दर्शवते. तसेच संकटाना घाबरू नका धैर्याने सामोरे जा हे ही ती सांगते.

समर्थ रामदासांनी तुझी आरती लिहिली ती किती सुंदर आहे! त्यांनी अगदी योग्य विशेषणे वापरलीत तुझ्यासाठी. सुखकर्ता, दुःखहर्ता. खरंच तू सुखकर्ता आहेस. तुझ्या दर्शनाने दुःख नाहीसे होते. तू विघ्नहर्ता आहेस. म्हणून तर प्रत्येक शुभ कार्याच्या सुरुवातीला तुझे पूजन होते. अग्रपूजेचा मान तुलाच दिला जातो. सर्व वेद, शास्त्र, पुराणे तुझीच महती गातात.

त्यांची सुरुवात तुझ्या वंदनानेच होते. तू आदिदेव आहेस. बुद्धी देणारा आहेस. अथर्वशीर्षात तर तुझे किती छान वर्णन केले आहे. 'त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसी. 'असा तू आहेस. ज्ञानेश्वर माउलींनी तर ज्ञानेश्वरीची सुरुवात तुझ्या वंदनानेच केली आहे. शब्दरूप, तत्वरूप, नादरूप आणि ओंकार स्वरूप तू आहेस. लता मंगेशकरांनी आपल्या सुंदर आणि गोड आवाजात तो अभंग अजरामर केला आहे. तुलाही तो ऐकायला आवडत असणारच. मी ही आता तोच म्हणतो आणि थांबतो. गोड मानून घे. आणि तुझ्या मायेची पाखर सदैव आमच्यावर राहू दे.

**ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या।।**
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१।।**
**देवा तूंचि गणेशु। सकळमति प्रकाशु।।**
**म्हणे निवृत्ति दासु। अवधारिजो जी।।२।।**
**अकार चरण युगुल। उकार उदर विशाल ।।**
**मकार महामंडल। मस्तकाकारें।।३।।**
**हे तिन्ही एकवटले। तेथें शब्दब्रम्ह कवळलें ।।**
**ते मियां श्रीगुरुकृपें नमिलें। आदिबीज ।।४।।**



## करतो सांभाळ । पांडुरंग ।।

कुणाच्या कारणे । वेदना कुणाला ।।
उगाच जीवाला । तळमळ ।।१।।


असे सदाचार । ज्याचा नित्य नेम ।।
यातनाच ठाम । त्याचे भाळी ।।२।।

सात्विकाचे जिने । बोचते का जना? ।।
दांभिक सज्जना । छळतसे ।।३।।

ज्याच्या मना नाही । विकारांचा दंश ।।
जाण तोचि वंश । ज्ञाना-तुका ।।४।।

रामकृष्ण हरि । भजे सर्वकाळ ।।
करतो सांभाळ । पांडुरंग ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८



## गौराई

जगदंबेच्या भेटीची आस ध्यानी मनी
यराचे गोकुळ करून जाते भाग्यदायिनी
तीन दिवसांचा सण आरत्या आणि पूजा
पण वर्षभराची ऊर्जा देऊन जाते अष्टभूजा
भाविक भक्तांची परीक्षा घेते गुरुमाउली
अन् हत्तीचे बळ देते मायेची सावली
जीवनाच्या प्रवासातल्या कथा आणि व्यथा
लेकीच्या गुजगोष्टीत रमते जगन्माता
जड पावलांनी परततांना या माहेरवाशिणी
'थोड्यात गोडी' हा कानमंत्र देणाऱ्या जणू मैत्रिणी
तीन दिवसांच्या माहेरपणाला येते गौराई
आणि 'माय'ची ऊब देऊन जाते आई

मेघा लोहकरे

# गडावर आहे देवांची वस्ती

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

छत्रपती शिवाजी महाराज आज्ञापत्रात म्हणतात, 'गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण.' खरोखरंच आपल्या पूर्वजांनी गडकोटांवर असोशीने प्रेम केले आणि महाराष्ट्रात दूरवर पसरलेल्या सह्याद्रीच्या काळ्याकभिन्न कातळाने मराठमोळ्या प्रजेचे प्राणपणाने रक्षण केले. सह्याद्रीच्या राकट दगडांनी बनलेले गडकिल्ले स्वराज्याचा श्वास होता. रयतेचा ध्यास होता. पण या बळकट किल्ल्यांचा आत्मा मात्र त्यांच्या अंगाखांद्यावर विसावलेल्या देवदेवतांमध्ये आहे.उदंड यश देणाऱ्या प्राचीन मंदिरांमध्ये आहे. राजे म्हणायचे, 'स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा.' स्वराज्यासाठी गडावरील सर्व देवतांनी तलवारी उपसल्या. गडमंदिरातील सर्व देव-देवतांचा स्थायीभाव वीररसपूर्ण आहे.


हनुमान असो किंवा गणपती, दुर्गा मां असो किंवा इतर कोणी ग्रामदेवता; सर्व देवता जणू हाती त्रिशूळ-तलवारी घेऊनच जन्मल्या. कारण स्वराज्य निर्मितीच्या काळात गडकोटांचे रक्षण करण्यासाठी मावळ्यांच्या मनात वीरभाव जागृत करणे अतिशय गरजेचे होते. सह्याद्रीच्या प्रत्येक किल्ल्यावर देवदेवतांची अनेक अद्भुत रूपे आपल्याला पाहायला मिळतात. दुर्गा म तेची, शिवाची, गणेशाची अनेक वीररसपूर्ण रूपे गडदेवतांच्या रूपात शिवाजी महाराजांनी पूजली. त्यांची उपासना केली आणि आपल्या सवंगड्यांच्या मनात आत्मविश्वास जागा केला. सह्याद्रीच्या काळ्या कातळाने या गडदेवतांच्या रूपात स्वराज्याला भरभरून आशीर्वाद दिला. पूर्वीपासूनच व्यापारी बाजारपेठांवर गडांची देखरेख असायची.

जुन्नर नाणेघाट या सातवाहनकालीन व्यापारी मार्गाच्या संरक्षणासाठी उभा असलेला किल्ला शिवनेरी म्हणजे हिंदवी स्वराज्याचे भाग्यविधाते छत्रपती शिवरायांचे जन्मस्थान. यातील शिवाई देवीच्या प्राचीन गाभाऱ्यात दोन मूर्ती आहेत. एक मूर्ती चार हातांची असून तिच्या उजव्या हातात गदा तलवार आहे. शिवाई देवीचे वाहन असणाऱ्या सिंहानेही राक्षसावर हल्ला चढविला आहे. राक्षसाचे वाहन असणाऱ्या रेड्याला देवीने पायाने चिरडले आहे. या देवीच्या पुढे स्वयंभू तांदळादेवी उभी आहे. दोन्ही मूर्तींवर अखंड पाषाणातले कोरलेले घुमट आहे. जुन्नरमध्ये शिवनेरी तर आहेच; पण कुकडी खोऱ्यातली शिवनेरीसोबतची हडसर, जीवधन, चावंड ही दुर्ग चौकडी नाणेघाटावर टकमक नजर ठेवून आहे, असं अजूनही वाटतं. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला हा बलदंड चावंड



किल्ला. गडाच्या मध्यभागी एक गोलसर टेकडी आहे. त्या टेकडीवर चावंडेश्वरी देवी आजही मावळ्यांना आशीर्वाद देते आहे, असं जाणवतं. याच चावंड किल्ल्याच्या पश्चिमेला कुकडेश्वर हे झंझ राजाने नवव्या शतकात बांधलेले अद्भुत प्राचीन शिवमंदिर आहे. हडसर गडावर तलावाला वळसा मारून गेलो तर आपण थेट प्राचीन शिवमंदिरात पोहोचतो. हे मंदिर चिरेबंदी काळ्या दगडात बांधलेले आहे. गडकिल्ल्यांवर काही ठिकाणी पायथ्याशी मंदिरे बांधलेली आहेत तर काही मंदिरे मध्यावर आहेत. नारायणगावच्या पूर्वेला उभ्या असलेल्या नारायणगडच्या पायथ्याशी मुक्ताई मंदिर आहे. या मुक्ताई देवीला नमस्कार करूनच येथील ग्रामस्थ गड चढायला सुरुवात करतात. येथूनच जवळ आपण अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझरच्या गणपतीकडे जाऊ शकतो. जुन्नरच्या वायव्य भागात आणखीन एक गिरीदुर्ग आहे. त्याचं नाव निमगिरी. या किल्ल्यावर एक प्राचीन शिवलिंग आणि गजलक्ष्मीचे अप्रतिम शिल्प आहे. काही गडांवर पायथ्यावरच गणेश व हनुमान मंदिरे बांधलेली आहेत.

देवगिरी किल्ल्यावरील गणेश मंदिरात अतिशय सुबक अशी गणेशाची मूर्ती आहे. या गडावर दक्षिणमुखी हनुमान विराजमान आहेतच; पण हेमाडपंथीय शैलीचे अतिशय सुंदर असे शिवमंदिरदेखील आहे. परांडा जो भुईकोट किल्ल्याचा उत्कृष्ट नमुना मानला जातो, अशा किल्ल्यावरसुद्धा महादेवाचे सुबक मंदिर आहे. संतोषगडावरही एक महादेवाचे उत्कृष्ट मंदिर आहे. गंमत म्हणजे या मंदिराला तातोबा महादेव म्हणतात. तेथे एक साधू बुवा राहायचा म्हणे. त्यानेच हे मंदिर बांधले, असे म्हटले जाते. भवानी माता तर शिवाजी महाराजांचे आणि मावळ्यांचे आद्य दैवत. प्रतापगडावरील भवानी मातेचे सुंदर मंदिर बघितले की, डोळ्यांचे पारणे फिटते. छत्रपती शिवाजी महाराजांनी नेपाळमधील गंडकी नदीतून शालिग्राम शिळा आणली आणि त्यात ही मूर्ती घडवली असे म्हणतात. किल्ले प्रचीत गडावरही भवानी मातेचे सुबक देऊळ आहे. या मंदिरातली शस्त्रसज्ज भवानी मातेची मूर्ती पाहून हात आपोआप जोडले जातात. रायगडावरील



भवानी टोकाला लागूनच नैसर्गिक गुहेमध्ये भवानी देवीची स्वयंभू मूर्ती आहे. जुन्या कागदपत्रांमध्ये श्रीदेवी भवानी राजहुडा असा तिचा उल्लेख आहे. रायगडावर अजून एक देवी आहे.

होळीच्या माळ्याच्या डाव्या बाजूला शिर्काई या मुख्य देवीचे मंदिर आहे. तोरणगडाच्या सुरुवातीलाच बिनीचा आणि कोठीचा दरवाजा लागतो. आतमध्ये एक छानशी देवळी आहे आणि तोरणाजाई देवीच्या मूर्ती आहेत. किल्ले तोरणाचा विस्तार भलामोठा असल्याने महाराजांनी त्याचे नाव प्रचंडगड असे ठेवले होते. या किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी खणले असताना खणखण आवाज येऊ लागला. २२ हंडे सोन्याच्या मोहरा सापडल्या. त्याचा वापर त्यांनी राजगड बांधण्यासाठी केला होता. जेथे मोहरा सापडल्या तेथे महिषासुरमर्दिनी तोरणाजाईची स्थापना केली गेली. या तोरण्याच्या खोकड टाक्याच्या दक्षिणेस सर्वात उंच माथ्यावर मेंगाई मंदिर आहे. मेंगाईच्या वरच्या हातात तलवार आहे. दुसऱ्या हातात त्रिशूल आहे आणि खालच्या डाव्या हातात राक्षसाचे मुंडके आहे. पद्मावती माची राजगडाची मानाची माची समजली जाते. येथूनच राज्य कारभार चालायचा. न्याय निवाडे व्हायचे. पद्मावती माचीत सहाजिकच पद्मावती मंदिर आहे. पहिल्या शतकाची गोष्ट आहे. किल्ल्यामधील गुहेमध्ये ब्रह्मऋषी तप करत होते. त्यांची पत्नी पद्मावतीजवळच्या पर्णकुटीमध्ये राहात होती. तिच्यावरून या माचीला पद्मावती माची असे नाव पडले. ही मूर्ती महाराज स्वतः पुजायचे असं म्हणतात.

चांदवड किल्ल्याच्या पायथ्याशी रेणुका मातेचे हेमाडपंथी मंदिर आहे. डोंगरकड्यातच तिचा मुखवटा बसवला आहे. तिथले ग्रामस्थ सांगतात की, ही रेणुका माता सकाळी बालिका दिसते, दुपारी तरुण यौवना दिसते आणि संध्याकाळी कातरवेळी वृद्धा भासते. या मूर्तीचे पूजन महाराजांनी केले आहे. शिवरायांच्या पूजनातील मूर्ती भोरच्या पंत सचिवांनी पद्मावती तलावात विसर्जित केली होती. परंतु पंतसचिवांच्या स्वप्नात ती सतत येत राहिली. त्यामुळे त्यांनी पुन्हा ही मूर्ती तलावाबाहेर काढली.

सिंहगडाच्या मध्यभागी जो उंचवटा आहे तो सिंहगडाचा बालेकिल्ला आहे. या बालेकिल्ल्याच्या मध्यभागी कोंढाणेश्वराचे मंदिर



आहे. गाभाऱ्यात उत्तराभिमुखी महादेवाची पिंड आहे. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेला अमृतेश्वर भैरवनाथाचे मंदिर आहे. भैरव आणि त्याची शक्ती भैरवी अशा दोन उभ्या मूर्ती आहेत. भैरवाच्या हातातल्या मुंडातून रक्त पिण्यासाठी कुत्रा दोन पायांवरती तोंड वर करून आसुसलेला आहे. एक शिवबाण ज्याला चंद्रशेखर बाण म्हणतात, सिंहगडावर अगदी आत्तापर्यंत म्हणजे १९७६ सालापर्यंत होता. शिवकाळात एक साधुबुवा हा शिवबाण शिवपिंडीवर ठेवून तपश्चर्या करायचे. त्यांची धारणा होती की, शिवबाण ज्याला मिळणार तो सार्वभौम राजेपद भोगणार. बाजी पासलकरांनी शिवबाचे कर्तृत्व साधुबुवांना सांगून बाण त्यांच्याकडून आणून शिवबांना लाल महालात दिला. हा अद्भुतच बाण होता. हवेतून बाष्प शोषून घ्यायचा आणि नंतर थेंबाथेंबाने पाझरायचा. आक्रमण झाल्यावर पेशवे त्यांच्या सर्व सोन्याच्या मूर्ती सिंहगडावरच घेऊन जायचे. सिंहगडाचे दैवी माहात्म्य अपार आहे.

सातारा जिल्ह्यातील खटाव आणि कोरेगाव तालुक्याच्या सीमेवर असलेला वर्धनगड वर्धनी मातेच्या मंदिरामुळे लोकप्रिय आहे. वर्धनी माता प्रमुख ग्रामदैवत आहे. दुर्गाडी किल्ल्याची दुर्गा माता, अहमदनगर जिल्ह्यातील कळसुबाई शिखराच्या माथ्यावरची देवी कळसुबाई, कुर्डू गडावरची कुर्डाई देवी, रोहिडा किल्ल्यावरच्या वाघजाई बुरुजावर नांदणारी वाघजाई देवी, पटटागडची पटटाई देवी अशा अनेक ग्रामदेवतांनी महाराष्ट्राच्या रयतेला प्राचीन काळापासून कायम सुरक्षित ठेवले आहे.

रांगणागडावरची रांगणाई देवी म्हणजे कोकणातील लोकांचे आराध्य दैवत. तिच्या बाजूला शक्ती देवता हनुमान खंबीरपणे उभा आहे. विजयदुर्गाजवळ रामेश्वराचे कौलारू देवालय आहे. या मंदिरात ५० किलो चांदीची शंकराची मूर्ती आहे. दौलतमंगळ किल्ल्यावरचे भुलेश्वराचे दर्शन घेण्यासारखे आहे. १३ व्या शतकातील हेमाडपंथी मंदिर व या मंदिराच्या प्रांगणातील शिल्पकला बघून आपण जागीच थबकतो. वाद्यगायनात रंगलेले यक्षगंधर्व, हरीण सिंहाची झुंज अशी अनेक कोरीव शिल्पे येथे बघायला मिळतात. शिवपिंड आणि नागमूर्तीचे दर्शन घ्यायचे आणि नंतर गडावर फेरफटका मारायचा. शिवलिंगाच्या समोरच्या खळग्यात ठेवलेला प्रसाद देव खातो, अशी सहज धारणा भाविकांमध्ये आहे.

लोहगडच्या टहाळदेवाबद्दल एक गोष्ट ऐकायला मिळाली. एका मुगल सुलतानाने लोहगड ते विसापूरच्या तटबंदीपर्यंत एक दणकट दोरखंड बांधला. जो या दोरखंडावरून शेवटच्या



टोकापर्यंत चालत जाईल त्याला अर्धे राज्य इनाम मिळेल, असे जाहीर केले. गावच्या एका वीराने आव्हान स्वीकारले. तो दोरखंडावरून चालत गेला. पण अंतर पूर्ण करण्याच्या आत सुलतानाने दोर कापला. त्या अनाम वीराचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्या वीराच्या स्मरणार्थ एक शेंदूर लावलेला दगड बसवला आहे. येणारा प्रत्येक जण तेथे झाडाचा एक टहाळा वाहतो. म्हणून त्याला टहाळदेव म्हणतात. आता लवकरच गणपतीचे आगमन होणार. नवरात्रीमध्ये देवी शक्तीचे जागरण होणार. सह्याद्रीच्या गडकड्यांवर नांदणाऱ्या वीररसपूर्ण शक्तींचे या निमित्ताने स्मरण करूया...

# बालकवींचा श्रावणोत्सव

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

बालकवींच्या विविध निसर्ग कविता आजही काळाचा पडदा जिर्ण झाला तरी ताज्या आहेत असे म्हणावे लागेल. श्रावण महिना हा भारतीय संस्कृतीमध्ये एक महत्त्वाचा उत्सव प्रिय असा महिना असतो या महिन्यातील निसर्ग आपल्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेला असतो. या श्रावणाचे वर्णन बालकवींनी आपल्या श्रावणमासी या कवितेमध्ये ज्या सजीवतेने केले आहे ती सजीवता शब्द रूपाने रोमारोमात खळखळून वाहते.

आषाढाची पूर ओसरलेले असतात आणि श्रावणमासाचा उल्हास आपल्या परमोच्च सीमेवर उत्सुकतेने धाव घेत असतो. श्रावणमास, म्हणजेच पावसाळ्याच्या मध्याचा काळ-हिरवीगार झाडं, ओलसर मातीचा सुगंध, ढगांचे खेळ, पक्ष्यांचे पंख, गोपक्रीडा, आणि देवदर्शनाची लगबग, महादेवा जातो गा... म्हणत मन आणि कावड भरलेले महादेवाच्या दर्शनाला निघालेले कावडधारी. या सार्या गोष्टी आजही आहेतच, पण त्यांचं स्वरूप, सखोलता, आणि मानवी मनाशी असलेली नातेसंबंधाची रचना कालानुरूप बदलली आहे. म्हणजे महामार्गावर महादेवा जातो गा....अशा आवाजात जाणारे कावडधारी न दिसता डीजेच्या तालावर नाचत जाणारे कावडधारी आपल्याला आज दिसतात.

बालकवींच्या श्रावणमासी या कवितेकडे निसर्गाचे प्रतिबिंब शब्दात कसे उतरते या विचारातून पाहायचे झाले तर सौंदर्यरस, भावार्थ, आणि कालानुरूप साम्य-तफावत यांचा आपल्याला विचार करावा लागतो. बालकवी म्हणतात... श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे; क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे.

हा श्रावण म्हणजेच ओल्या हिरव्या आठवणींचा ऋतू. हर्ष मानसी- म्हणजेच आनंद मनात उसळतो आणि तो आनंद फक्त दृश्यमान सौंदर्यामुळे नाही, तर संपूर्ण वातावरणात निर्माण झालेल्या जीवनस्फूर्तीच्या चैतन्यामुळे आहे. क्षणात येते सरसर शिरवे- पावसाच्या सर येतात आणि त्याच झपाट्याने ऊन देखील पडतं. हे वर्णन म्हणजे श्रावणातील वातावरणाचा आणि त्या निसर्गनाट्याची विलक्षण अनुभूती आहे आहे. खरे म्हणजे बालकवींच्या काळात हिरवळ खरोखर सर्वदूर अनुभवता येत असे. शेती, कुरणं आणि बागायत यांचा संगम अनुभवता येई. त्यामुळे समोर जे दिसले त्याचे सुंदर शब्द चित्र बालकवींनी रेखाटले आज ऐकायला आणि वाचायला श्रावणमासी ही कविता असली तरी तिची अनुभूती मात्र आपल्याला पूर्णपणे घेता येत नाही कारण, आजच्या काळात हिरवळ फक्त काही ठराविक ठिकाणी मर्यादित झाली आहे.



**श्रावणमासी हर्षमानसी... ही कविता म्हणजे केवळ ऋतूवर्णन नव्हे, तर संपूर्ण भारतीय संस्कृतीचा, ग्रामीण भावविश्वाचा आणि भक्ति संवेदनशीलतेचा एक अनोखा उत्सव आहे. बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे (१८८५-१९१८) हे मराठीतील पहिले यथार्थ निसर्गकवी मानले जातात. त्यांच्या काव्यातील निसर्ग हे केवळ दृश्य नाही, तर ते भावनांचं, संस्कृतीचं, श्रद्धेचं आणि स्मृतीचं स्थान आहे.**

शहरांत 'हिरवळ' ही अनेकदा डिजिटल वॉलपेपर किंवा मोबाईल स्क्रीनवर दिसणारी गोष्ट झाली आहे. खेड्यापाड्यात अजूनही जिवंत असलेली हिरवळ आणि शिरवळ आज शहरात कुठेतरी हरवून गेली आहे. मात्र, पावसाच्या येण्याचं लहरीपण आजही तितकंच प्रभावी आहे, जितकं ते बालकवींच्या काळात होतं आणि मनही त्यावर तितकंच रोमांचित होतं. श्रावणमासी मध्ये पुढे कवी म्हणतात, वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे, मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे! इंद्रधनुष्य म्हणजे पृथ्वी आणि आकाश यांच्यामधील रंगांची नाळ. कविता इथे दृश्याचं संपूर्ण सांस्कृतिक रूपांतर करते. गोफ म्हणजे सुंदर रंगांची विणलेली घडी आणि तीही दुहेरी. त्याचे मंगल तोरण काय बांधिले ही उपमा अत्यंत भारदस्त आहे. आकाशच लग्नघरासारखं झालंय, जणू सृष्टीची पूजा, उत्सव आणि मानवसंस्कृती एकत्र येत आहे.

बालकवींच्या काळात आकाश प्रदूषणमुक्त होत, खऱ्या निळसर रंगांचं होत, इंद्रधनुष्य असा गडद रंगात मन मोहून घेत असतो. सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्या काळातील लोकांना त्याकडे बघण्याची फुरसत होती. आजचं आकाश साधारण धूसर आणि गर्दीने आक्रांदित असते. मुंबईसारख्या शहरात तर निळेभोर आकाश ही सुद्धा तिकीट लावून पाहण्याची गोष्ट होणार की काय असा प्रश्न पडतो. अस असलं तरी गावखेड्यात आजही, एखाद्या पावसाच्या सरीनंतर इंद्रधनुष्य दिसलं की तो मंगलत्वाचा अनुभव आजही मनात तसाच उमटतो. हा अनुभव आजही तितकाच ताजा आणि सप्तरंगी असतो. हा उन्हातला इंद्रधनू निवळतो तसे बालकवी हळूच श्रावणातल्या संध्येला हाक देतात. झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे तरू शिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे संध्याकाळचं सौंदर्य, सूर्याच्या झंळाळत्या किरणांनी सजलेली झाडं आणि घरं हे दृश्य म्हणजे सांजवेळेचा पवित्र अध्यात्मिक स्वरूप आहे. अहाहा! ही एक साधीशी उत्स्फूर्त अभिव्यक्ती आहे, पण तिच्यात आनंदाचा उत्कट क्षण साठलेला आहे. बालकवींच्या काळात, सूर्यास्त हे एक अनुभवाचं, ध्यानाचं निमित्त होतं. आजच्या संध्याकाळी, सूर्यास्त म्हणजे वाहतुकीचा त्रास, मोबाईलवर वेळ पाहणं, कदाचित तरीही, जेव्हा वेळ मिळतो, तेव्हा संध्याकाळचं हे रंगदर्शन आजही अंतर्मनात हलकं हलकं संचारतं.

उठता वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा; सर्व नभावर होय रेखिल सुंदरतेचे रूप महा. जलदांवरती संध्याराग ढगांवर खेळणारे असंख्य रंग म्हणजे निसर्गरचित रेखाचित्र. 'रेखिल' म्हणजे रेखाटलेलं. संपूर्ण नभ म्हणजे एक विशाल रंगमंच वाटतो. पूर्वी, या दृश्यांकडे पाहणं म्हणजे ध्यान, शांती, सौंदर्यदर्शन घडे. आज, आकाशाकडे पाहण्याची सवयच सुटलेली. 'आकाश' म्हणजे मोबाईल टॉवर किंवा ड्रोनसाठीचं मोकळं जागा. तरीही, जेव्हा एखादा लालसर संध्याराग मनासमोर येतो, तेव्हा जुनं काहीसं खोल खोल साद देतं. ही साद कधी उडणाऱ्या बगळ्याच्या रांगेला देणारे बालकवी म्हणतात,

बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची ते, उतरूनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते. बलाक थव्याचं आकाशातील उडणं म्हणजे सृष्टीचं एक नियोजित सौंदर्य. त्यांच्यासाठी 'कल्पसुमांची माळ' ही कल्पनाच इतकी सूक्ष्म व सौंदर्यविलासिनी आहे की ती केवळ नजरेतून नव्हे, तर हृदयातून येते.।'ग्रहगोलचि की एकमते' म्हणजे सृष्टीमधील सुसंवाद आणि एकसूत्रत होय. पूर्वी, बलाकांचे थवे नित्य दृश्य होते, शेतीभोवती पाणथळ जागी, नदी नाल्यांच्या किनारी होते.



'कल्पसुमांची माळ' हे सौंदर्यध्यान आजही जिवंत आहे किंवा तेच आठवणीतून साकार होतं. बगळे हीच एक श्रावणात फिरणारे मुक्त फकीर नाहीत, इतर पक्षीही आणि प्राणी हे ही बालकवींना भुरळ घालतात, फडफड करून भिजले अपुले पंख पाखरे सावरिती; सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती. असे म्हणत त्यांची दृष्टी सजीव सृष्टीकडे वळते. पक्षी आणि प्राणी यांच्या हालचालींचं अतिशय सूक्ष्म आणि करुणाभावयुक्त चित्रण करत, फडफड करून भिजले अपुले पंख पावसात भिजल्यावर पक्ष्यांची जी अस्वस्थ, पण उर्जायुक्त धडपड असते, ती इथे नेमकी पकडलेली आहे. हरिणी बाळांसह बागडते. हे चित्र म्हणजे प्रकृतीचं मातृत्व, वात्सल्याचा सजीव नृत्याविष्कार होय. कधीकाळी हे दृश्य प्रत्यक्ष कुरणात, जंगलाच्या कडेला सहज दिसायचं.

(पान ६ वर)

पान १ वरून

## तुझिये कृपेचेनि बळ

परिमार्जनासाठी हातातील शस्त्र उगारलेला गणेश समर्थांच्या भावसृष्टीत विराजमान आहे. म्हणूनच त्यांनी त्यांच्या स्फुरणदायी भाषेत त्याचे वर्णन केलेले आहे. या चौदा विद्यांच्या गोसाव्याचे समर्थकृत वर्णन आपल्याला नतमस्तक तर करतेच; पण भयचकितही करते.

संतश्रेष्ठ एकनाथांनीही भागवत पुराणाच्या प्रारंभी गणेशाला वंदन केलेले आहे. नाथ म्हणतात की, गणेश व्यक्त आणि अव्यक्त यांच्या पलीकडचा आहे. नाथांनी केलेल्या गणेशवंदनावर, ज्ञानेश्वरांनी केलेल्या गणेशवंदनाची बरीचशी छाप दिसून येते. तरीही त्यातील अभिव्यक्ती आणि अनुभूती नाथांच्या प्रतिभेला साजेशी आहे.



**पाहता नरु ना कुंजरू। व्यक्ताव्यक्तासी परू । ऐसा जाणोनि निर्विकारु। नमनादरु ग्रंथार्थी ।। प्रकृती पुरुष चरण दोनी । तळी घालिसी बोजावुनी। तयावरी सहजासनी। पूर्णपणी मिरविसी ।।**

नाथांनी श्रीगणेशाचे रूपक वाङ्मयीन न साधता बव्हंशी आध्यात्मिक वळणाने साधलेले दिसते. नाथ म्हणतात,'गणेशाचे प्रचंड मस्तक सुखरूप आहे. त्याचे तोंड हरुषाचे आहे. सोंड आनंदस्वरूप असून त्याच्या मुखात परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चारही वाणींचा वास आहे. त्याचा एकदंत हा अखंड एकत्वाचे दर्शन घडवितो.'

'तुजमाजी वसू चराचरा' अशी गणेशाची आणि चराचर सृष्टीची अद्वैतावस्था वर्णन करणाऱ्या एकनाथांनी

**'नमन एकदंता । एकपणे तूंचि आता ।**
**एकी दाविसी अनेकता । परि एकात्मता न मोडे ।।'**

या शब्दात अनेकत्व दर्शविणाऱ्या परंतु स्व-रूपात एकात्मता न भंगू देणाऱ्या अद्वैतरूप गणेशाचे दर्शन घडविलेले आहे. भावार्थ रामायणातही नाथांनी प्रारंभी जे गणेशस्तवन केले आहे, त्यात असेच म्हटलेले आहे की, **'यालागी जैसा अससी तैसियासी । नमन निरावकाशे सावकाशी । तव अंगत्व भुलले अंगासी । भज्य भजकांसी अद्वैत ।।'**

नाथांप्रमाणेच संत नामदेवांच्या गाथेमध्येही गाथेच्या प्रारंभी गणेशवंदन केलेले आहे. नामदेवांनी केलेली गणेशस्तुती शब्दालंकारयुक्त आणि चमत्कृतीपूर्ण नसली, तरी श्रद्धायुक्त भक्तीने ओथंबलेली आहे.

**'प्रथम नमू गजवदनु । गौरीहराचा नंदनु । सकळ सुरवरांचा वंदनु । मूषकवाहनु नमियेला ।।**

अशी प्रार्थना त्यांनी केली आहे. गणेशाच्या आराधनेचे फळ सांगताना नामदेव म्हणतात...

**सातवे रात्री मदनु शंभरे नेला । प्रद्युम्न समुष्ठामाजी टाकीला । तै कृष्णे विघ्नहरू पूजिला । प्रद्युम्न आला रतिसहित ।।**

'ज्ञानमोदक' या ग्रंथाचे कर्ते आणि एक थोर गणेशभक्त गोसावीनंदन यांनी जे गणेशाचे आध्यात्मिक रूपक वर्णिलेले आहे, ते सुद्धा साधकांना आकर्षित करणारे आहे. गोसावीनंदनांचा गणेश निरहंकाराचा शेंदूर लावतो आणि वैराग्याचे वस्त्र नेसतो. सत्त्वगुणांचा मुकुट आणि सुखदुःखाची कुंडले घालतो. चारही पुरुषार्थाची कंकणे घातलेला गणेश स्वानुभवाच्या मूषकावर आरूढ झालेला आहे.

मराठी सरस्वतातील हे विविध शैलीतील गणेश वंदन परंपरेने निर्माण झालेले आहे. गणपती हे दैवत केवळ विद्याध्यायन करणाऱ्यांचेच दैवत नाही. रंगभूमीवरील कलावंतांचेही ते अधिष्ठान आहे. मानवी जीवनात श्रद्धा, भक्ती, मांगल्य, कर्तव्यपरायणता, कलाविष्कार, विद्याभ्यास, शास्त्रावगाहन,म्हणून जे जे काही आहे त्या सर्वांविषयी अपरंपार निष्ठा निर्माण करण्याचे सामर्थ्य गणेशाच्या ठायी आहे.

गणेशाचे स्वरूप काळानुसार बदलत गेले. या बदलत्या जीवनालाही त्याचीच प्रेरणा आहे. बदलत्या रूपातही ही देवता प्रत्येक युगात लोकमानसाशी एकरूप झालेली दिसते. समाजधारणेच्या संकल्पनांना पोषक आणि लोकसंस्थांच्या संवर्धनांना प्रेरक अशा गणेशाने प्राचीन काळापासूनच समूहमन जिंकलेले आहे. लौकिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही पूजनात या देवतेला अग्रपूजेचा मान प्राप्त झाला आहे.

त्या श्रीगणेशाला, बुद्धिदात्याला एकाच प्रार्थना आहे की, या मातीतील संतांनी आणि सत्पुरुषांनी अपेक्षिलेली उच्च जीवनमूल्यांची आणि उदात्ततेची बीजे आमच्या हृदयात अंकुरावी; जेणेकरून सध्याच्या संभ्रमावस्थेतून आणि संक्रमणावस्थेतून भविष्याचा मार्ग सुकर होईल.

## महालक्ष्म्यै नमः।

ज्येष्ठेच्या नाकात सासूची पाणीदार मोत्याची नथ शोभून दिसेल तर कनिष्ठेच्या नाकात सूनबाईची नव्या पद्धतीची नाजूक नथ चापून बसेल. दोन्ही महालक्ष्म्यांच्या कानात मोत्याच्या कुड्या शोभतील. गळ्यात ठसठशीत मंगळसूत्रांच्या जोडीला नेकलेस, पोहेहार, राणीहार घातला जाईल.

काचेच्या बांगड्यांमध्ये सोन्याचे बिलवर, पाटल्या, गोठ या दागिन्यानी हात शोभिवंत होतील. बोटांमध्ये अंगठ्या चढवल्या जातील. कमरेला मेखला अडकवली जाईल. सासू- सुना, माय-लेकीचे दागिने ज्येष्ठा-कनिष्ठेच्या अंगावर चढतील. जगाला ऐश्वर्याचं दान देणाऱ्या महालक्ष्म्यांचं रूप त्या अलंकारांनी उठून दिसेल. ज्येष्ठा-कनिष्ठेच्या समोर त्यांची बाळं नव्या कपड्यात दागिने घालून नटून-सजून उभी राहतील. ती महालक्ष्मीमाय स्थुल आणि सुक्ष्म रूपाने चराचरात वास करून आहे. ती करवीरपूरवासिनी आहे. म्हणजे कोल्हापूरच्या महालक्ष्मीला आर्त भावाने साद घातली जाईल. महालक्ष्मी रूपातल्या स्त्रीशक्तीची पूजा करताना श्रीमहालक्ष्मीला श्रीसूक्ताने आवाहन केले जाईल...

हरि ॐ हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम् ।
चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ।।

श्रीसूक्ताने वातावरण मंगलमय होईल. बेलफुले, पत्री, तुळशीदल, सुगंधी अगरबत्ती, धूप-दीप वातावरण अधिक प्रसन्न सुगंधित होईल. महालक्ष्म्यांची पूजा, नैवेद्य, आरती सगळं यथासांग पार पडेल. सवाष्णी जेवायला बसतील. जेवणाच्या ताटात भात, वरण, सोळा भाज्यांची भाजी, फळभाजी, पातळभाजी, चटण्या, कोशिंबिरीचे अनेक प्रकार वाढले जातील. शिवाय वडे, भजे, पुरणाची पोळी, सांज्याची पोळी, साधी पोळी, कथली, करंजी, पाती, लाडू, मोदक, जिलेबी, आंबील असे अनेक पदार्थ वाढले जातील. पुरणपोळीवर पोळी भिजेपर्यंत सढळ हातांनी तूप वाढलेजाईल. काही जणांकडे अधिक काही पदार्थही असू शकतात. किमान वर लिहिलेले पदार्थ तर असतातच. माहेरच्या महालक्ष्मी सणाला सासुरवाशिणी त्यांच्या सासरी महालक्ष्मीचा कुळाचार नसेल तर आवर्जून माहेरी जातात. महालक्ष्मी आईची ओटी भरतात.

अहेव लेण्याचं, भरल्या ओटीचं मागणं मागतात. ती लक्ष्मीमाय भरभरून देते. जिच्या तिच्या पदरात मावेल, प्रारब्धात असेल तेवढं तिच्या समोर पसरलेल्या पदरात टाकते. स्त्रीमधल्या लक्ष्मी रूपाची, तिच्या समृद्ध रूपाची ही पूजा स्त्रीमधल्या मांगल्याची ही पूजा आहे. तशीच वात्सल्यमयी मातृत्वाची ही पूजा आहे. ही एकप्रकारे स्त्रीमधल्या शक्तीचीही पूजा आहे. स्त्री आणि तिच्या भोवती गुंफलेल्या नात्यांचा तिला आयुष्यभर वठवाव्या लागलेल्या विविध नात्यातील भूमिकांचा हा गौरव असतो.

## समृद्ध भारत

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

समृद्ध भारत म्हणताना केवळ आर्थिक वैभव इतका मर्यादित अर्थ अभिप्रेत नसून सर्वार्थाने समृद्धी असे आहे. आर्थिक संपन्नता होती म्हणून तर परकीय आक्रमकांनी ती अक्षरशः खरवडून काढली. इतके होऊनही गतवैभवाच्या अनेक खुणा आजही प्राचीन मंदिराच्या तिजोरीत आणि बंद दालनात दिसतात आणि त्या एखाद्या देशाच्या वार्षिक बजेटपेक्षा जास्त असतील. केरळच्या पद्मनाभम् मंदिराचे उदाहरण सर्वांना ज्ञात आहेच. मला अभिप्रेत असलेली संपत्ती मात्र निराळीच आहे. 'श्री' या शब्दाची व्यापकता विशाल आहे. त्यासाठी विष्णुसहस्रनामातील श्लोक अप्रस्तुत होणार नाही.

**'श्रीवत्सवक्षा श्रीवासः श्रीपतिः श्रीमतांवरः।**
**श्रीदः श्रीशः श्रीनिवासः श्रीनिधिः श्रीविभावनः।**
**श्रीधरः श्रीकरः श्रेयः श्रीमान् लोकत्रयाश्रयः।।'**

विष्णू कसा, तर या इतक्या-इतक्या वैभवांनी युक्त. आर्थिक संपन्नतेसोबत बौद्धिक, प्रातिभ, वैचारिक, नैतिक, आध्यात्मिक, प्रापंचिक, भौतिक, साहित्यिक, कला या आणि अशा असंख्य गुणांनी आमची श्रीमंती ओसंडून वाहत होती. आम्ही सर्वार्थाने समृद्ध होतो. गतवैभवाचे कौतुक सांगण्याच्या नादात आम्ही वस्तुस्थिती विसरतो. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' या म्हणीप्रमाणे आमचे हसे होते. अतिशयोक्तीची उदाहरणे सांगायची तर अशी- व्हॉटस्ॲपवर एक पोस्ट अनेकांनी निश्चितच वाचली असेल आणि तत्परतेने पुढेही पाठवली असेल. त्यात म्हटल्याप्रमाणे भीष्मांनी युधिष्ठिराला श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्र सांगितले. मात्र, काही दिवसांनी ते कोणालाच आठवेना. अशावेळेस सहदेवाजवळ म्हणे एक स्फटिक होता आणि त्यात ध्वनिमुद्रणाचा गुणधर्म होता. त्यात ते ध्वनिमुद्रित झाले होते. ते पुन्हा सर्वांनी ऐकले व नंतर व्यासांनी लिहून काढले.





सारांश काय तर आमच्या पूर्वजांना ध्वनिमुद्रण तंत्र अवगत होते. रेकॉर्डरमध्ये स्फटिकाचा उपयोग असतो हे खरे, पण म्हणून फक्त एकटा स्फटिकच काही ध्वनिमुद्रण करत नाही. अजूनही काही आवश्यक असते. जर सहदेवाजवळ हे यंत्र होते तर लगेच प्रश्न उत्पन्न होतो की जगात काय असे एकच यंत्र होते? जर असेल तर गीता उपदेशाच्या दिवशी ते कोठे होते? कोविड उच्छादातसुद्धा या लोकांना एक संधी आढळली. कोरोना या शब्दाची मोडतोड करून अनेकांनी तो शब्द शिवपुराणात शोधला आणि लगेचच या संकटाची जाणीव आमच्या पूर्वजांना होती, अशा पोस्ट पसरवल्या. हे कौतुक सर्वच क्षेत्रात आढळत असले, तरी वैद्यकीय, स्थापत्य या जिव्हाळ्याच्या आणि अंतराळ या कुतूहलाच्या विषयांत जरा जास्तच दिसते.


आधुनिक वैद्यकाने टेस्ट ट्यूब तंत्र सांगताच कौरवांच्या जन्मांत अनेकांना त्याचे मूळ दिसले. धन्वंतरी, चरक, सुश्रुत, वाग्भट, शारंगधरांच्या विद्वत्तापूर्ण योगदानाने प्रत्यक्ष वेदाइतके महत्त्व प्राप्त केलेल्या आयुर्वेदाचा आम्हाला दैनंदिन आयुष्यात विसर पडतो आणि अवयवारोपण तंत्र समजले की, शंकराने गणपतीला हत्तीचे डोके चिकटवले; ही कथा आम्ही हौसेने सांगतो. अथर्ववेदातील कृमिनाशक सूक्तातील जंतूंमुळे आजार होतात. या उल्लेखांचे आम्हाला लुई पाश्चरनंतर स्मरण होते आणि हळदीचे पेटंट हातून जाऊ लागताच तिची आयुर्वेदप्रणीत महती समजते. कोणतेही नवीन वैद्यकीय तंत्र आले की, हे सर्व आमच्या ऋषींनी पूर्वीच सांगितले होते, असे गोडवे आपण गातो. नासाने अंतराळात काही नवीन सांगितले की, आम्हाला ज्योतिष आणि वेदांतील नक्षत्रकथा आठवतात आणि त्यांचा अन्वयार्थ नव्याने लावला जातो. पृथ्वी गोल असून ती सूर्याभोवती फिरते हे आमच्या ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट आणि लगधवराहमिहिरांना ठाऊक असलेले सत्य, पण हा साक्षात्कार आम्हाला आजच का व्हावा? कॅलक्युलस किंवा गणितातील पाय आम्हाला माहीत असूनही आम्ही गप्प का बसतो? पायथॅगोरसची भूमिती दिसली की शूल्बसूत्रे आठवतात. बौद्धायन, भास्कराचार्य आणि वैदिक गणिताच्या सूत्रांचे स्मरण मुलांना ॲबॅकस शिकायला पाठवण्यापूर्वी का होत नाही? 'बळी तो कान पिळी' या डार्विनच्या सिद्धांताचे मूळ, उपनिषदातील 'जीवो जीवस्य जीवनम्' या शब्दांत आढळते. पण हे सर्व कधी तर डार्विननंतर. वनस्पतींना जीव असतो, भावभावना असतात, हे संस्कृत कवींच्या अद्भुत, रसिक आणि चिकित्सक बुद्धीने त्यांच्या विशाल साहित्यात जागोजागी लिहिलेच; पण महाभारतात भृगु आणि भरद्वाज महर्षींच्या विज्ञाननिष्ठ चर्चेनेही वनस्पती शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पंचविषयांचे ग्रहण त्यांच्या पंचज्ञानेंद्रियांतून करतात, हेच सांगितले. ४ वेद, ६ शास्त्रे, १४ विद्या, १८ पुराणे, ६४ कला, शेकडो उपनिषदे आणि या सर्वांच्या शीर्षस्थ असलेले श्रीमद्भगवत्गीतेतील तत्त्वज्ञान, पतंजलींचे योगशास्त्र या सर्वांची महती काय सांगावी? आमची विचारपद्धती निवृत्तीपर होती असे कारण सांगितले जाते, पण तसे नसून आयुर्वेद, वृक्षायुर्वेद, हस्त्यायुर्वेद, संगीत आणि नृत्यकलेचा गांधर्ववेद, वात्सायनाचे कामशास्त्र, युद्धशास्त्र शिकवणारा धनुर्वेद, कुस्ती, व्यायाम आणि मल्लशास्त्र सांगणारे मल्लपुराण यांची समृद्धी बघितल्यावर आमचे जीवन किती बहुरंगी-बहुआयामी होते, हे ठळकपणे समजते. मात्र, १४० कोटी लोकसंख्या असूनही ऑलिम्पिक स्पर्धेत १४० सुवर्णपदके मिळविणारे खेळाडू गेल्या ७५ वर्षांत मिळत नाहीत हेही खरे. लाल मातीतील कुस्तीचे डावपेच आम्ही विसरतो आणि मॅटवरील कुस्तीत रंगतो. साध्यासोप्या व्यायाम पद्धतीला, सूर्यनमस्कारांना दूर सारून हेल्थ क्लबमधील आधुनिक व्यायाम उपकरणांची आम्हाला भुरळ पडते. निरामय आयुष्यासाठी आचार पद्धती सांगणारा आयुर्वेद विसरून आजारी पडल्यावर विदेशी उपचार पद्धती आम्हाला जवळची वाटते. आधुनिक वैद्यकशास्त्राने हात टेकले की आम्ही वैद्याचे पाय धरतो.

आधुनिक शास्त्राला अज्ञात अशा अनेक गोष्टी आम्हाला ज्ञात होत्या हे खरे; पण बाहेरच्यांनी संशोधन केल्यावरच आम्ही जागे होतो हेही खरे. अगस्तीचे रासायनिक विद्युतघट, भरद्वाजांची विमानविद्या आणि बरेच काही आमच्याजवळ होते, ही वस्तुस्थिती आहे. अणुस्फोट झाला की दचकून जागे होत कणाद महर्षींचा अणू दृष्टीसमोर तरळू लागतो. विदेशातील स्थापत्याची अद्भुत आश्चर्ये बघताना महाभारतातील मयसभा आठवते. निसर्गाच्या रौद्र शक्तीपुढे हजारो वर्षे टिकून राहिलेल्या विशाल, आखीवरेखीव, प्रमाणबद्ध आणि सूक्ष्म मोजमापांच्या आविष्काराचे दर्शन घडविणाऱ्या वेरुळ शिल्पांची रहस्ये न उलगडता, ते लुप्त ज्ञान पुन्हा प्रकाशात कसे आणता येईल, याचा विचार न होता आम्हाला पिकनिकमध्येच आनंद वाटतो. सिव्हिल इंजिनीअरिंग विषयात मयसंहितेचा अभ्यास का केला जात नाही? आमच्या धातुविज्ञानातील प्रगतीची साक्ष आज दिल्लीतील लोहस्तंभ ऊन-पावसाला दाद न देता शेकडो वर्षे उभा आहे. नालंदा विद्यापीठातील ग्रंथसंपदा परकीय आक्रमकांनी पेटवून दिली. ती संपदा इतकी मोठी होती की, आग सतत सहा महिने जळत होती.

आमचे बहुतेक विचारवैभव जळून नष्ट झाले. उरलेसुरले ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञांनी त्यांच्या सोयीने बदलले. सुदैवाने जे थोडे वाचले त्याच आधारावर आम्ही पूर्वजांचे फक्त गोडवे गातो. काय चुकले यावर संशोधन व्हायलाच हवे कोणत्याही शास्त्रात जगात काही नवीन दिसले की, हे सर्व ज्ञान आम्हाला होते, हे सांगण्यात धान्यता वाटते. मग इतके दिवस आम्ही काय करत आहोत? नेमका दोष कोठे आहे? अतोनात परकीय आक्रमणे झालीत हे खरे; पण आपण ती का सहन केली? हवा तसा प्रतिकार झाला नाही. कारण शुक्रनीती, कणिकनीती, कौटिल्याची राजनीती आणि पंचतंत्रातील कथा आम्ही आचरणात न आणता फक्त ग्रंथातच ठेवल्या. सहिष्णुता आडवी आली. 'शठं प्रति शाठ्यं' हे आम्ही विसरलो. रोगनिदान हे वैद्याचे इतिकर्तव्य नसून त्याने योग्य उपायही करावेत शिक्षण क्षेत्रात स्वभाषेचे महत्त्व आम्ही समजून घेत नाही. 'संस्कृति संस्कृताश्रितः' संस्कृती ही संस्कृतच्या आश्रयाने राहते. शाकुंतल वाचून जर्मन पंडित गोएथे आनंदाने नाचला किंवा भारतापेक्षा जास्त संख्येने विदेशात संस्कृत विद्यापीठे आहेत, हे सांगताना आपणही संस्कृत शिकावे, अशी प्रेरणा काही घेत नाही.

(पान ६ वर)

# गणपती अथर्वशीर्ष : आत्मचिंतन, व्यवस्थापन आणि आत्मविकासाचे धडे



प्रासंगिक

कॅप्टन नितीन करंजीकर

भारतीय तत्त्वज्ञानाची सर्वांत मोठी देणगी म्हणजे उपनिषदे. वेदांतील चिंतन अधिक सखोल पद्धतीने मांडणारे हे ग्रंथ आजही मार्गदर्शक ठरतात. अथर्ववेदातील 'गणपती अथर्वशीर्ष' हे उपनिषद विशेष महत्त्वाचे आहे. गणपती म्हणजे प्रारंभीचा देव, विघ्नहर्ता, बुद्धीचा देव. परंतु गणपती अथर्वशीर्ष केवळ धार्मिक पाठ म्हणून मर्यादित ठेवणे योग्य नाही. यात आत्मसाधना, आत्मचिंतन आणि आत्मविकासाचे खोल संदेश आहेत. आजच्या आधुनिक युगात हे उपनिषद आपल्याला स्वतःची ओळख, व्यवस्थापन कौशल्ये आणि जीवन व्यवस्थापनाची दिशा देते. म्हणूनच हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून एक आत्मविकास आणि व्यवस्थापनाचे मार्गदर्शक पुस्तक आहे.

**१. उपनिषदातील मूळ तत्त्व :** 'तत्त्वमसि गणपतये' गणपती अथर्वशीर्षात स्पष्ट सांगितले आहे की, 'त्वं ब्रह्मा त्वं विष्णुः त्वं रुद्रः त्वं अग्निः त्वं वायुः' म्हणजेच गणपती हेच विश्वातील सर्व तत्त्वांचे मूळ आहे. यातून सामान्य माणसाला शिकवण मिळते की, आपल्या आतच सर्व शक्ती आहेत. आपणच आपला निर्माणकर्ता, पोषक आणि रक्षक आहोत. एकदा ही जाणीव झाली, की व्यक्तीमध्ये आत्मविश्वासाची आणि ध्येयपूर्तीची प्रचंड ताकद निर्माण होते.

**व्यवस्थापन धडा :** प्रत्येक व्यवस्थापकाने किंवा नेत्याने हे ओळखायला हवे की, त्याच्या टीममध्ये, कर्मचाऱ्यांमध्ये अथांग क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन आणि ओळख दिल्यास ही क्षमता संस्थेच्या उन्नतीस कारणीभूत होते.

**२. आत्मचिंतनाची गरज :** अथर्वशीर्षातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे आत्मसाधना. यात म्हटले आहे की, 'त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि' तूच ज्ञान आहेस, तूच विज्ञान आहेस. हा मंत्र व्यक्तीला स्वतःकडे पाहण्याची प्रेरणा देतो. माणूस बाहेरील जग बदलण्याआधी स्वतःकडे पाहतो का? स्वतःच्या ताकदी, उणिवा ओळखतो का? हे आत्मपरीक्षण केल्याशिवाय आत्मविकास शक्य नाही.

**स्वव्यवस्थापन धडा :** प्रत्येक व्यावसायिक, विद्यार्थी किंवा नेता यांनी जर दररोज थोडा वेळ स्वतःसाठी काढून आत्मचिंतन केले, तर त्याच्या निर्णयक्षमतेवर आणि कार्यक्षमतांवर उत्तम परिणाम होतो.

**३. भीतीवर मात करण्याचे धडे :** गणपतीला 'विघ्नहर्ता' म्हटले आहे. विघ्ने म्हणजे फक्त बाहेरचे अडथळे नसून मनातील शंका, आत्मविश्वासाचा अभाव, भीती ही सगळी खरी विघ्ने आहेत. अथर्वशीर्षातील ध्यानमंत्र 'एकदंताय विघ्ननाशिने' मनुष्याला शिकवतो की, भीतीवर मात करणे, हाच खरा यशाचा मार्ग आहे.

**व्यवस्थापन धडा :** व्यवसायात, कारकिर्दीत किंवा नेतृत्वात धोके घ्यावे लागतात. भीतीवर मात करून जोखीम स्वीकारून निर्णय घेणारा व्यक्तीच यशस्वी ठरतो.

**४. एकाग्रतेचे महत्त्व :** उपनिषदात सतत पुनरुक्ती करून गणपतीच्या गुणांचा जप करण्याची परंपरा आहे. याचा उद्देश मन एकाग्र ठेवणे हा आहे. ध्यान आणि जप यांमुळे मन विचलित होत नाही. एकाग्रतेमुळे व्यक्तीची निर्णयक्षमता वाढते.

**स्व-विकास धडा :** आजच्या माहितीच्या गोंधळात एकाग्रता हा सर्वांत मोठा गुण आहे. जो विद्यार्थी, व्यवस्थापक किंवा संशोधक लक्ष केंद्रित ठेवतो, तोच यश मिळवतो.

**५. व्यवस्थापनातील धडे :** गणपती अथर्वशीर्षातून अनेक व्यवस्थापन कौशल्ये शिकता येतात.

**(अ) निर्णयक्षमता :** 'त्वं बुद्धिरूपः' असे सांगितले आहे. म्हणजे गणपतीच बुद्धीचे मूर्त रूप आहे. व्यवस्थापकासाठी निर्णयक्षमता अत्यावश्यक आहे. योग्य वेळेला योग्य निर्णय घेणे, हीच खरी यशाची किल्ली आहे.

**(ब) संकट व्यवस्थापन :** गणपती विघ्नहर्ता आहेत. संकटसमयी धैर्याने, शांतीने आणि योग्य पद्धतीने मार्ग काढणे हा त्यांचा गुणधर्म. हे गुण व्यवस्थापकाने आत्मसात केले, तर टीम आणि संस्था दोन्ही सुरक्षित राहतात.

**(क) संसाधनांचा योग्य वापर :** गणपतीचे स्वरूपच प्रतीकात्मक आहे. मोठे कान, लहान डोळे, मोठे पोट.

**मोठे कान** - जास्त ऐकण्याची क्षमता

**लहान डोळे** - बारकाईने निरीक्षण करण्याची वृत्ती

**मोठे पोट** = सर्व अनुभव, गोड-कडू, सहन करण्याची ताकद

हेच गुण चांगल्या व्यवस्थापकाचे असतात.

**६. आत्मविकासासाठी दिशा :** गणपती अथर्वशीर्षात म्हटले आहे, 'स त्वं यः एव त्वं यः एव' म्हणजे तू जो आहेस, तोच श्रेष्ठ आहेस. यातून स्पष्ट होते की, दुसऱ्यांशी तुलना न करता स्वतःची प्रगती साधावी. आपल्या वैशिष्ट्यांवर काम करून आपणच स्वतःचे मार्गदर्शक व्हावे.

**आधुनिक जीवन धडा :** सोशल मीडियाच्या युगात तुलना आणि स्पर्धा वाढली आहे. पण या उपनिषदातून संदेश मिळतो की, खरी स्पर्धा स्वतःशी असावी.

**७. टीमवर्कचे महत्त्व :** गणपतीच्या उपासनेत 'गण' हा शब्द आहे. गण म्हणजे समूह. एकटा माणूस मोठे कार्य करू शकत नाही. एकत्र काम करणार्‍या समूहालाच यश मिळते.

**व्यवस्थापन धडा :** आजच्या कॉर्पोरेट जगतात टीमवर्कशिवाय यश मिळू शकत नाही. नेता हा फक्त मार्गदर्शक असतो; पण कामगिरी संपूर्ण टीमची असते.

**८. सकारात्मकतेचे तत्त्व:**

अथर्वशीर्ष सतत गणपतीच्या सकारात्मक गुणांचा जप करते. सतत 'त्वं' (तूच) असा पुनरुच्चार माणसाला सकारात्मकतेकडे नेतो. सकारात्मक विचार हेच आत्मविकासाचे मूळ आहे.

नकारात्मकतेवर मात करून यश मिळवणे सोपे होते.

**९. आधुनिक काळातील उपयुक्तता :** आज माणूस तणाव, चिंता, असुरक्षितता यांनी ग्रासलेला आहे. अशा वेळी गणपती अथर्वशीर्षाचा संदेश अत्यंत उपयुक्त ठरतो. आत्मविश्वास वाढवणे, ध्येय स्पष्ट करणे, टीमसोबत सुसंवाद ठेवणे, संकटातही स्थिर राहणे हे सर्व आधुनिक व्यवस्थापनाचे धडे या उपनिषदातून मिळतात.

गणपती अथर्वशीर्ष हे केवळ धार्मिक पाठ नाही, तर आत्मविकासाचे, आत्मचिंतनाचे आणि व्यवस्थापन कौशल्यांचे ग्रंथालय आहे. यातून आपल्याला आत्मविश्वास, धैर्य, सकारात्मकता, टीमवर्क, संकट व्यवस्थापन आणि नेतृत्वाचे धडे मिळतात. हे उपनिषद आपल्याला स्मरण करून देते की, यशाचा खरा मार्ग स्वतःच्या आत दडलेला आहे. जेव्हा आपण स्वतःच्या गुणवत्तांचा शोध घेतो, त्यांना पैलू पाडतो, तेव्हा आपणच आपले विघ्नहर्ता बनतो.

म्हणूनच गणपती अथर्वशीर्ष हे आधुनिक युगासाठीही एक 'कालजयी स्व-साहाय्य ग्रंथ' आहे.

# परमात्मा परेषू...

**विद्यार्जनाच्या संस्कृतीत जो साचलेपणा आलाय, किंवा जे ज्ञानप्रवाह कुंठित झाले आहेत, त्यांना पुन्हा एकदा प्रवाही करायला हवं. शिक्षणाचं उद्दिष्ट केवळ डिग्री मिळवणं नसून आपल्या आकलित ज्ञानाने या सृष्टीत चैतन्य निर्माण करणे होय. शिक्षणाने व्यक्तीला समाजात राहायला शिकवले पाहिजे. प्रत्येक शिक्षकानं खऱ्या अर्थाने सुशिक्षित, सुसंस्कृत, विज्ञाननिष्ठ आणि उद्यमशील भारत घडविण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध व्हावे. हाच शिक्षक दिनाचा त्यांचा संकल्प हवा...**



निमीत्त....

समिधा पाठक

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा वाढदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षकांनी किती व्यासंगी असावे, याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी आपल्या समोर ठेवला. मातीच्या गोळ्याचं सुंदर शिल्पात रूपांतर करणाऱ्या या व्रतस्थ शिल्पकारांना आपण या दिवशी विनयांजली अर्पण करतो. जरी विद्यार्थ्यांमध्ये क्षमता उपजत असली, तरीही अंगभूत गुणांचा विकास शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच होत असतो. विद्यार्थ्यांमधील ऊर्जास्रोत संवर्धित करून, या स्रोताला मानवतावादी दिशा देणं, हे शिक्षकांचं ब्रीद असतं. शिक्षक केवळ शिकवत नसतो, तर विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्रपणे ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता निर्माण करत असतो. अध्यापन हे शिक्षकाचं व्रत असतं आणि या व्रताची सांगता आदर्श विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतून होत असते. एक आदर्श शिक्षक हा सकारात्मकता, सातत्य, निष्पक्षता, लवचीकता, विनयशीलता इत्यादी गुणांनी परिपक्व असतो. शिक्षक म्हणजे सामाजिक, सांस्कृतिक ते सहपर्यायाने राष्ट्रीय जबाबदारीचा स्रोत. शिक्षक आयुष्यभर ज्ञान आणि धनसमृद्ध विद्यार्थ्यांच्या पिढीसह त्यांचे उज्वल भविष्य निर्माण करतात. भारतीय संस्कृतीत शिक्षकाचा पेशा फार पवित्र मानला जातो. पावित्र्य, सदाचार, विश्वास, ज्ञान आणि जिज्ञासा हे गुण शिक्षकाला अलंकृत करतात. चारित्र्य आणि सखोल ज्ञान हे शिक्षकाचे भांडवल असते. शिक्षक हा समाजाची आधारशिला असतो आणि तोच राष्ट्राचे भविष्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम करतो. शिक्षक आपल्या कार्याला तपाचे अधिष्ठान देत असतो. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे संबंध जितके सुदृढ असतील, तेवढं अध्यापन आणि अध्ययन सुकर होत असतं. केवळ अध्यापनकर्ता नव्हे, तर शिक्षकाला पालक, मित्र व सल्लागार अशा अनेक भूमिका निभवाव्या लागतात.

आजच्या विद्यार्थ्यांना शिक्षकांबरोबर मैत्रीचं नातं हवं आहे. नात्यात मोकळेपणा आला असला, तरी त्यातील आदर मात्र विद्यार्थ्यांनी कायम राखून ठेवायला हवा. विद्यार्थी व शिक्षक यांचे बंध-अनुबंध चैतन्यपूर्ण असायला हवे. नेणिवेकडून जाणिवेकडे घडवून आणणाऱ्या प्रवासात शिक्षकांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो, म्हणून तिमिराकडून प्रकाशाकडे नेणाऱ्या शिक्षकांनी विनम्र असणं हे फार गरजेचं असतं. शिक्षकाने आपल्या ज्ञानाचा गर्व न करता विद्यार्थ्यांना समजून त्याप्रमाणे स्वतःमध्ये बदल घडवून आणणारा आणि काळानुरूप वागणारा असला पाहिजे. शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व जितके विनयशील, संपन्न, व्यासंगी तितका परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या प्रेरणेवर होत असतो. म्हणून तत्त्वज्ञान कितीही बदलले, अध्ययन, अध्यापनाच्या प्रक्रियेत बदल झाला, तरी संस्कारक्षम शिक्षकांना पर्याय नाही.

तंत्रज्ञानाला शिक्षकांची सर नाही. आज तंत्रज्ञानाच्या युगात अभ्यासक्रमापासून सर्व माहिती एका क्लिकवर मिळते. पण, माहिती मिळवणे व ज्ञान ग्रहण करणे यात मोठा फरक आहे. याशिवाय आपले आचरण कसे असावे, हेसुद्धा तंत्रज्ञानाकडून शिकता येत नाही. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा 'विस्फोट' झालेला दिसतो. त्यामुळे विद्यार्थी पूर्वीप्रमाणे माहिती मिळवण्यासाठी शिक्षकांवर अवलंबून नाहीय. माहिती देण्यासाठी आज सुसज्ज वाचनालय व गूगलबाबासारखे माहिती महाजाल आहेत. अशा अनेक सोयी आजच्या विद्यार्थ्यांना अगदी सहज उपलब्ध आहेत. पण, या सोयींचा विद्यार्थी योग्य उपयोग करतोय का? माहितीच्या भंडारात विद्यार्थी भटकू शकतो. त्यामुळे योग्य रीत्या ज्ञान आकलनाची दिशा दाखवणं, योग्य माहिती फिल्टर करणं, माहितीचं योग्य व्यवस्थापन करून विद्यार्थ्यांना ज्ञानाची दीक्षा देणं, ही महत्त्वाची कामगिरी आजच्या शिक्षकांनी हाती घ्यायला हवी. त्या साधनांची योग्य ती 'दिशा' त्यांना खुली करून द्यावी लागेल. केवळ ५ सप्टेंबरला शिक्षक दिन साजरा करून शिक्षकांचा आदर होत नसतो. आज शिक्षकांवर व्हॉट्सॲपवर आचरट विनोद रचले जातात. शिक्षकीपेशा हे एक सतीचे वाण आहे. शिक्षकांनी ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसाराच्या कार्याकडे स्वतःला वाहून घ्यावे. आज कामाच्या व्यापात शिक्षकांना त्यांच्यातील सर्जनशीलता जपता येत नाही. शिक्षकाने निव्वळ अर्थार्जनाचे साधन म्हणून शिक्षणक्षेत्राकडे बघू नये. मुळात प्रत्येक 'शिक्षक' हा 'विद्यार्थी' असायला हवा. शिक्षकाने विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करायला हवं. विद्यार्थ्यांमधील जिज्ञासेला वाव द्यायला हवा. चिकित्सक, वैज्ञानिक आणि सत्यशोधक वृत्ती मुलांमध्ये वाढीस लागेल, यावर आपल्या शिक्षणपद्धतीत जोर द्यायला हवा. विद्यार्जनाच्या संस्कृतीत जो साचलेपणा आलाय, किंवा जे ज्ञानप्रवाह कुंठित झाले आहेत, त्यांना पुन्हा एकदा प्रवाही करायला हवं. शिक्षणाचं उद्दिष्ट केवळ डिग्री मिळवणं नसून आपल्या आकलित ज्ञानाने या सृष्टीत चैतन्य निर्माण करणे होय. शिक्षणाने व्यक्तीला समाजात राहायला शिकवले पाहिजे. प्रत्येक शिक्षकानं खऱ्या अर्थाने सुशिक्षित, सुसंस्कृत, विज्ञाननिष्ठ आणि उद्यमशील भारत घडविण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध व्हावे. काही ठिकाणी शिक्षकांना वाटतं, पालकांना आपल्या पाल्यांची पर्वा नाही. पालकांना वाटतं, शिक्षक विद्यार्थ्यांकडे लक्ष देत नाहीत आणि मुलांना वाटतं, दोघेही आपल्याला समजून घेत नाहीत. पालकांनी व शिक्षकांनी एकत्रितपणे जबाबदारी वाटून मुलांच्या मनातील ही अढी दूर करायला हवी. शिक्षक, विद्यार्थी आणि पालक हे समाजाचे आधारस्तंभ आहेत. या तिघांनी मिळून भक्कम सेतू बांधण्याची आवश्यकता आहे. संशोधकवृत्तीच्या विश्लेषक, कर्तृत्ववान व प्रयत्नशील विद्यार्थी आणि शिक्षकांची गरज आहे. प्रत्येक माणसामध्ये असलेल्या सुप्त गुणांचा विकास म्हणजेच खरे शिक्षण, हीजाणीव समाजाला करून देऊ या. विद्यादान या तपाचे अधिष्ठान करणाऱ्या मानवरूपी परब्रह्मांच्या साहाय्याने दिव्यत्वाचे प्रकटीकरण करून राष्ट्राचे हित करू या...

(लेखिका, स्त्री सशक्तीकरण व युवा चेतना या विषयांच्या स्तंभलेखिका आहेत.)

# जीएसटीतील सुधारणांचा फायदा कुणाला?

**भारतात जीएसटी लागू होऊन आठ वर्षे झाली. आता त्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्क लागू केल्यानंतर भारतात स्वदेशी वस्तूंच्या वापराची मोहीम नरेंद्र मोदी यांनी सुरू केली आहे. त्यासाठी बाजारात मागणी वाढविण्यासाठी सरकारने कर कमी करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. उत्सवकाळात उलाढाल वाढवून जीएसटी संकलन कमी होऊ न देण्याची दक्षता सरकार घेत आहे.**




आर्थिक

कैलास ठोळे

देशाच्या स्वातंत्र्य दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यमवर्गीय, सामान्य माणूस आणि लघु आणि मध्यम उद्योगांना दिलासा देण्यासाठी जीएसटीमध्ये सुधारणांची घोषणा केली. १ जुलै २०१७ पासून देशात जीएसटीची अंमलबजावणी सुरू झाली. त्यावेळी त्याचे वर्णन 'करक्रांती' असे करण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी करसुधारणा म्हणून त्याकडे पाहिले गेले असले, तरी 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास अजून २२ वर्षे वाट पाहावी लागणार आहे. आपण पाश्चात्त्य देशांमधून ही कल्पना स्वीकारली आहे; परंतु भारतासारख्या खंडप्राय देशात आठ वर्षांमध्येही ती पूर्णपणे लागू करणे शक्य झालेले नाही.

गेल्या सहा महिन्यांपासून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणांतर्गत जगातील विविध देशांवर आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेने निर्बंध लादण्याचा इशारा देऊनही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबविले नाही. त्यामुळे ट्रम्प यांनी आता ५० टक्के आयात शुल्काची अंमलबजावणी करण्याचे जाहीर केले. ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या बैठकीतूनही काहीच साध्य झाले नाही. अमेरिकेच्या नाक खुपसण्याच्या वृत्तीला भारताने विरोध करणे आणि धोरणात्मक निर्णयात लुडबूड करू न देणे हे योग्यच आहे. अशा परिस्थितीत ट्रम्प यांची एकाधिकारशाही वृत्ती पाहता आयात शुल्क कमी करण्याची शक्यता कमी आहे, असे गृहीत धरून मोदी यांनी 'स्वदेशी'चा नारा दिला आहे. अमेरिकेबरोबरच्या ८० अब्ज डॉलरच्या निर्यातीतील तफावत दूर करणे आणि स्वदेशीला चालना देण्यासाठी देशांतर्गत खप वाढविणे तसेच निर्यातीसाठी अन्य देशांचा शोध घेणे आवश्यक होते. खप वाढवायचा असेल, तर लोकांची क्रयशक्ती वाढविली पाहिजे किंवा वस्तू स्वस्त झाल्या पाहिजेत. त्यातील दुसरा पर्याय मोदी यांनी स्वीकारला आहे. त्यासाठीच त्यांनी जीएसटीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. याला पंतप्रधानांचे मोठे व्हिजन म्हटले जात आहे. केंद्र सरकारने सध्याच्या चार स्लॅबऐवजी दोन स्लॅब (५ आणि १८ टक्के) प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये वस्तूंना गुणवत्ता आणि मानक श्रेणीमध्ये ठेवले जाईल. त्याचा उद्देश मध्यमवर्गीय, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना दिलासा देणे आहे. लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आणि कृषी क्षेत्रावरील कराचा भार कमी केला पाहिजे. यासोबतच सामान्य माणसाच्या खिशावरील करांचा भार कमी होईल, यावर सरकारचा भर आहे. केंद्र सरकारने आणलेल्या प्रस्तावावर कोणत्याही एका बैठकीत मंत्रिगट सहमत होण्याची शक्यता कमी आहे. कारण हा प्रस्ताव बराच व्यापक आहे. त्याच्या बैठका आतापासून सुरू झाल्या आहेत. दिवाळीपूर्वी त्यावर निर्णय होऊन ऐन सणासुदीच्या काळात जास्त उलाढाल व्हावी आणि सरकारच्या जीएसटी संकलनावरही प्रतिकूल परिणाम होऊ नये, याची दक्षता घेतली जात आहे. यासोबतच जीएसटीची नोंदणी आणि परताव्यासंबंधी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व्यापक बदल केले जातील. त्यामुळे वेगवेगळ्या मंत्रिगटांमध्ये निर्णय घ्यावे लागतील. एका अधिकाऱ्याचे म्हणणे आहे की, गरज पडल्यास, सतत बैठका घेऊन प्रस्तावावर एकमत होईल. दिवाळीपूर्वी कार आणि दुचाकी खरेदी करणाऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी येऊ शकते. केंद्र सरकार वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) दर बदलण्याचा विचार करत आहे. त्यामुळे वाहने स्वस्त होऊ शकतात. सध्या प्रवासी वाहने आणि दुचाकी वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जातो. असे झाले, तर दिवाळीपूर्वी कार आणि दुचाकी खरेदी करणे सोपे होईल आणि लोकांचे पैसेही वाचतील. याशिवाय, इंजिनच्या आकारानुसार आणि वाहनाच्या लांबीनुसार १ ते २२ टक्के अतिरिक्त करदेखील आकारला जातो. यामुळे एकूण कर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचतो.

दुसरीकडे दुचाकी वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जातो. ३५० सीसीपेक्षा जास्त इंजिन असलेल्या वाहनांवर तीन टक्के अतिरिक्त कर आकारला जातो. आता त्यात सुसूत्रता आणली जाईल. त्यामुळे वाहने स्वस्त होऊ शकतात. उपकरही रद्द होणार आहे. त्याचा दिलासा खरेदीदारांना मिळेल. याचा फायदा सामान्य कार आणि बाईक खरेदीदारांना होईल. तथापि, महागड्या कार्सवर ४० टक्क्यांपर्यंत कर आकारला जाऊ शकतो. जीएसटीचे दर कमी केल्याने लहान कार आणि बाईक बनवणाऱ्या कंपन्यांना फायदा होईल. आजकाल या कंपन्यांना वाहने विकण्यात अडचणी येत आहेत. कारण वाहने महाग झाली आहेत आणि कर्जावरील व्याजही वाढले आहे. कररचनेनंतर वाहन विक्रीत प्रचंड वाढ होऊ शकते आणि उत्सवाच्या हंगामात विक्रीचा विक्रम मोडता येईल. प्रस्तावित जीएसटी २.० फ्रेमवर्क अंतर्गत सरकार वस्तू आणि सेवा कराचे दोन स्लॅब म्हणजेच ५ आणि १८ टक्के जीएसटी आणेल. विमा प्रीमियमवरील जीएसटी १८ टक्क्यांऐवजी शून्य किंवा ५ टक्क्यांच्या कक्षेत येऊ शकतो. याचा फायदा सामान्य लोकांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि विमा कंपन्यांना होईल. जीएसटीच्या दोन स्लॅबमुळे जीवन आणि आरोग्य विमा प्रीमियम, औषधे, टूथब्रश आणि केसांच्या तेलावर शून्य कर लागू शकतो. छोट्या कार, एसी, टीव्ही आणि फ्रीजवरील कर दर कमी होऊ शकतात. तथापि, तंबाखू आणि सिगारेट महाग होतील. अन्नपदार्थ, औषधे, वैद्यकीय उपकरणे, स्टेशनरी, शैक्षणिक उत्पादने, टूथब्रश आणि केसांच्या तेलासह आवश्यक वस्तू एक तर करमुक्त असतील किंवा पाच टक्क्यांच्या कक्षेत येतील.

सुधारणांनंतर टीव्ही, एसी आणि रेफ्रिजरेटरसारख्या वस्तू २८ ऐवजी १८ टक्के कराच्या श्रेणीत येऊ शकतात. सरकारने ऑटोमोबाईल्स, हस्तकला, कृषी उत्पादने, कापड आणि खते ही विशेष लक्ष देण्याजोगी क्षेत्रे मानली आहेत. यामुळे सिमेंट स्वस्त होऊ शकते. किरकोळ वस्तू आणि चप्पल-शूजदेखील स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. ट्रॅक्टरवरील सध्याचा १२ टक्के कर ५ टक्के स्लॅबमध्ये येऊ शकतो. एसी १८ टक्के कर स्लॅबमध्ये येऊ शकतो. सुधारणांच्या घोषणेमुळे वस्तूंची मागणी २.४ लाख कोटी रुपयांनी वाढण्याची अपेक्षा आहे. दरांमध्ये कपात केल्याने कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवरील भार कमी होईल. केंद्र सरकारने अमेरिकेच्या शुल्कवाढीला उत्तर देण्याची तयारी केली आहे. यासाठी वस्तू आणि सेवा करात मोठा बदल करण्याची योजना आहे. जीएसटीच्या कक्षेत येणारे बटर, फळांचा रस, सुका मेवा यासारख्या ९९ टक्के वस्तू पाच टक्क्यांच्या कक्षेत येतील. सोप्या शब्दांमध्ये सांगायचे, तर या वस्तू सात टक्क्यांनी स्वस्त होतील. त्याचप्रमाणे २८ टक्के कर श्रेणीत येणारे सिमेंट, एसी, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन यासारख्या ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये येतील. म्हणजेच त्या १० टक्क्यांनी स्वस्त होतील. सरकारने जीएसटी सुधारणांचा हा प्रस्ताव राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या गटाकडे पाठविला आहे. हा गट त्याचा अभ्यास करेल. त्यानंतर तो सप्टेंबरमध्ये होणाऱ्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत ठेवला जाईल. जीएसटी सुधारणांचे तीन प्रमुख आधार असतील. पहिली संरचनात्मक सुधारणा. यामध्ये कररचना सुधारली जाईल. दुसरी कर दरांचे तर्कसंगतीकरण करणे. त्यामुळे आवश्यक वस्तू स्वस्त होतील.

तिसरे नवीन नोंदणी आणि परतफेड सुलभ करणे. यामुळे इनपुट आणि आऊटपुट कर दरांमध्ये संतुलन येईल आणि इनपुट टॅक्स क्रेडिटचा संचय कमी होईल. या सुधारणांचा थेट फायदा सामान्य माणसाला होईल. कर कमी केला तर अधिकाधिक लोक आरोग्य विमा घेऊ शकतील. नव्या प्रस्तावानुसार कपडे, बूट आणि खते स्वस्त होतील. सध्या कपड्यांच्या कच्च्या मालावर १२ टक्के आणि तयार कपड्यांवर ५ टक्के जीएसटी आकारला जातो.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

(रविवार, ३१ ऑगस्ट ते शनिवार, ६ सप्टेंबर २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ३१ ऑगस्ट** - दुर्गाष्टमी, गौरी आवाहन (१७:२७ पर्यंत) ✻ **सोमवार, १ सप्टेंबर**- अदुःख नवमी, गौरी पूजन, भागवत सप्ताहारंभ, चंद्रदेव जयंती, उदासीन संप्रदाय वाशिम, संत चुडामणी महाराज पुण्यतिथी देगलूर ✻ **मंगळवार, २ सप्टेंबर**- गौरी विसर्जन (२१: ५१ पर्यंत), दोरे घेणे, घरगुती गणेश विसर्जन, रामकृष्ण परमहंस पुण्यतिथी, निसर्गदत्त महाराज पुण्यतिथी, गणेश यात्रा रेठरे बु., लक्ष्मणबुवा मोरजकर पुण्यतिथी आजरा ✻ **बुधवार, ३ सप्टेंबर**- परिवर्तिनी एकादशी, देवबाबा यळगुडकर पुण्यतिथी ✻ **गुरुवार, ४ सप्टेंबर**- वामन जयंती, तिथीवासर (सकाळी१०.१८ पर्यंत), बालमुकुंद, बालावधूत पादुका स्थापना दिन कोल्हापूर, दधिदान, क्षीरव्रत ✻ **शुक्रवार, ५ सप्टेंबर**- प्रदोष, शिक्षक दिन, डॉ. राधाकृष्णन जन्मदिन, गोविंदप्रभू जयंती (महानुभव), महम्मद पैगंबर जयंती, ईद- ए. मिलाद ✻ **शनिवार, ६ सप्टेंबर**- अनंत चतुर्दशी, जंगलीदास महाराज प्रकट दिन कोकमठाण, पर्यषण पर्व समाप्ती (दिगंबर), सुरदास ढेरे महाराज पुण्यतिथी कुची (ता. कवठेमहांकाळ), पौर्णिमा (उ.रात्री १.४१ नंतर)

**मुहूर्तः**- ✻ **साखरपुडा**- २, ४, ५, ६ सप्टेंबर ✻ **डोहाळ जेवण**- २, ५ सप्टेंबर ✻ **बारसे**- ४, ५ सप्टेंबर ✻ **जावळ**- ५ सप्टेंबर ✻ गृहप्रवेश- ४, ५ सप्टेंबर

### मेष :- श्री महालक्ष्मीची कृपा राहिल

रागाच्या भरात उच्चारलेले शब्द आयुष्यभरासाठी जखम करून जातात. शुक्रवारचा मंगळ- गुरू केंद्र योग यांत्रीक, आर्थिक क्षेत्रात प्रगती करणारा ठरेल. श्री महालक्ष्मींची कृपा आपणावर राहिल. सरकारी नोकरीत विशेष अनुकूलता राहिल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. शुभ ता. ३१, २, ५

### वृषभः- आर्थिक उत्कर्ष

प्रेमात संयम सर्वात मोठं औषध आहे. धनस्थ गुरूचा पंचमस्थ मंगळाशी होणारा केंद्र योग आर्थिक उत्कर्ष करणारा आहे. शिक्षण, अनुभवातून प्रगती होत जाईल. उपजत कला-गुणांचा विकास होत जाईल. नव्या योजना मार्गी लावता येतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. उपासना घडेल. शुभ ता. १, ४, ६

### मिथुनः- अपेक्षित संधी लाभतील

राग जोडीदारावर काढला तर नातं हळूहळू कोसळत. राशीतील गुरूचा सुखस्थ मंगळाशी केंद्र योग होत आहे. कला-गुणांतून अर्थार्जन घडेल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. अपेक्षित संधी लाभतील. फार दगदग करू नका. विचाराने रहावे. विधी, गृहनिर्माण अशा क्षेत्रात प्रगती घडेल. शुभ ता. ३१, ४

### कर्कः- उत्साहवर्धक घटना

प्रेमाला उब हवी असते, ज्वाला नाही. रागाला वश करून घ्या. राशीतील शुक्रामुळे कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. यांत्रीक, वैद्यकिय क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नोकरीत पदोन्नतीचे योग आहेत. नव्या संधीचे स्वागत करावे. धार्मिक, सामाजीक कार्यात पुढाकार घ्याल. उत्साहवर्धक घटना घडतील. शुभ ता. १,५,६

### सिंहः- उत्कर्षाच्या संधी

राग संपतो, पण त्याने केलेले नुकसान विसरता येत नाही. धनस्थ मंगळाचा लाभातील गुरूशी लाभयोग होत आहे. वाचेमध्ये असलेला दोष दूर करावा. आर्थिक उत्कर्षाच्या संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ४, ६

### कन्याः- मनासारख्या घटना

कुणाशी तरी बोलत जा, मनाला हलकं वाटेल. राशीतील मंगळाचा कर्मस्थ गुरूशी केंद्र योग होत आहे. उत्साह, धडाडीने विविध कामे करू शकाल. शांततेत सणवार साजरे करावेत. ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. संतती संबंधात शुभ घटना घडतील. विचाराने रहावे. शीघ्रकोपीपणा टाळावा. शुभ ता. २, ४

### तुलाः- नव्या कामात गती

ज्यांना पुढे जायचे असते, ते प्रतिकुलतेतही पुढे जात राहतात. इतर बहाणे सांगतात. गुरू- मंगळाचा केंद्र योग भाग्यवृध्दिंगत करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. वस्त्र प्रवरणे, गृह सजावट अशा क्षेत्रात प्रगती होईल. महत्त्वाच्या संधी लाभतील. सरकारी कामे होतील. प्रगतीच्या घटना. शुभ ता. २, ५

### वृश्चिकः-उत्कर्षाच्या संधी

दुसऱ्यांचे ऐकत राहण्यापेक्षा त्यांना जास्त समजण्याचा प्रयत्न करावा. राशी स्वामी मंगळाचा गुरूशी होणारा केंद्र योग आर्थिक प्रगती करणारा आहे. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. कला गुणांचा विकास होईल. कार्यक्षेत्रात उत्र्कषाच्या संधी लाभतील. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. चिंता नको. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ४, ५

### धनुः- सौख्याच्या घटना

काळ नदीसारखा असतो, एकाच पाण्याला आपण दोनदा होत लावू शकत नाही. गुरू- मंगळाचा केंद्र योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. जुने येणे वसुल होईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. विवाह विषयक कामे मार्गी लागतील. फार दगदग करू नका. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. फार चिंता करू नका. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २, ५

### मकरः- सौख्याच्या घटना

प्रवाह वाहून गेला की, तो पुन्हा कधीच परत येणार नसतो. गुरू मंगळाचा केंद्र कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. सुसंधीचे स्वागत करावे. शुभ ता. ३१, २, ५

### कुंभः- अडचणीतून मार्ग निघेल

जीवनात आलेले अनुभवच आपल्याला बदलत असतात. प्रगती करतात. गुरू- मंगळाचा केंद्र योग आर्थिक प्रगती करणारा आहे. संतती संबंधात शुभ घटना घडतील. सट्टा, लॉटरीपासून दूर रहावे. गुंतवणूक विचाराने करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. विलंबाने पण चांगली प्रगती होईल. चिकाटीने रहावे. शुभ ता. ४, ६

### मीनः- संघर्षातून प्रगती

देवांच्या भक्तीत इतकं बुडावं, आपल्या मागे काय चालू आहे, ते त्यालाच पाहू द्यावं. सुखस्थ गुरूचा सप्तमातील मंगळाशी केंद्र योग होत आहे. भागीदारीच्या व्यवसायात विचाराने रहावे. सर्वबाबतीत सामंजस्याची भूमिका ठेवावी. चिकाटीने रहावे. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात संघर्षातून प्रगती होत जाईल. फार चिंता करू नका. शुभ ता. ३१, ४

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर



# चांदवड



नाशिक जिल्हा दुर्गसंपदेने नटलेला आहे. या जिल्ह्यात सह्यात्त्रीच्या सेलबारी डोलबारी, अजंठा सातमाळ या उपरांगेवर अनेक दुर्गम दुर्ग वसलेले आहेत. मुंबई- आग्रा महामार्गावर नाशिक शहरापासून ६० किलोमीटर अंतरावर चांदवड गाव आहे. सातमाळ डोंगररांगेतील चांदवड किल्ला अगस्ती ऋषींशी संबंधित आहे. चांदवडपासून मनमाड व लासलगाव रेल्वेस्थानक फक्त २० ते २५ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे चांदवडला रेल्वेमार्गाने गेलात तरी सोयीचे आहे.

चांदवड हा नाशिक जिल्ह्यातील दुर्गम किल्ला असून किल्ल्याची उंची चार हजार फूट आहे. किल्ल्यावर पेशवे काळात बांधलेल्या टाकसाळीचे अवशेष, वाड्यांचे अवशेष, पाण्याची टाकी, कातळात खोदलेल्या गुहा तसेच चंत्तेश्वर महादेव मंदिर आणि गणपती मंदिर आहे. किल्ल्याला पौराणिक तसेच ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे. चांदवड किल्ला गडमाची आणि बालेकिल्ला अशा दोन भागात विभागला असून माचीवरील चंत्तेश्वर महादेव मंदिरापर्यंत खाजगी गाडीने जाता येते. चांदवड किल्ला पूर्व पश्चिम पसरला आहे, त्याचा विस्तार खूप मोठा आहे. चांदवड गावाच्या पुढे सहा-सात किलोमीटरवर किल्ल्याकडे जाणारा मार्ग आहे. चांदवड गावात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा अप्रतिम वाडा आहे तसेच रेणुका मातेचे सुंदर मंदिर आहे. प्रथम रेणुका मातेचे दर्शन घ्यावे. दगडी बांधकाम असलेले हे मंदिर व मंदिरात जाण्यासाठी बांधलेल्या पायऱ्या आकर्षक आहेत. त्यानंतर चांदवड गावातील होळकरांचा वाडा पाहून घ्यावा. हा वाडा भक्कम, भव्य-दिव्य तसेच अप्रतिम नक्षीकाम व काष्ठशिल्पाने नटलेला आहे. विशाल दरवाजा, भव्य सभागृह, उंच उंच मनोरे यामुळे वाडा राजेशाही भासतो. मल्हारराव होळकरांना पेशव्यांकडून चांदवड प्रांताची जहागीर मिळाली तेव्हा हा देशमुखी वाडादेखील मिळाला. हा खरं तर रंगमहाल आहे; मात्र त्याकाळी रंगमहालाची ओळख म्हणजे ऐषोरामाचे स्थान अशी होती म्हणून होळकरांनी वाड्यात काही बदल करून घेतले. येथील भित्तिचित्रांचा मान राखत वाड्याला एक कलाकेंद्र, न्यायासन व राज्य कारभार चालविण्यास उपयुक्त असे स्थान बनविले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची राजगादी, होळकर वंशाची वंशपरंपरा दाखविणारी छायाचित्रे, काही शस्त्रे, रेणुका माता व अहिल्यादेवी यांची प्रतिकृती ठेवलेली पालखी वाड्यात आहे. वाड्यातल्या खांबावरील नक्षीकाम, खिडक्यांची बांधणी, भव्य दरवाजे पाहून मन प्रसन्न होते.

होळकर वाडा पाहून झाला की चंद्रेश्वर मंदिराकडे निघावे. वाटेत एक मोठा तलाव आहे. तलावाच्या बाजूने किल्ल्याकडे तसेच चंद्रेश्वर मंदिराकडे जाण्याचा रस्ता आहे. अहिल्याबाई शिवभक्त होत्या. त्या शंभू महादेवाच्या साक्षीने राज्य कारभार करीत होत्या. चंद्रेश्वर महादेवाचे मंदिर साधारणतः आठव्या शतकात बांधले गेले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या आवारात काही मूर्ती तसेच मंदिराच्या बाह्यांगावर सुरसुंदरीच्या मूर्ती कोरल्या आहेत. चंद्रेश्वर महादेवाचे दर्शन घेऊन मंदिर परिसर फिरल्यावर, मंदिराच्या बाहेर कातळात कोरलेले टाके पाहून घ्यावे. जवळच असलेल्या मारुती मंदिरात दर्शन घेतले की वाटेतील दगडात बांधलेली भिंत आपले लक्ष वेधून घेते. या भिंतीत गणेशशिल्प तसेच भग्न वीरगळ आहे. भिंतीतील लोखंडी दरवाज्याच्या मागे कातळात कोरलेली गुहा व त्या गुहेत पाण्याचे टाके आहे. भिंतीच्या तळात गोमुख असून त्यातून लहान टाक्यात पाणी वाहत असते. थोडं पुढे चालत गेल्यावर एक गोलाकार तलाव दिसतो. या तलावाच्या काठावर काही समाधी बांधलेल्या दिसतात. तिथेच एका चौथऱ्यावर सात थडगीसुद्धा दिसतात. थोडं समोर एका घुमटीवजा मंदिरात श्री गणेशाचे दर्शन होते. समोरच्या पायवाटेने गड चढायला सुरुवात करायची, पठार गाठले की डावीकडे टांकसाळ आहे. टांकसाळीची इमारत उद्ध्वस्त झाली आहे. या रस्त्यावर अजून काही भग्न वास्तूंचे अवशेषदेखील दिसतात. टांकसाळ पाहून किल्ल्याच्या पश्चिम बाजूस चढण्यास सुरुवात करावी. या वाटेवर कातळात कोरलेल्या पायऱ्या आहेत. पायऱ्या चढत जाऊन आपण गडमाथ्याच्या कड्याखाली पोहोचतो. येथील बुरुज, तटबंदी उद्ध्वस्त झाली आहे. या कड्याच्या पोटात एका रांगेत १० ते १२ गुहा खोदल्या आहेत. येथील पायऱ्या इंग्रजांनी सुरुंग लावून तोडल्या. त्या पायऱ्यांचे दगड पसरलेले दिसतात. गडावर जाणारा पायरी मार्ग इंग्रजांनी नष्ट केला. त्यामुळे आता एका लोखंडी शिडीवरून बालेकिल्ला चढावा लागतो. शिडी खूप मजबूत नाही. त्यामुळे दोर तसेच इतर प्रस्तरारोहण साहित्य सोबत असल्यास सोयीचे होते. शिडीच्या उजव्या बाजूस एक शिलालेख आहे. येथून इंद्राई किल्ला, साडेतीन रोडग्यांचा डोंगर व सातमाळा डोंगररांगेचे विहंगम दृश्य दिसते. पुराणकाळात चांदवडजवळील एका डोंगरावर अगस्ती ऋषींचा आश्रम होता. चांदवड गावातील लोकांनी त्यांना रोडग्यांसोबत खाण्यास तूप दिले नाही म्हणून ते चांदवडला चांडाळनगरी असा शाप देऊन अंकाई किल्ल्यावर निघून गेले, अशी आख्यायिका आहे. नांदगाव येथे सापडलेल्या चालुक्य नरेश चांद्रदित्य यांच्या ताम्रपटात चंद्रादित्यपूर असा चांदवडचा उल्लेख आढळतो.

यावरून चालुक्य काळात हा किल्ला अस्तित्वात होता हे कळते. मात्र, किल्ला कोणी बांधला हा उल्लेख कुठे सापडत नाही. ११ व्या शतकात यादव काळातदेखील चंद्रादित्यपूरचा उल्लेख आढळतो. निजाम शाहीच्या काळात बागलाण प्रांतातील किल्ले अलिवर्दीखानाने जिंकले; त्यात चांदवड किल्लाही समाविष्ट होता. दुसऱ्या सुरत लुटीनंतर छत्रपती शिवाजी महाराज बागलाण प्रांतातून राजगडावर गेले. त्यावेळी हा प्रदेश औरंगजेबाच्या ताब्यात होता. त्यावेळी दाऊदखान खानदेशातून सैन्य घेऊन चांदवड किल्ल्यावर आला होता. त्यावेळी महाराजांना मोगलांशी याच परिसरात युद्ध करावे लागले, ती लढाई कांचनबारीची लढाई म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या वेळी मराठ्यांनी चांदवड घेण्याचा प्रयत्न केला होता. पुढे पेशवे पहिले बाजीराव यांच्या काळात चांदवड स्वराज्यात सामील झाला. काही काळाने नानासाहेब पेशव्यांनी मल्हारराव होळकरांना चांदवडची जहागीरदारी दिली. त्यावेळी या किल्ल्यांचा उपयोग तुरुंग म्हणून केला जात होता. होळकर परिवाराने या परिसराचा कायापालट केला. मल्हारराव होळकर गेल्यावर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी राणी म्हणून कारभार हाती घेतला. त्यांनी या परिसरातील मंदिरांचा जीर्णोद्धार केला. पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होऊ नये म्हणून अनेक विहिरी, तलाव खोदले. किल्ल्यांवरसुद्धा पाण्याचे सुयोग्य नियोजन केले. चांदवड परिसराचा विकास केला.

तुकोजी होळकरांच्या कारकीर्दीत थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मदतीने चांदवड किल्ल्यावर चांदीच्या रुपयांची टांकसाळ सुरू झाली. साधारणतः इ.स. १८०० पर्यंत ही टांकसाळ सुरू होती. इथे चांदीची नाणी पाडली जात असत. पुढे गडाचे किल्लेदार व टांकसाळ अधिकारी यांच्या वादामुळे टांकसाळ चांदवड गावात हलविली. त्यानंतर अहमद खान व आमिर खानाने चांदवड लुटले तसेच इंग्रजांनी हिंदुस्थानात आपले पाय रोवले. त्यानंतर इंग्रजांनी चांदवड किल्ला जिंकला व काही काळाने इंग्रजांनी चांदवडची टांकसाळ बंद केली.

चांदवडचा उल्लेख पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाशिवाय अपूर्ण आहे. ज्ञान, शौर्य, धर्म, कर्म, वचन, शासन या सहा-ही स्तरावर परिपूर्ण असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर! आपल्या हिंदुस्थानात अशा तत्त्वज्ञानी महाराणी होऊन गेल्या, ज्यांचे चरित्र आपल्या सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. सध्या आपण त्यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष साजरे करतो आहोत. अहिल्यादेवी यांनी देशातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. नवीन मंदिरे बांधली. काशी, गया, द्वारका, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, बद्रिकेदार, रामेश्वर असे आपले अनेक मानबिंदू असलेली धर्मस्थळे अहिल्यादेवी यांनी जपली.

काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत अहिल्यादेवी यांचे धर्मकार्य लक्ष वेधून घेते. धार्मिक व ऐतिहासिक स्थळे हे राष्ट्राचे मानबिंदू असतात. त्यांचे अस्तित्व टिकविणे हे राज्यकर्त्यांचे प्रथम कर्तव्य आहे, हीच शिकवण त्यांच्या कार्यातून प्राप्त होते. देव, देश आणि धर्म जपणारा राज्यकर्ता विश्वात वंदनीय होतो हे आपण अनुभवतो आहे. त्यामुळे अहिल्यादेवी यांचे धर्मकार्य प्रेरणादायी आहे व सदैव राहील.

पान २ वरून

## ॲन्टिथेसिस



खूप थकते ती पण. घरी असते म्हणजे रिकामी नसते. घराची सगळी काळजी घेते. सर्वांचे सगळे करते. कधीच तक्रार करत नाही. त्यामुळे एखाद्या दिवशी थकून झोप लागू शकते.'' परत संपूर्णपणे परस्पर विरोधी व त्या व्यक्तीला समजून घेणारे सकारात्मक विचार. राग येऊनही त्याचा ताण येऊ न देण्यासाठी वापरलेला ॲन्टिथेसिस.

सामाजिक परिस्थितीत किंवा कुटुंबात वावरत असताना आपल्या मनाविरुद्ध लोक वागणारच. कारण आपणही बरेच वेळा त्यांना हवे तसे वागत नसतो.

आपल्या बाजूने आपले खरे असते व म्हणून लोकांच्या वागण्याचा राग येऊ द्यावा. परंतु त्या रागासोबत जर ॲन्टिथेसिसप्रमाणे प्रत्येकाची बाजू समजून घेण्याचा आपल्याला आलेल्या रागाच्या विरुद्ध परंतु सकारात्मक प्रयत्न आपल्याला त्या रागाच्या ताणापासून मुक्त करू शकतो आणि आपले आयुष्य सुंदर होऊ शकते. सुरुवातीला जरी असा विचार करायला त्रास झाला तरी त्याची सवय निश्चितच करता येऊ शकते!

पान २ वरून

## अन्नसंस्कार - पुषा आणि...

अन्न संस्काराचा हा पहिला विधी आहे. 'चूल पेटणे' हा सगळ्यांच भाषांत वाक्प्रचार म्हणून रूढ आहे. चूल पेटली की पोटात अन्न जाणार हे ठरलेलंच आहे. कोणाकडची चूल विझली तर ती पुन्हा पेटवण्यासाठी शेजारच्या घरातून निखारा आणला जाई. शत्रुता-वैमनस्याची पराकाष्ठा म्हणजे विस्तव नाकारणे. म्हणून आपण मराठीत दोघांत असलेलं वितुष्ट किती पराकोटीचं आहे, हे सांगण्यासाठी म्हण वापरतो, 'त्यांच्यातून विस्तव जात नाही.' एकूण अन्नसंस्कारात पूषा आणि अग्नी यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

पान ५ वरून

## जीएसटीतील सुधारणांचा...

सुधारणांनंतर दोन्हीवर ५ टक्के जीएसटी असेल. यामुळे वस्त्रोद्योगाचा खर्च कमी होईल. केवळ वस्त्रोद्योग क्षेत्रावर ट्रम्प टॅरिफचा १० अब्ज डॉलर्सचा परिणाम होईल. नवीन सुधारणांमुळे टॅरिफचा परिणाम कमी होईल. खतातील इनपुटवरील कर १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करता येईल. यामुळे शेतकऱ्यांना खत खरेदी करणे स्वस्त होईल. भरपाई उपकर रद्द केला जाईल.

पान ४ वरून

## बालकवींचा श्रावणोत्सव

आज, हे दृश्य नॅशनल जिओग्राफिकच्या माध्यमातूनच जास्त दिसतं. मात्र, सजीवातील मातृत्वामध्ये असलेली उत्कटता, ही प्रत्येक काळात सारखीच असते, म्हणून ही कविता आजही तितकीच स्पर्श करते. खिल्लारे ही चरती रानी, गोपहि गाणी गात फिरे, मंजुळ पावा गात तयाचा श्रावणमहिमा एकसुरे. हे कडवे म्हणजे ग्रामीण जीवनाचे अभंगसदृश चित्रण आहे. खिल्लारे, पावा हे सारे घटक ज्या पद्धतीने एकत्र येतात, त्यातून श्रावणातल्या आनंदाची सांघिक लय तयार होते. बालकवींच्या काळात, 'गोप' ही प्रतिमा केवळ धार्मिक नव्हती, ती प्रत्यक्ष कृषीसंस्कृतीचा भाग होती. श्रावण महिन्यातील, गोप 'कृष्णजन्माष्टमी आणि गोकुळाष्टमीचा उरूस झाला आहे. आजही वाद्य, पाऊस आणि गीत हे तिन्ही संगतीत आले की, मन श्रावणात हरवायला तयार होतंच. हे हरवलेले मन फुलांच्या सुगंधात सापडते का? सुवर्णचम्पक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला, पारिजातही बघता भामा, रोष मनीचा मावळला! सुगंध, स्त्रीहृदय आणि मानसिक स्थिती यांचं विलक्षण एकत्रिकरण कवींनी केलेले आहे. सुवर्णचंपक, केवडा, पारिजात हे फुलांचे उल्लेख म्हणजे सुगंधाची लहर, जी फक्त नासिकेपर्यंतच नाही, तर मनाच्या अंतःस्थ गाभ्यापर्यंत जाते. भामा म्हणजे रुसलेली प्रेयसी, ती रुसली कारण पारिजात लागला रुक्मिणीच्या दारात मग भामेचा राग विरघळून टाकण्यासाठी परिजातकचा सडा मात्र तिच्या अंगणात आणि फुलांचा दरवळ तिचा पदरात पडतो! बालकवींच्या काळात, फुलं म्हणजे देवदर्शन, प्रेमभावना आणि निसर्गाशी नातं यांचं प्रतीक होती. आज, या फुले-पत्रीची खरेदी होते आणि पूजेसाठी डिजिटल मंत्र ऐकले जातात. तरीही, भक्ती आणि पवित्रता हे मूल्य आजही अनेक घरांमध्ये शांतपणे वसलेलं आहे. **देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात, वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत!** हा कवितेचा शेवटचा उत्कर्षबिंदू आहे. ललना देवदर्शनाला निघाल्या आहेत आणि त्यांच्या चेहर्यावरचे भाव हेच श्रावणाचं अप्रत्यक्ष गीत आहे. वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे. म्हणजे कोणत्याही शब्दांशिवाय, भावनाच व्यक्त करणारा चेहरा.श्रावण हा शब्दांनी नाही, तर मनाच्या विलोभनीय लयीने जाणवावा. ही अंतिम भावना कवींनी मांडली आहे. पूर्वी, ललना म्हणजे संयम, भक्ती आणि सौंदर्याचं मिश्रण होतं. आज, त्याच 'ललना' मोबाईल घेऊन सेल्फी काढतात त्याही मंदिरात दर्शन घेताना, पण त्यांच्या हृदयात देवदर्शनाची प्रेरणा असेलच. चेहर्यावरचा आनंद, मनातलं हर्ष ही नक्कीच कालातीत भावना आहे.

एकंदरीत श्रावणमासी हर्ष मानसी... ही कविता म्हणजे एक ऋतूगीत नाही, तर एक ऋतू- जीवन आहे. प्रत्येक कडवे हे फक्त दृश्य वर्णन करत नाही, तर त्यातून भारतीय मनोवृत्तीची सजीव लय, संस्कृतीची अंतर्धारा, सौंदर्याची अनुभूती प्रकट होते. बालकवींच्या काळात, निसर्गसौंदर्याचं अस्तित्व हे प्रत्यक्ष अनुभूतीतलं होतं. आजच्या काळात, ही अनुभूती आठवणीत, प्रतिमांमध्ये, सौंदर्य वाचनात आहे.

पान ५ वरून

## समृध्द भारत

संस्कृत हीच संगणकाच्या आज्ञावलीकरिता सर्वात सोयीची आणि सुयोग्य भाषा आहे, हे संगणकतज्ज्ञ 'उर्ध्वबाहुविरोम्यश्च' असे उच्चरवाने सांगत असूनही आपल्याच अनेकांना ती मृत भाषा वाटते हे खरे दुर्दैव. झाले ते झाले, पण स्वातंत्र्यप्राप्तीचा हीरक महोत्सव करण्याची वेळ आली तरी आमची अनास्था संपली नाही. यामागे अनेक स्वाभाविक, सामाजिक आणि ऐतिहासिक कारणे आहेत हे खरे. अभ्यासक्रमात राष्ट्राभिमान निर्माण करता येईल, अशा शेकडो जागा आहेत. चिंतनातील तल्लीनतेचे उदाहरण म्हणून 'युरेका युरेका' म्हणत रस्त्याने नागडे पळणाऱ्या आर्किमिडीजच्या उदाहरणापेक्षा पाणिनीचे उदाहरण सांगायला हवे. शिष्यांसह जंगलातून जात असता अंगावर आलेला वाघ बघितला अन् त्याच्या व्यापक घ्राणेंद्रियावरून व्याघ्र शब्दाची व्युत्पत्ती शिकवताना वाघाने पाणिनीला खाऊन टाकल्याची कथा लिहायला हवी. भारताच्या सीमेवरून पराभूत होऊन पळालेला अलेक्झांडर हा जगज्जेता नसून पहिले बाजीराव हेच एकमेव अपराजित सेनापती, असे शिकवायला हवे. अभ्यासक्रमातील इतिहासाचे पुनर्लेखन करायला हवे. अच्छे दिन येत आहेत जे काम स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्वरित सुरू व्हायला हवे होते त्याची सुरुवात आता होत आहे. 'राजा कालस्य कारणं।' राजाच्या आचरणावरून समाजाला वळण लागते. २०१४ पासून खूप काही बदलले. द्रष्ट्या आणि राष्ट्राभिमानी नेत्यांच्या हाती देशाची सूत्रे आली. भारतीय ज्ञानपरंपरा योजनेचा पुरेपूर उपयोग घ्यायला हवा. शेकडो नव्हे तर हजारो प्रबंध लिहिता येतील इतकी बीजे त्यात आहेत. गतवैभव पुन्हा प्राप्त होण्याची आशा आता पल्लवित झाली आहे. अपेक्षेपेक्षा थोडा उशीर होत असला, तरी पण पुन्हा एकदा सर्वार्थाने संपन्न भारत आपल्या हक्काच्या विश्वगुरुत्वपदी विराजमान होईल. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'इतिहासाची सहा सोनेरी पाने' हा ग्रंथ लिहिला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या शताब्दीपूर्वी सातवे पान लिहिले जावे.

# कोठडीतील श्वापदांवर मात !




सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

गेले दोन आठवडे, आतमध्ये दबा धरून बसलेल्या, जखमांची खबरबात घेतली, त्यांचे उर्वरित आयुष्यावर परिणाम बघितले. बालवयात अजाणतेपणी झालेले अत्याचार, आलेले घृणास्पद अनुभव, झालेले जीवनाचे असह्य दर्शन याच्या कचाट्यातून सुटका हा आजचा विषय आहे. पण दोन पराकोटीचे अनुभव इथे नमूद केल्याशिवाय राहवत नाही-

(१) किताब चित्रपटातील घर सोडून गेलेला लहानगा, रात्रभर रेल्वे प्लॅटफॉर्मवर थंडीने कुडकुडत असताना एका मृतदेहाच्या पांघरुणात रात्र काढतो आणि सकाळी हे कळल्यावर त्याची जी अवस्था होते, हे केवळ पडद्यावर अनुभवण्याची गोष्ट आहे.

(२) आणखी एका भयपटात वयात येत असलेल्या मुलींना कोणीतरी, काही दिवस गायब करतो आणि त्या परतल्यावर त्यांचा मासिक धर्म बंद होतो.

हे असं सगळं काल्पनिक मानलं तरी आपण परिणामांची चर्चा महत्वाची मानतो- असं होऊ शकतं, अशा कल्पनेनेच माणूस थरारतो. या सर्व दुष्टचक्रातून बाहेर येण्यासाठी आपणा सर्वांना असं प्रेम हवं असतं जे या आघातांच्या आठवणी धूसर करेल, हळूहळू मिटवेल. भूतकाळाच्या वेदना विरळ करेल. कधीकधी असं अस्सल प्रेम सापडणं अवघड असतं. पण आपली पात्रता नक्कीच तेवढी असते. त्या प्रेमाच्या साठ्यातूनच आपण स्वतःवर प्रेम करायला शिकतो. स्वतःचा विकास करून घेऊ शकतो. मग आनंद आपसूक डोकावतो प्रत्येक क्षणी. आपण कितीही क्षतिग्रस्त असलो तरी त्या क्षतींना हळुवार हाताळणारं प्रेम पुरेसं असतं.

रुग्णाच्या मनाचा ठाव घेऊन सापडणाऱ्या आघातांवर उपचार करण्यासाठी मुळात त्याला समजून घेणे गरजेचे असते. एकदा भावनिक गरजा लक्षात आल्या की त्यांना हाताळणारे मार्ग शोधता येतात आणि त्याचवेळी दुःखद विचार, आस्था आणि वर्तनावर नियंत्रण मिळविणे सोपे जाते.

**तीन टप्पे असतात या प्रक्रियेचे -**

मूल्यांकन, प्रशिक्षण आणि उपचार. मूल्यांकनात सध्या अस्तित्वात असलेले सक्रिय साचे शोधणे आणि रुग्ण त्यांच्याशी कसे जुळवून घेतोय याचा मागोवा घेणे. यापुढे जाऊन रुग्णाच्या सध्याच्या मानसिक अवस्थेचे कल्पनाचित्र निर्माण करणे आणि त्याद्वारे आधीच्या वेदनादायी अनुभूतीच्या जागी सुयोग्य भावना स्थापन करणे.

**साचे-** स्व-घातक भावनिक आकलनाचे मार्ग जे बालपणी सुरु होऊन आयुष्यभर त्यांची पुनरावृत्ती होत असते. हे सकारात्मक वा नकारात्मकही असतात.

**भावनिक गरजा-** माणसाच्या मूलभूत भावनांची पूर्तता होते की नाही या पायावर भावी आयुष्य उभे राहते.

**साच्यांचे वर्तन-** सध्या निष्क्रिय असलेल्या वर्तनाचे साचे धुंडाळणे मानसशास्त्राचे शिक्षण या उपचारपद्धतीत अत्यंत मोलाचे असते.

यातील पहिल्या दोघांमधील नात्याचा अभ्यास मनोरंजक ठरतो-

| साचे | भावना |
|---|---|
| (१) नकार | (१) स्वीकार, काळजी, सुरक्षा |
| (२) कर्तृत्व, स्वायत्तता | (२) स्व-परिचय, क्षमता |
| (३) मर्यादा | (३) स्व-नियमन |
| (४) इतर घटक | (४) मुक्त अभिव्यक्ती |
| (५) अति संवेदनशीलता | (५) उत्स्फूर्तता, बालसुलभ खेळकर वृत्ती |

प्रश्नावली-

स्कीमा थेरपी इन्स्टिट्यूट ने विविध रूपांमध्ये सशुल्क प्रश्नावल्या विकसित केलेल्या आहेत. त्यापैकी काही नमुना विधाने -

मोजपट्टीवर एक ते सहा असे पर्याय असतात- एक म्हणजे विधान सर्वथैव असत्य आणि सहा चा अर्थ विधान परिपूर्ण सत्य. त्यानुसार गुणांकन करावयाचे असते-

(अ) माझ्या भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी माझी माणसे उपलब्ध असतात.

(ब) आयुष्यभरात मी कोणासाठीही खास आहे, असं मला वाटलेलं नाही.

(क) माझे स्वजन मला कधीही सोडून जातील, मला दुरावतील याची मला सतत काळजी वाटत असते.

(ड) माझ्या आयुष्यात माणसांचे येणे-जाणे सतत सुरु असते.

(इ) लोक माझा गैरफायदा घेतील असं मला सतत वाटत असते.

अशा भरलेल्या प्रश्नावलीचा परामर्श उपचारकर्ता सदर रुग्णासमवेत घेत असतो, विशेषतः ज्या विधानांना अधिक गुणांकन दिले गेलेले आहे आणि पृच्छा करतो- या विधानाचा तुमच्या जीवनाशी काय संबंध आहे, याबद्दल अधिक माहिती द्याल कां ?

अशा संवादांतून तीव्र भावनांच्या हाताळणीचे मार्ग शोधता येतात. जीवनेतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी या उपक्रमाचा वापर करता येतो.

**पालकत्वाची सूची-**

बालवयातील समस्यांचे मूळ पालकांना माहित असते, किंबहुना तेच त्या समस्यांचे अजाणता मूळ असतात. या प्रश्नावलीत ७२ विधाने असतात आणि त्यांचा प्रतिसाद गृहपाठ म्हणून नोंदविणे अभिप्रेत असते. पालकांचे मूल्यांकन त्यांच्या वर्तनावरून केले जाते आणि मोजपट्टीवर एक ते सहा गुण द्यायचे असतात. आवश्यकतेनुसार ही प्रश्नावली इतर नातेवाइकांसाठीही वापरता येते-

**आई वडील मिळालेल्या वागणुकीचे शब्दांकन**

१) माझ्यावर खूप प्रेम केलं. मला खास वागणूक दिली.

२) माझ्याबरोबर वेळ घालविला आणि माझ्यावर लक्ष ठेवलं.

३) मला मार्गदर्शन केलं आणि दिशा दाखविली.

४) माझं ऐकून घेतलं, मला समजून घेतलं.

या सूचीद्वारे सुरुवातीच्या सर्वसामान्य साच्यांचे स्रोत सापडायला मदत होते. बालपणीचा घरातील भवताल आणि त्यामुळे काही साचे तयार झाले असावेत का याबद्दल निष्कर्ष काढता येतात. पण काही क्रूर, निष्ठुर अनुभवही वाट्याला आलेले असू शकतात आणि त्यांचे उत्तरायुष्यावर परिणाम झालेले नसू शकतात याचे काळजीपूर्वक विश्लेषण गरजेचे असते. यामागची कारणे अशी असू शकतात-

(१) रुग्णाचा स्वभाव

(२) कालांतराने आघातावर खपली धरली गेलेली असू शकते.

(३) पालकांपैकी दुसऱ्या व्यक्तीने अपूर्ण इच्छांची भरपाई अन्य मार्गाने केलेली असू शकते.

प्रश्नावली भरून झाल्यावर पालकांपैकी प्रत्येकाची साचे विकसित होण्यामागे काय भूमिका असू शकते याचा अंदाज काढता येतो. हे स्पष्ट झाले की पालनपोषण आणि अदृश्य साचे यांचे नाते पालकांना आणि संबंधित रुग्णाला समजावून सांगता येतात.

**कल्पनाचित्राद्वारे /प्रतिमेद्वारे तपासणी-**

कल्पनाचित्राचा वापर करून अदृश्य साचे नजरेसमोर आणता येतात आणि त्यामध्ये समाविष्ट असलेल्या भावनांची तपासणी करता येते. अशा नजरबंदीमुळे आश्चर्यकारक आणि नाट्यपूर्ण घडामोडी वाचता येतात.

मनातील भेडसावणारे अदृश्य साचे जाणिवेत आणायचे.

त्यांचा बाल्यात स्रोत शोधायचा.

सद्य स्थितीशी ते जोडायचे.

रुग्णाला डोळे झाकून बसण्याच्या सूचना द्यायच्या. आरामदायी ठेवणीमध्ये बसायचे. बंद डोळ्यांसमोर ती प्रतिमा तरंगत ठेवायची- अगदी सहजगत्या, दबावपूर्ण नव्हे.

त्या प्रतिमेत पूर्ण बुडून जाण्याची सूचना रुग्णाला करायची. नक्की काय वाटतेय त्या संवेदनेचे मोठ्याने वर्णन करायचे. स्वतःला बालक असे कल्पून पालकांसमवेत असल्याची भावना मनात आणायची आणि नेमकं काय सतावतंय हे जाणिवेच्या पातळीवर व्यक्त करायचे. अशा परिस्थितीत तुम्ही पालकांना काय सांगताय, ते तुम्हाला काय सूचना देताहेत आणि त्यांनी काय सांगावे असे तुम्हाला मनोमन वाटतेय याचे प्रतिमाचित्र रेखाटायचे.

नंतर सद्यस्थितीत येऊन हीच प्रक्रिया पुन्हा करायची. काय दिसतंय, मनात काय विचार येताहेत हे उपचारकर्त्याला कथन करायचे. सगळा अनुभव गृहीतकांना मान्यता देणारा किंवा आव्हान देणारा असू शकतो आणि त्यावरून मनातील गृहीतके बदलता येतात.

**प्रतिबंधाची सूची-**

४१ दैनंदिन घटना या सूचीत समाविष्ट असतात आणि माणसे आतील अदृश्य साचे टाळण्याचा प्रयत्न कसा करीत असतात त्याचे वर्णन या विधानांमध्ये केलेले असते. पूर्वीप्रमाणेच एक ते सहा ही मोजपट्टी वापरायची असते. वानगीदाखल काही विधाने-

(१) मी एकटा असताना खूप टीव्ही बघतो.

(२) मला सतावणाऱ्या घटनांबद्दल विचार करणे मी टाळतो.

(३) मनासारखं झालं नाही तर मला अंगात कणकण आल्यासारखे वाटते.

या प्रश्नावलीतील गुणांची आकडेवारी तितकीशी महत्वाची नसते, तर प्रतिसाद नोंदवून झाल्यावरचा संवाद, प्रकटीकरण, मूल्यांकन आणि हाती लागलेलं अधिक मौल्यवान असते.

उत्खनन-

काहीवेळा भरपाईचे प्रलोभन दाखवून बरंच उत्खनन करता येते. या प्रश्नावलीत ४८ विधाने असतात आणि नेहेमीप्रमाणे मोजपट्टीवर गुणांकन करायचे असते. उदाहरणार्थ -

(अ) चिडलो, वैतागलो की मी माझा राग आजूबाजूला असलेल्या लोकांवर काढतो.

(ब) माझ्या मनासारखं झालं नाही तर मी त्याचे खापर इतरांच्या डोक्यावर फोडतो.

(क) कोणी माझी फसवणूक केलीय असं वाटलं की माझा राग अनावर होतो.

(ड) सूड घेतल्याशिवाय मी शांत होत नाही.

(इ) माझ्यावर टीका झाली की स्वसंरक्षणार्थ भोवती तयार केलेल्या कोषात जातो.

वरील तपासण्या प्राथमिक माहिती पुरवतात आणि त्यांवर विसंबून पुढील उपचारांचे नियोजन करता येते.

**स्व-निरीक्षण**

ही काही औपचारिक चाचणी नाही पण तरीही अत्यंत मदत करणारी सवय आहे. स्वतःबद्दलचे आडाखे बांधले आणि उपचारांमधून काही ठोस हाती पडले की दैनंदिन पातळीवर स्वतःचे आपसूक निरीक्षण करायची सवय लावून घ्यावी.

एका रोजनिशीत ती निरीक्षणे नोंदवावीत म्हणजे भावी काळात त्यांचा संदर्भ पुरावा म्हणून वापरता येतो. स्व-घातक वर्तनाचे समर्थन नक्कीच करू नये पण भावी चर्चांमध्ये त्या घटनांवर भाष्य करायला हरकत नसते.

या महत्वाच्या विषयावरील तीन लेखांचा उपसंहार करताना एवढेच म्हणावेसे वाटते-

खूपशा मानसिक समस्यांचे मूळ भूतकाळात दडलेले असते आणि त्यांचा प्रभाव आजच्या काळात सहन करावा लागतो. वाटेवर आव्हाने असतात. माणसे सहसा व्यक्त होत नाहीत आणि सगळं बरोबर घेऊन हिंडत असतात- वरकरणी हसतात, आनंदी आहोत असा देखावा करतात पण अंतर्यामी अदृश्य ओझी घेऊन जगत असतात. त्या श्वापदांना बाहेर काढत, त्यांच्यावर उपचार करत नैसर्गिक जीवन जगता आले पाहिजे कारण तो आपला मनुष्य म्हणून हक्क असतो.

---

# 'जीपीएस'ला 'क्वांटम नेव्हिगेशन'चे आव्हान

**ड्रोन हल्ल्यांमुळे सैनिकांची कुठलीही मदत लागली नाही. मग अचूक निशाण्यावर गरज पडते ती 'जीपीएस' (अमेरिका), 'ग्लोनास' (रशिया), 'गॅलेलियो' (युरोपियन महासंघ), 'बेईदोऊ' (चीन) आदींची. या तंत्रज्ञानाद्वारे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणावर अचूक हल्ला शक्य होतो. मात्र, आता या तंत्रज्ञान वापरातही स्वदेशी यंत्रणा वापरण्याची गरज भासू लागली आहे.**

वेध
तेजस परब



रशियाशी उघड मैत्रीमुळे अमेरिकेसारखा देश भारतावर आयातशुल्क लादतो; 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान युद्धबंदीचे निव्वळ श्रेय घेण्याचा प्रयत्न करतो; तिथे याच अमेरिकेवरील 'जीपीएस' किंवा तत्सम अन्य देशांच्या यंत्रणांवर विसंबून राहणे कितपत सुरक्षित? बर्याचदा अशा वापरामुळे नेटवर्क जॅमिंग, स्पूफिंग (अचूक ध्येयाची निश्चिती), मिकोनिंग (उशिराने सिग्नल प्राप्त होणे), असे धोके संभवतात. तसेच, इलेट्रोमॅग्नेटीक शिल्डिंग, सिग्नल मास्किंग आणि रडारला निष्प्रभ करण्यासारखी यंत्रणाही कार्यरत असते.

युक्रेन ते पश्चिम आशिया आणि दक्षिण आशियात जॅमिंग, स्पूफिंग आणि सायबर हल्ले हे आता सामान्य झाले आहेत. त्यामुळे जिथे 'जीपीएस' पोहोचू शकत नाही, अशा ठिकाणी एका 'मल्टीमॉडेल नेव्हिगेशन'ची गरज भासतेच. त्यासाठी पर्याय म्हणून 'इनर्शिअल नेव्हिगेशन सिस्टम', 'टेरकॉम', 'इमेज बेस्ड गाईडन्स', 'एनक्रिप्टेड सॅटलाईट सिग्नल', 'एआय' यांसारख्या यंत्रणांचा वापर केला जाऊ शकतो. मात्र, वरील प्रत्येक तंत्रज्ञानाची आपली आपली वैशिष्ट्ये आहेत. यापैकी 'इनर्शिअल नेव्हिगेशन सिस्टम' तर भविष्यात कालबाह्य होईल, त्यासाठी वारंवार उपग्रहांमध्ये नव्या बदलांची गरज आहे.

टेरिकॉममध्ये कमी प्रकाश किंवा सपाट भूभागावर योग्यरित्या काम करू शकत नाहीत. अधिक जोखमीच्या भागात एनक्रिप्टेड सिग्नलही काम करत नाहीत. तज्ज्ञांच्या मते, 'एआय' अल्गोरिदमही आणीबाणीच्या स्थितीत अचूक गोष्टी सांगू शकत नाहीत. वरील सांगितलेल्या इतया भिन्न 'नेव्हिगेशन' प्रणालीत एकावरही पूर्णपणे निर्भर राहणे अशय आहे. त्यामुळेच एकीकृत, अनुकूल संचालन प्रणालीची गरज भासू लागली आहे. याच कारणास्तव 'क्वांटम मॅग्नेटीक नेव्हिगेशन सिस्टीम'चे (यूएमएनएस) महत्त्व वाढू लागले आहे. 'यूएमएनएस' म्हणजे काय? तर अशी यंत्रणा जी पृथ्वीतील चुंबकीय बदलांचा कानोसा घेते, पृथ्वीतील बदलांचा आढावा घेण्यासाठी सेन्सर यंत्रणेचा वापर करते. त्यामुळे 'जीपीएस'वर अवलंबून राहण्याची गरज भासत नाही.

'यूएमएनएस' अतिसंवेदनशील क्वांटम मॅग्नेटोमीटर सेन्सर्सना चुंबकीय विसंगती असलेल्या चित्रणाला एका 'इनर्शिअल नेव्हिगेशन सिस्टम'ला जोडून देतो. यामुळेच 'जीपीएस' उपलब्ध नसल्यानंतरही 'यूएमएनएस' अचूक ठिकाणची आखणी करू शकतो. म्हणून या तंत्रज्ञानाची गरज सध्याच्या घडीला अधिक आहे. मानवहरित पाणबुड्यांना 'यूएमएनएस' यंत्रणा अचूक दिशादर्शकाचे काम करणारी आहे. तसेच जहाज भटकणे, समुद्रात होणारे अपघातही या तंत्रज्ञानामुळे टाळता येण्यासारखे आहेत. केवळ संरक्षण क्षेत्रातच नव्हे, तर समुद्राच्या तळाशी सुरू असलेल्या खनिज उत्खनन, तेल अन्वेषण, समुद्रात पसरलेल्या केबलच्या जाळ्यांचे निरीक्षण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर हा महत्त्वाचा ठरणार आहे.

भारताला लाभलेल्या शेजारी देशांतील तणावस्थिती लक्षात घेता, ही गरज किती मोठी आहे, हे लक्षात येईलच. सागरी सुरक्षा हा महत्त्वाचा मुद्दा मानला जातो. गेली काही वर्षे होत असलेला हुती बंडखोरांचा त्रास, भारतीय मालवाहतुकीला बसलेला फटका या गोष्टींवर जरब बसवण्यासाठी अशा नव्या तंत्रज्ञानाची गरज आहेच. समुद्री सीमारेषा अबाधित राहाव्यात, त्या दृष्टीने 'यूएमएनएस' तंत्रज्ञान बलस्थान ठरत आहे.

१९९०च्या दशकाच्या शेवटी 'क्वांटम स्पिन-एसचेंज रिलेसेशन-फ्री मॅग्नेटोमीटर' विकसित झाला, ज्याचा वापर सूक्ष्म चुंबकीय क्षेत्र मोजण्यासाठी वापरले जाऊ लागला. हे अधिक अचूक आणि संवेदनशील यंत्रणा असल्याने सामान्य मॅग्नोमीटरपेक्षा अधिक विश्वसनीय ठरले. त्यानंतर वैद्यकीय उपकरणे, लष्करी नेव्हिगेशन, पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचा अभ्यास यात त्याचा वापर केला गेला. तसेच, 'जीपीएस'ला पर्याय म्हणूनही याकडे पाहिले गेले. या कारणास्तव जगभरातील देशांनी याकडे लक्ष वेधले. २०१० सालापासून अमेरिका आणि चीनने पाणबुड्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानात याच्या वापरासाठी मोठी गुंतवणूक सुरू केली. २०२०च्या सुरुवातीला छोट्या स्तरावर याबद्दल चाचण्या सुरू झाल्या. यातील पुढच्या टप्प्यात 'इनर्शिअल' आणि समुद्रातील 'नेव्हिगेशन' प्रणालीसोबत जोडले जाऊ लागले. अमेरिका संरक्षण क्षेत्रात ज्याप्रकारे आघाडी घेण्यात पुढे आहे, त्यांनी २०२७ सालानंतर पाणबुड्यांमध्ये आणि ड्रोन्समध्ये या प्रणालीवर पूर्णपणे भर देऊ इच्छिते. याबद्दल नुकतेच अमेरिकेचे परीक्षण धक्का देणारे आणि जगातील विमान अपघातांच्या संकटावर मात करणारे ठरले.

'एनयूएनव्ही' (क्वांटम नेव्हिगेशन आणि 'एआय'च्या संयुक्त स्वरूपात) 'जीपीएस' प्रणालीरहित व्यावसायिक विमानांपेक्षाही अधिक अचूक होते. 'यूएमएनएस' तंत्रज्ञान हे 'जीपीएस'ला याबाबतीत मागे टाकणारे ठरले. कित्येक देशांनी 'यूएमएनएस' प्रणालीचे महत्त्व समजून घेऊन त्यावर काम करणे सुरू केले आहे. उदा. चीन अॅटोमिक मॅग्नेटोमीटरचे प्रदर्शन करत आहे. २०१७-१८च्या सुरुवातीला 'क्वांटम नेव्हिगेशन सिस्टम के फील्ड ट्रायल'चा दावा केला आहे. याचा वापर ते मानवरहित पाणबुड्यांसाठी केल्याचा दावाही चीनने केला. ब्रिटन, जर्मनी हे देश पुढील पाणबुड्यांमध्ये 'क्वांटम सेन्सर प्रणाली' बसवण्यासाठी एकत्रित काम करत आहेत.

भारतानेही हे तंत्रज्ञान आत्मसात करण्यास सुरुवात केली आहे. सुरुवातीला संशोधन आणि विकासाच्या टप्प्यात आहोत. याचे महत्त्व कळल्यानंतर भारताने एकूण सहा हजार कोटींचा निधी वर्ग करून 'राष्ट्रीय क्वांटम मिशन'द्वारे 'क्वांटम सेन्सिंग'ला महत्त्व दिले जात आहे. 'डीआरडीओ'अंतर्गत 'क्वांटम रिसर्च टेक्नोलॉजी रिसर्च सेंटर'ची स्थापनादेखील करण्यात आली आहे. त्याद्वारे आण्विक घड्याळाची निर्मिती केली जाणार असून, 'जीपीएस'विरहित क्षेत्रात कार्यरत राहण्यासाठी फायदेशीर ठरेल. 'डीआरडीओ'कडे आण्विक मॅग्नोमीटरच्या विकासावरही काम सुरू आहे, अशी माहिती 'युपीएससी'चे अध्यक्ष माजी केंद्रीय सचिव अजय कुमार यांनी एका हिंदी वृत्तपत्राला नुकतीच दिली आहे.

ड्रोन हाताळण्यासाठी पोर्टेबल मॅग्नोमीटर वापरले जाऊ शकतात. कित्येक स्टार्टअप कंपन्यांनी गरजांकडेही लक्ष वेधले आहे, त्यावर काम सुरू आहे. 'आदिती २.०' या संरक्षण संदर्भातील स्टार्टअपने 'क्वांटम पोझिशनिंग'साठी २५ कोटींचे अनुदान मिळवले आहे. हा एक 'यूएमएनएस' तंत्रज्ञानाच्या दृष्टीने भारतासाठी महत्त्वाचा मुद्दा ठरणार आहे. भारताच्या सीमेपलीकडील देशांमुळे केवळ उपग्रह प्रणालीवर निर्भर राहणे आता शय नाही. त्यासाठी समुद्रतळात नेमके काय सुरू आहे, यावरही करडी नजर हवी. 'यूएमएनएस' हे तंत्र भविष्यात त्यादृष्टीने महत्त्वाचे ठरेल, हे नक्की!

---

# गुणकारी तुळस

भारतीय संस्कृती परंपरेत तुळस महत्त्वाची मानली जाते. तुळस ही मांगल्याचे, पावित्र्याचे प्रतीक आहे. वारकरी संप्रदायात तुळशीलाप्राधान्य देण्यात आले आहे. तुळशीला जसे धार्मिक, सांस्कृतिक महत्त्व आहे, तेवढीच तुळस वैज्ञानिक, शास्त्रीयदृष्ट्या आणि आरोग्याच्या दृष्टीनेही लाभदायक मानली जाते. आयुर्वेदात तुळशीच्या पानांना, बियांना महत्त्व असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या तुळशीचे अनेक प्रकार आहेत. पुराणातील काही संदर्भानुसार ज्या घरात तुळस लावलेली असते आणि नियमित सकाळी तुळस पूजन केले जाते त्यांच्यावर लक्ष्मीची कृपा असते, असे मान्यता आहे. म्हणूनच की काय, कुठल्याही चित्रपटात अथवा मालिकांमध्ये आदर्श स्त्रीचे रूप म्हणून तिला सकाळी शुचिर्भूत होऊन तुळशीची पूजा करताना दाखवतात. तुळशीला आपल्या संस्कृतीत मातेचे रूपही मानतात. आजूबाजूचे वातावरण शुद्ध होऊन सकारात्मक लहरी तुळशी निर्माण करते. आरोग्याला उत्तम, धन आणि निरोगी काया हे समृद्धीचे लक्षण मानले गेले आहे. कोरोना काळात रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी तुळशीचे सेवन करण्याचा सल्ला दिला जात होता.

'**तुलसी यस्य भवने प्रत्यहं परिपूज्यते, तद्गृहं नोपसर्पन्ति कदाचित यामकिंकरा : ।**' अर्थात, ज्या घरात नियमित तुळशीचे नियमित पूजन केले जाते, त्या घरातील सदस्य कमी आजारी पडतात. तुळशीच्या मंजिरी विष्णूला वाहिल्यास भगवान प्रसन्न होतात, असे शास्त्रात सांगितले आहे. दरवर्षी कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी किंवा द्वादशी तिथीला भगवान विष्णूचे रूप असलेल्या शाळिग्रामसोबत तुळशीचा विवाह केला जातो. शास्त्रामध्ये तुळशी विवाहाची एक कथा आहे. तुळशी ही पूर्वी वृंदा होती आणि तिचा पती जालंदर हा राक्षस पती होता. वृंदा पतिव्रता असल्याने तिला तिच्या पतीचे रक्षण करण्याचे वरदान मिळाले होते. या वरदानामुळे देवांना जालंदरचा वध करणे शक्य होत नव्हते. देवांच्या विनंतीवरून भगवान विष्णूंनी जालंदरचा वध करण्यासाठी वृंदाचा पतिव्रत धर्म मायारूपाने मोडला आणि जालंदरचा वध झाला. यामुळे वृंदा दुःखी झाली. रागाच्या भरात तिने भगवान विष्णूंना दगड होण्याचा शाप दिला. भगवान विष्णूंनी तिचा शाप स्वीकारला आणि त्यांचे शाळिग्राममध्ये रूपांतर झाले. त्या शाळिग्रामची पूजा भाविक करतात. माता लक्ष्मीने विष्णूंना शापमुक्त करण्याची प्रार्थना केली तेव्हा वृंदाने त्यांची शापातून मुक्तता केली आणि ती पतीचे मस्तक घेऊन सती गेली. मान्यतेनुसार ज्या ठिकाणी वृंदा सती गेली तिथे एक रोप उगवले, ज्याला 'विष्णुप्रिया तुळशी' असे नाव दिले. विष्णूंनी असे सांगितले की, या दगडात शाळिग्राम नावाने माझे वास्तव्य राहील, ज्याची नेहमी तुळशीसोबत पूजा केली जाईल. तेव्हापासून कार्तिक महिन्यातील द्वादशी तिथीला शाळिग्राम आणि तुळशी यांच्या विवाहाची प्रथा सुरू झाली. शास्त्रामध्ये ही तिथी अतिशय शुभ मानली जाते. कारण या दिवशी भगवान विष्णू योगनिद्रेतून जागे होतात आणि शुभ कार्यक्रमांचा पुन्हा शुभारंभ होतो. अशी ही अनेक गुणांनी युक्त अशी तुळशी अनेक लहान-मोठे आजार बरे करते. आयुर्वेदानुसार तुळशीच्या पानांमध्ये अँटिबॅक्टेरिअल, अँटीफंगल आणि असे अनेक गुणधर्म असतात तसेच तुळशीची पाने पोटाचे विकार दूर करण्यास मदत करतात. अशी गुणकारी तुळस प्रत्येकाने घरीदारी लावावी आणि सामाजिक समारंभात पुष्पगुच्छ देण्याऐवजी तुळशीचे रोप भेट म्हणून द्यावे.

स्नेहल खंडागळे

परराष्ट्रकारण

पार्थ कपोले

**भारत-चीन संबंध कायमच तणावपूर्ण राहिले आहेत. चीनच्या आक्रमक विस्तारवादाला भारताने चोख उत्तर दिले आहे. मात्र, अमेरिकेच्या व्यापारयुद्धाच्या पार्श्वभूमीवर चीन भारताच्या जवळ येऊ पाहात आहे. जोवर सीमा शांत नाही, तोवर चर्चा शक्य नसल्याची भारताची भूमिका आहे. भारताने ही भूमिका स्पष्ट शब्दांत चीनला कळवलीही आहे.**

# चीनची बदलती भाषा



चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्या अलीकडील भारत दौऱ्यानंतर काही सीमासंबंधी चर्चा, हवाई प्रवास व व्यापारासारख्या मुद्द्यांवर प्राथमिक सहमती झाल्याची घोषणा करण्यात आली. मात्र, या घोषणांचा भपका वेगळा आणि वास्तव वेगळे आहे. कारण, भारत आता केवळ दिखाऊ आश्वासनांवर समाधानी राहणारा देश राहिला नाही. चीनला हे स्पष्टपणे समजले आहे की, भारताशी सीमावाद, आर्थिक व्यवहार आणि सामरिक स्पर्धा ही जुनी पद्धत आता चालणार नाही. आजचा भारत हा ठाम नेतृत्व असलेले, आक्रमकपणे आपले हित जपणारे राष्ट्र आहे. या पार्श्वभूमीवर चीनच्या सरकारी प्रसारमाध्यमांची भाषाही आता बदलू लागली आहे.

डोकलामपासून गलवानपर्यंत चीनने भारताला दबावाखाली आणण्याचा जितका प्रयत्न केला, तितयाच ताकदीने भारताने प्रत्येक वेळेला त्याला प्रत्युत्तर दिले. गलवानमध्ये भारतीय जवानांचे शौर्य जगाने पाहिले. त्यानंतर भारताने घेतलेला सर्वांत मोठा निर्णय म्हणजे, चिनी कंपन्यांवरील निर्बंध. शेकडो मोबाईल ॲप्सवर बंदी, गुंतवणुकींवर निर्बंध आणि 'आत्मनिर्भर भारत'चा जोरदार धक्क्यामुळे, चीनला खऱ्या अर्थाने तोटा सोसावा लागला. चीनला सीमा आणि आर्थिक अशा दोन्ही आघाडीवर तोंड देण्याची धमक भारताने दाखवून दिली. आज जागतिक पटलावर भारताची शक्ती अनेक पटींनी वाढली आहे.

अमेरिका जेव्हा व्यापारयुद्धाच्या नावाखाली संपूर्ण जगावर व्यापारी दडपण आणते, तेव्हाही भारताने त्याला संतुलित उत्तर दिले आहे. अमेरिकेशी धोरणात्मक भागीदारी ठेवूनही, भारताने आपले स्वातंत्र्य गमावलेले नाही. चीनबरोबरचा आर्थिक तणाव, रशिया-युक्रेन युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटात भारताची भूमिका ही जगासाठी एक धडा आहे. पाश्चात्य देश रशियाविरुद्ध निर्बंध लावत असताना, भारताने स्वस्त दरात तेल खरेदी करून आपल्या जनतेला दिलासा दिला आणि देशाची अर्थव्यवस्था स्थिर ठेवली. हे 'राष्ट्रहित सर्वप्रथम' या तत्त्वाचे उत्कृष्ट उदाहरण ठरावे.

चीनला अपेक्षा होती की भारत दबावाखाली येईल परंतु, घडले उलट. आज भारत 'क्वाड'मध्ये अमेरिकेसोबत आहे, 'ब्रिक्स'मध्ये रशियासोबत आहे आणि 'जी २०' द्वारे दक्षिणेचा नेता म्हणून उभा आहे. या सर्व आघाड्यांवर भारताने दाखवून दिले की, आम्ही कोणाच्याही दबावाखाली नाही. भारताचे परराष्ट्र धोरण आज बहुपक्षीय, संतुलित आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ठाम राष्ट्रवादी आहे. युक्रेन-रशिया युद्धाच्या काळात पाश्चात्य देश रशियाबरोबरचा व्यापार थांबवण्यासाठी भारतावर दडपण आणत होते. पण, भारत त्या दबावाला झुकला नाही. उलट पाश्चात्य नेत्यांना तोंडावर सांगितले की, हा काळ युद्धाचा नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हे विधान केवळ एक संवाद नव्हता, तर ते भारताची नवीन भूमिका जगासमोर स्पष्ट करणारा घोष होता. युद्धविरामाची हाक, संवादाचे महत्त्व आणि स्वतःच्या हिताचे रक्षण हीच भारताची सध्याची ओळखे आहे.

भारत-चीन संबंधांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास, आता स्थिती पूर्वीसारखी नाही. व्यापार वाढतो आहे, काही मुद्द्यांवर संवादही होतो आहे. पण दोन्ही देशातील मूलभूत विश्वासाचा अभाव कायम आहे. चीनच्या दुटप्पी धोरणांवर भारताने आता उघडपणे बोट ठेवले आहे.

दक्षिण चीन समुद्र असो, इंडो-पॅसिफिक असो किंवा सीमावाद, भारताने आपले धोरण स्पष्टपणे मांडले आहे. चीनला हे आता लक्षात आले आहे की, भारत कोणत्याही दबावासमोर झुकणार नाही. भारताची अर्थव्यवस्था आज जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. पायाभूत सुविधांचा झपाट्याने होत असलेला विकास, संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता, अंतराळ मोहिमा, सेमीकंडटर उत्पादन, नवीकरणीय ऊर्जा यामध्ये भारत मोठ्या शक्तींना मागे टाकत आहे. चीनचे सर्वाधिक दुखणे हेच आहे की, आजचा भारत जागतिक गुंतवणुकीचा केंद्रबिंदू होत आहे. 'ॲपल'पासून 'टेस्ला'पर्यंत सर्व कंपन्या भारताकडे संधी म्हणून पाहत आहेत.

अमेरिकेचे व्यापारयुद्ध, रशिया-युक्रेन संघर्ष किंवा मध्य-पूर्वेतील अस्थिरता असो, भारताने प्रत्येक मुद्द्यावर आपला तोल सांभाळत राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. हेच भारताचे खरे सामर्थ्य आहे. इतर देश जिथे दबावाला बळी पडतात, तिथे भारत दबावाला उत्तर देतो. इतर देश जिथे आपली भूमिका बदलतात, तिथे भारत आपल्या भूमिकेला ठामपणे मांडतो. आज भारत चीनला उघडपणे सांगतो की, सीमेवरील शांततेशिवाय सामान्य संबंध शय नाहीत. हीच खरी आक्रमक राष्ट्रवादाची भाषा आहे. चीनने हे लक्षात घेतले पाहिजे की, २०२५ सालचा भारत हा १९६२चा भारत नाही.

आज आपल्याकडे बलवान सेना, जागतिक सहयोग, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि ठाम राजकीय नेतृत्व आहे. जग बदलत आहे. अमेरिकेने आपला दबदबा टिकवण्यासाठी व्यापारयुद्धाचा मार्ग स्वीकारला आहे, चीन आपला विस्तारवाद चालू ठेवत आहे, रशिया-युक्रेन युद्ध अजूनही धगधगत आहे. अशा अस्थिर काळात भारत हे स्थैर्याचे, संतुलनाचे आणि शक्तीचे केंद्रबिंदू म्हणून पुढे येत आहे. यामुळेच आज भारताकडे जग 'समस्या सोडवणारा' नेता म्हणून पाहत आहे.

भारत-चीन संबंधांचा पुढील मार्ग नेहमीच तणावपूर्ण राहील; पण आता त्या तणावाचे नियम भारत लिहीत आहे. पाकिस्तानला आपण शिकलेला धडा, चीनविरुद्ध घेतलेले निर्णय आणि जागतिक पटलावरचे आपले शक्तीवर्धन हे सर्व मिळून, भारताला २१व्या शतकातील खऱ्या महासत्ता बनवत आहेत. आजचा भारत कोणाच्याही दयेवर नाही, तर स्वतःच्या सामर्थ्यावर उभा आहे. हेच 'ऑपरेशन सिंदूर'पासून गलवानपर्यंत, ॲप्सवरील बंदीपासून जागतिक मंचांवरील ठाम भूमिकेपर्यंत दिसून येते. म्हणूनच आता जगाला भारताचा स्पष्ट संदेश ऐकणे भाग आहे.

## बाप्पा

गणेशोत्सव अवलोकूनी
बाप्पा भूवर आले निघूनी
स्वस्वरूप मूर्ती अनंत येथे
आनंदाने कसे गेले हरखूनी !
सुंदर ते रूप नटलेले
देखणे अलंकृत सजलेले
विविध वेषात, विविध पोषाख
रंगीबिरंगी मूर्ती रूपात असलेले !
मातेची तीव्र आठवण आली
अवती भवती भासू लागली !
स्वप्राणाने प्राण फुंकूनी
पुतळ्यांची सजीव निर्मिती केली....
असाच पुतळ्यातून जन्म
असाच हा अवतार अवतरला !
येथे सुंदर मूर्ती, शिल्प, पुतळे
कलाकारांनी जीव ओतला !
देवपण भक्तांनी बहाल केले !
उल्हास उत्साहास उधाण आले
बाप्पाचे मन आले भरून
डोळे अलगद ओलावले !

मीना खोंड

## श्री गजानन

सरसर शिरव्याने सरतो
गारवा श्रावणाचा,
नूपुरांचा झंकार गुंततो
भादव्यात गणपतीचा.
श्रींच्या आगमनाने पुलकित
होई तन अन् मन..
लाल जर्द जास्वंदी शोभे
शिरी गणेशा छान.
गजाननाच्या मस्तकी झळके
मुकुट रत्नांकित..
तुंदिल तनुवरी पितांबर
साजिरे शोभिवंत.
दुर्वांकुर सोंडेवर साजती
कंठी मौक्तिक माळ..
पाशांकुश हाती धरूनी
करी दुष्टांचा निर्दाळ.
सद्बुद्धी देण्या
भूवर गजानन..
मोदकप्रिय हेरंबाचा करिती
हो घोष जन.

संगीता बापट

नोंद...

श्रीपाद पेंडसे

# सरकारचे डिजिटल क्रीडांगणांकडेही लक्ष

आतापर्यंत ऑनलाईन खेळांचे दोन वर्ग होते. त्यात कौशल्यावर आधारित खेळ कायदेशीर, तर नशिबावर बेतलेले खेळ जुगार मानले जात. त्याच सुमारास केंद्र सरकारशी संबंधित काही मंडळी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विधेयके मांडत, त्याला नियमांत रूपांतरित करण्याच्या प्रयत्नात होती. आपल्या परिचयातील पत्त्यांच्या खेळांत जवळजवळ ३५० प्रकार रूढ आहेत. यातील अनेकांमध्ये पैशांची थेट देवाणघेवाण करणारे ऑनलाईन गेमिंगसारखे ॲप असतात. त्या ॲपवर ही मंडळी लक्ष ठेवून होती आणि त्यांनी एक विधेयक संमत करून, राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर एक कायदाही अमलात आणला.

इंटरनेटद्वारे खेळले जाणारे डिजिटल खेळ, समाजमाध्यमांवरील क्रीडा, ई-स्पोर्ट्स तसेच पैशांवर खेळले जाणारे खेळ, या अर्थक्रीडा खेळल्या जातात ते डिजिटल क्रीडांगण, ऑनलाईन क्रीडागार अशा क्रीडाविश्वातील गैरव्यवहारात केंद्र सरकारने लक्ष घालत, त्यातील अनिष्ट प्रथांना आळा घालणारे विधेयक नुकतेच संमत केले. त्यामुळे ऑनलाईन गेमच्या माध्यमातून चालणार्या पैशांच्या देवाणघेवाणीला, आता आळा बसणार आहे. ऑनलाईन गेमिंग क्षेत्राला योग्य दिशा देणे आणि त्या माध्यमातून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी, केंद्र सरकारने 'ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक २०२५' संमत केले आहे. या विधेयकाच्या आधी काही राज्यांमध्ये ऑनलाईन रमीवर बंदी आली, तर काही राज्यांमध्ये ते चक्क कायदेशीर झाले. या रमीच्या बाबतीत काही आस्थापने न्यायालयातही गेली होती. केंद्र सरकारने आणलेल्या या केंद्रीय विधेयकासही, ऑनलाईन गेमिंग कंपन्यांशी संबंधित प्रमुख संघटनांनी विरोध केला आहे.

'ऑल इंडिया गेमिंग फेडरेशन', 'ई-गेमिंग फेडरेशन', 'फेडरेशन ऑफ इंडिया फॅन्टसी स्पोर्ट्स' या संघटनांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात, विश्वासात न घेता विधेयक आणल्याचे म्हटले आहे. तसेच, बंदीऐवजी सरकारन ॲपचे नियमन करावे, अशी मागणीही कंपन्यांनी केली आहे. अशा बंदीमुळे अनेक तरुण उद्योजक, गुंतवणूकदारांचे नुकसान होणार असून, दोन लाख नोकऱ्यांवर टांगती तलवार असल्याचा इशाराही या संघटनांनी दिला. या विधेयकाद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार होत आहे. तसेच, कोणत्याही प्रकारे ऑनलाईन खेळाद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने पैशांची देवघेव या प्रकाराला वित्तीय संस्थांनी मदत करणे, या कायद्याचे उल्लंघन केल्याचे मानले जाणार आहे. त्यमुळे कायद्याचे उल्लंघन करणार्यांना दंड आणि शिक्षा ठोठावण्यात येणार आहे. ऑनलाईन गेमिंगमुळे होणाऱ्या आत्महत्या रोखणे, हेच या विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या विधेयकामध्ये जुगार आणि सट्ट्याशी संबंधित सर्वप्रकारच्या ऑनलाईन गेमिंगवर, पूर्ण बंदी घालण्याची तरतूद आहे.

खेळाडूस्नेही असलेल्या या विधेयकात, ऑनलाईन जुगार खेळणाऱ्यांना गुन्हेगार मानले गेले नसून, त्यांना चुकीच्या प्रवृत्तीचे बळी मानण्यात आले आहे. या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि खेळांच्या व्याख्या ठरावण्यासाठी एक नियामक प्राधिकरण स्थापन करण्याचीही तरतूद विधेयकात आहे. 'ऑल इंडिया गेमिंग फेडरेशन', 'ई-गेमिंग फेडरेशन' आणि 'फेडरेशन ऑफ इंडिया फॅन्टसी स्पोर्ट्स' यांसारख्या ऑनलाईन गेमिंग कंपन्या आणि त्यांच्या संघटनांनी, गृहमंत्री अमित शाह यांना संयुक्त पत्र लिहिले आहे. त्यामध्ये या विधेयकामुळे देशभरातील दोन लाखांहून अधिक नोकऱ्या संपुष्टात येतील आणि ४०० हून जास्त गेमिंग कंपन्या बंद पडतील. त्यामुळे 'डिजिटल इंडिया'च्या प्रतिमेलाही मोठा धक्का बसेल, असे म्हटले आहे.

वाचनात आलेल्या एका अहवालानुसार, सरकारला गेमिंग क्षेत्राकडून दरवर्षी २० हजार कोटी रुपये कर मिळतो. भारतात गेमिंगशी संबंधित जवळपास ४०० स्टार्टअप्स सुरू झाले आहेत. यामध्ये २५ हजार कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आली आहे. २०२३ साली सरकारने ऑनलाईन गेमिंगवर २८ टक्के 'जीएसटी' आकारला. याशिवाय २०२५ पासून जिंकलेल्या रकमेवर ३० टक्के करही लावला जात आहे. ऑनलाईन गेमिंग व्यवसायात असलेल्या काही कंपन्यांच्या शेअरच्या किमतींमध्ये, घसरण दिसून आली होती. ही घसरण या विधेयकाच्या संभाव्य नकारात्मक परिणामांचे स्पष्ट संकेत देते. वाचनात आलेल्या अन्य एका अहवालानुसार, ऑनलाईन गेमिंगची बाजारपेठ जवळपास ३२ हजार कोटी रुपयांची आहे. यापैकी ८६ टक्के महसूल रोख स्वरूपात येतो.

२०२९ सालापर्यंत तो ८० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा होती; पण या बंदीमुळे अनेक कंपन्या अडचणीत येतील. त्यामुळे सरकारचा कोट्यवधी रुपयांचा कर बुडू शकतो. या दोन्ही बाजूंकडे सरकार खचितच बघेल तथापि, आपण तोपर्यंत या लेखात ऑनलाईन गेमिंगचा संक्षिप्त इतिहास जाणून घ्यायचा प्रयत्न करू.

ऑनलाईन गेमिंगचा इतिहास हा पहिल्या मेनफ्रेम संगणकांपासून सुरू होतो. जसजसे संगणक विकसित होत होते, तसतसे त्यावर खेळांची चाचणी घेण्यासाठी गेम डिझाईन होऊ लागले. 'नासा'पासून ते 'एमआयटी'पर्यंत संगणक आणि इंटरनेटच्या उत्क्रांतीसह गेम विकसित घेऊ लागले. 'वर्ल्डस फेअर' या जागतिक मेळ्यातील डिस्नेलॅण्डच्या 'इट्स अ स्मॉल वर्ल्ड' येथूनच, संगणक आणि ऑनलाईन गेमिंगची कहाणी एकत्रित सुरू झाली.

'एनआयएम'ने गणितीय खेळ खेळण्यासाठी बनवलेल्या 'निमट्रॉन' या संगणकाचे सादरीकरण, त्या जागतिक मेळ्यात साली करण्यात आले. संगणकीय खेळांचा प्रारंभ या 'निमट्रॉन'ने केला, असे मानले जाते. येथूनच संगणक आणि ऑनलाईन गेमिंगची कहाणी सुरू होते. या पाठोपाठ १९५१ साली 'निम्रोड' नावाचा आणि लगेच १९५२ साली 'ओएसओ' (जदज) नावाचा संगणकीय खेळ जगासमोर येतात. अनेक स्टेशनवर खेळता येणारा पहिला गेम म्हणून, 'स्पेसवॉर' हा १९६२ साली जगाला मिळतो. पहिला घरगुती गेम कन्सोल, 'द ब्राऊन बॉस' हा १९६६-६७ साली प्रदर्शित होतो. याच काळात, संगणकांमधील 'नेटवर्क इफेट' ही नवीन संकल्पना या क्षेत्रात रुळू लागते.

**देशात अनेकदा ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून झालेली फसवणूक, त्यामुळे झालेली दयनीय अवस्था अशा घटना नित्याच्याच! अशा खेळांमधून अनेकांची फसवणूक झाली, तर अनेकजण त्याच्या आहारी गेले. यामुळेच केंद्र सरकारने यावर नुकताच कायदा करत, या खेळाचा दुष्परिणाम रोखण्याचा प्रयत्न केला आहे. त्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन गेमिंगचा घेतलेला आढावा...**



१९६० दशकाच्या उत्तरार्धापासून ते १९९३ सालापर्यंत तीन महत्त्वाच्या तांत्रिक नवकल्पना जन्मास आल्या. आपल्याला तेव्हा होस्ट-आधारित नेटवर्क आणि वेळ-सामायिकरण दिसू लागले, हे दोन्ही आज आपल्याला माहीत असलेल्या इंटरनेटच्या निर्मितीकडे घेऊन जातात. गेमिंग समुदायाद्वारे या तिन्ही नवकल्पना जलद वापरल्या जाऊ लागल्या. १९७३-१९७५ साली 'नासा'ने आपला पहिला गेम तयार केला. 'नासा'च्या इंटर्नसनी तयार केलेला चअनए, हा सुरुवातीच्या फर्स्ट-पर्सन शूटर गेमपैकी एक होता. गेमिंगला सुरुवात होताच १९७३ साली पहिला गेम, अटारी कंपनीचा 'पोंग' विकला गेला.

१९७५ साली जॉयस्टिक हिट आर्केड गेम्स येतात, ज्यामुळे गेम खेळण्याच्या पद्धतीत क्रांती घडते. १९७७ साली अटारी व्हीसीएस रिलीज झाला, यामुळे गेम कार्ट्रिजची संकल्पना उघड होते. ब्रिटिश टेलिकॉमने ऑनलाईन गेमिंगला प्रोत्साहन देण्यासाठी, आपली भूमिका बजावण्यास सुरुवात केली. मल्टी-यूजर डंगऑनच्या विकासासह, आपल्याला आभासी जगाचा उदय होताना दिसतो. ब्रिटिश टेलिकॉमने रात्री २ ते सकाळी ७ वाजेपर्यंत, ओपन नेटवर्कवर गेम खेळण्याची परवानगी दिली. १९८० सालच्या दशकात 'संगणक गेमिंग वर्ल्ड' आणि 'संगणक आणि व्हिडिओ गेम्स' ही दोन मासिके प्रसिद्ध झाली.

१९८२ साली आपण 'टाईम मॅगझिन'ने घोषित केल्याप्रमाणे 'द इयर ऑफ द कम्प्युटर'वर पोहोचलो आहोत. 'लास वेगास कन्झ्युमर इलेट्रॉनिस शो'मध्ये, विल्यम वॉन मेस्टर यांनी मॉडेम- ट्रान्सफर तंत्रज्ञानाची निर्मिती केली. या तंत्रज्ञानात डेटा ट्रान्समिट करण्यासाठी, टेलिफोन लाईन्सचा वापर केला जातो. गेमर्सना प्रोग्रामरकडून अनेक गेम डाऊनलोड करण्यासाठी याचा वापर होतो. दि. १ जानेवारी १९८३ रोजी इंटरनेट अधिकृतपणे सुरू झाले. त्याने ऑनलाईन गेमिंग सुरू झाले.

१९८४ साली बीटनेटने 'एमएडी' विकसित केले. हा जगभरातील संगणक नेटवर्कद्वारे प्रवेश केलेला पहिला गेम होय. 'एसजीआय डॉगफाईट' जो इंटरनेट प्रोटोकॉल वापरणारा पहिला गेम बनला. १९८६ साली तो प्रदर्शित झाला मात्र, ब्रॉडकास्ट पॅकेट्स वापरले जात असल्याने, हा गेम एकाच नेटवर्कपुरता मर्यादित होता. त्याचवर्षी वर्कस्टेशन संगणकांना ग्राफिस क्षमता मिळाल्या. हे घडत आहे, तेव्हा आपल्याकडे 'द विंडोज सिस्टम्स'चे प्रकाशन होत होते. १९८७ साली अटारी मल्टीप्लेअर पार्टीमध्ये सामील झाले. गेमिंगमध्ये 'डेथ मॅच'ची संकल्पना आपल्याला पहिल्यांदाच दिसते.

१९८९ हे वर्ष इंटरनेट आणि ऑनलाईन गेमिंगसाठी एक मोठे वर्ष ठरले. आयपी मल्टीकास्ट तेव्हा विकसित झाले आणि इंटरनेटवर गेमिंग शय झाले. सेगाने १९९० साली त्यांची 'मेगानेट ऑनलाईन गेमिंग सेवा' सुरू केली. यामुळे 'मल्टीप्लेअर ऑनलाईन गेमिंग' उपलब्ध झाले. सेगाने त्यांच्या 'सेगा सॅटर्न' आणि 'सेगा ड्रीमकास्ट सिस्टम'मध्ये ऑनलाईन प्रवेशासाठी नेटलिंकदेखील तयार केली. गेमिंगमध्ये ९० सालच्या दशकातील सर्वांत संस्मरणीय गोष्ट म्हणजे, रोल-प्लेइंग गेम्सचा प्रसार होय. २०००च्या दशकाच्या सुरुवातीला इंटरनेट क्षमता असलेले गेमिंग कन्सोल रिलीज झाले. हा ट्रेंड आजही चालू आहे.

२००७ यावर्षी स्मार्टफोन लोकप्रिय होण्यास सुरुवात झाली. मोबाईल गेमिंगमुळे गेमिंग आता मुख्य प्रवाहात लोकप्रिय झाले. मोबाईल गेमिंग हे ऑनलाईन गेमिंगची उत्क्रांतीच ठरली. २०१५ साली जाणकारांनी असा अंदाज व्यक्त केला होता की, कन्सोल गेमिंगपेक्षा मोबाईल गेमिंगमधून जास्त उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. सरासरी ग्राहकांसाठी व्हर्च्युअल रिॲलिटी अजूनही त्याच्या प्राथमिक अवस्थेत होती. तथापि, फेसबुकने ऑयुलस खरेदी केल्यामुळे, व्हर्च्युअल रिॲलिटीला एक प्लॅटफॉर्म बनवण्याचा ट्रेंड आपल्याला दिसून येत आहे.

ऑनलाईन गेमिंगचा इतिहास इंटरनेटच्या इतिहासासारखाच आहे. आपण अजूनही इंटरनेटच्या बाल्यावस्थेत आहोत तसेच, आपण ऑनलाईन गेमिंगच्या बाल्यावस्थेतही आहोत. ऑनलाईन गेमिंगचा एक तपशीलवार इतिहास आहे आणि गेमिंगचे भविष्य कसे उलगडते, हे दिवसेंदिवस पाहणे विस्मयजनक असेल.

भारतातील ऑनलाईन गेमिंगमध्ये मोबाईल गेमिंग, ई-स्पोर्ट्स आणि वेब- आधारित गेमिंग प्लॅटफॉर्मसह, डिजिटल गेमिंग क्रियाकलापांचा समावेश आहे. स्मार्टफोनच्या वाढत्या प्रवेशामुळे आणि परवडणाऱ्या इंटरनेट प्रवेशामुळे, हे क्षेत्र भारताच्या डिजिटल मनोरंजन उद्योगातील एक महत्वपूर्ण भाग आहे. २०२३ सालापर्यंत अंदाजे ४५० दशलक्ष गेमर्ससह भारताने, जगातील सर्वांत मोठ्या मोबाईल गेमिंग बाजारपेठांमध्ये स्थान मिळवले आहे.

डिजिटल गेमिंगचा १९४० सालापासूनचा इतिहास क्रमाक्रमाने विकसित होत असताना, मध्येच कोरोनाचा काळ येतो. त्या काळात घरोघरी अडकलेल्या लोकांना क्रीडांगणांवर जाणे अवघड होते. त्यामुळे घरबसल्या खेळायला लोकांना काहीतरी वेगवेगळ्या खेळांची गरज भासू लागली. आणि या काळातच लोकांना डिजिटल गेमिंगने दिलासा दिला. यातील तज्ज्ञ मंडळी बघता बघता नवनवीन खेळ लोकांसमोर आणतात आणि काही लोक त्या डिजिटल क्रीडांगणात बघता बघता त्याच्या कधी आहारी जातात, हे कोणालाच कळत नाही.

या डिजिटल क्रीडांगणातून घराकडे परत बोलवत 'या चिमण्यांनो परत फिरा रे' असे गदिमा गीत सांगणार्यांचे ते छोटेच नव्हे, तर मोठेही ऐकेनासे होतात. मग शेवटी आता सरकार पुढे येते आणि समाजात पसरणारे हे डिजिटल दोष हटवण्याचा प्रयत्न करते.

अशा प्रसंगी आता गरज आहे ती, कायद्यातील पळवाटा शोधणाऱ्यांकडे बघायची. कारण, हे खेळ खेळणारे खेळाडू एकटे नाहीत कारण, कोणत्याही क्रीडाप्रकारात त्या क्रीडापटूंना मार्गदर्शन करणारे निष्णात कोच, प्रशिक्षक असतातच. या प्रशिक्षकाला जशा वाटा माहीत असतात, तशाच पळवाटाही माहीत असतात. आता या 'ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक २०२५'मुळे गेमर्सना आपण कदाचित रोखू, पण गेमर्सबरोबर त्यांच्या प्रशिक्षकांकडेही डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवायला लागेल. भारत आपल्या देशात ऑलिम्पिक भरवण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी सरकार देशातील क्रीडांगणे क्रीडागारे याकडे लक्ष केंद्रित करत असताना सरकारने एकीकडे हेदेखील दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, डिजिटल क्रीडांगणाकडेही आमचे बारीक लक्ष आहे.

अशा परिस्थितीत या खेळांमध्ये आपले आजचे सरकार कसे सदा जिंकत राहील हे बघत, यासाठी आपल्या सगळ्यांची साथ आपण त्यांना देणे गरजेचे असणार आहे आणि ती सरकारला मिळेल अशी मला खात्री आहे. (लेखक माजी खेलकूद आयाम प्रमुख, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, जनजाती कल्याण आश्रम आणि माजी हॉकीपटू आहेत)